सोलापूर **तरुण भारत**
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २५ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २७१ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आंतरजातीय लग्न केल्यावर ५० हजारांचे अनुदान मिळणार

मुंबई : आंतरजातीय विवाह करणाऱ्या प्रत्येक जोडप्यास शासनाकडून ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. जिल्ह्यात सन २०२२-२३ या वर्षातील प्राप्त झालेल्या प्रस्तावांना मंजुरी देऊन काही जोडप्यांना अनुदान देण्यात आले आहे, तर नव्याने अर्ज केलेल्यांना अनुदानाची आजही प्रतीक्षाच करावी लागत आहे. राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागामार्फत १९५८ पासून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. या समाज कल्याण विभागाकडून केली जाते.योजनेच्या लाभासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग यापैकी एका व्यक्तीने सवर्ण हिंदू लिंगायत, जैन व शीख या व्यक्तीशी विवाह केल्यास अथवा दोन वेगवेगळ्या प्रवर्गातील व्यक्तींनी विवाह केल्यास ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाते.

# महाराष्ट्रातील मतदार याद्या 'ऑल इज वेल'; काँग्रेसच्या आरोपांना निवडणूक आयोगाचे उत्तर

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक संपून एक महिन्याहून अधिक काळ लोटला आहे. परंतु, निवडणुकीवरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरूच आहेत. राज्यात झालेल्या निवडणुकांबाबत काँग्रेस पक्षाने उपस्थित केलेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने मंगळवारी उत्तर दिले आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत मतदारांची नावे अनियंत्रितपणे जोडली किंवा काढली नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.




काँग्रेसला दिलेल्या उत्तरात निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, संध्याकाळी ५ वाजेच्या मतदानाच्या आकडेवारीची अंतिम मतदानाच्या आकडेवारीशी तुलना करणे योग्य ठरणार नाही. संध्याकाळी ५ ते ११:४५ या वेळेत मतदानात वाढ होणे सामान्य आहे, जे मतदारांच्या मतदानाच्या एकत्रीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग आहे आणि पडलेली मते आणि मतांची मोजणी यात वास्तविक पण क्षुल्लक फरक कसा असू शकतो हे देखील नमूद केले आहे.

मतदानाचा तपशील देणारा वैधानिक फॉर्म १७-सी मतदान केंद्रावर मतदान संपल्यावर उमेदवारांच्या अधिकृत प्रतिनिधींकडे उपलब्ध असल्याने प्रत्यक्ष मतदारांच्या संख्येत बदल करणे अशक्य आहे यावर निवडणूक आयोगाने भर दिला.

आयोगाने म्हटले आहे की, महाराष्ट्रातील मतदार यादी तयार करताना नियमावर आधारित प्रक्रिया पारदर्शकतेने पाळली गेली आणि राज्यातील मतदारांची नावे वगळण्यात कोणतीही अनियमितता झाली नाही. काँग्रेस प्रतिनिधींच्या सहभागासह मतदार यादी तयार करताना योग्य प्रक्रिया पाळण्यात आल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले.

## एक देश, एक निवडणूक विधेयकावर चर्चेसाठी जानेवारीला बैठक

नवी दिल्ली : एक देश, एक निवडणूक विधेयकावर चर्चा करण्यासाठी संयुक्त संसदीय समितीची पहिली बैठक आठ जानेवारी रोजी होणार आहे. या बैठकीत पुन्हा एकदा काँग्रेस आणि डावे पक्ष विधेयकाला विरोध करणार आहेत. काँग्रेस नेते सलमान खुर्शीद यांनी एक देश, एक निवडणूक विधेयकाला विरोध करण्याच्या भूमिकेवर काँग्रेस ठाम असल्याचे सांगितले. सरकारने लोकसभेत सादर केलेले एक देश, एक निवडणूक हे विधेयक देशाच्या संघराज्य संरचनेला बाधक असल्याचे डाव्या पक्षांचे म्हणणे आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तसेच भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी - लेनिनवादी) लिबरेशन, क्रांतीकारी समाजवादी पक्ष, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या सर्वांनी संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत एक देश, एक निवडणूक विधेयकाला विरोध करणार असल्याचे जाहीर केले.

# बँकांचे कामकाज तीन दिवस राहणार बंद

मुंबई : महाराष्ट्रात तीन दिवस बँकांचे कामकाज बंद राहणार आहे. ग्राहकांनी या सुट्या लक्षात ठेवून बँकेशी संबंधित कामांचे नियोजन करावे, असे आवाहन रिझर्व्ह बँकेने केले आहे.

आज मंगळवार २४ डिसेंबर आहे आणि वर्ष पुढल्या आठवड्यात मंगळवार ३१ डिसेंबर रोजी संपणार आहे. या कालावधीत महाराष्ट्रात तीन दिवस बँकांचे कामकाज बंद असेल. राज्यात बुधवार २५ डिसेंबर रोजी नाताळ अर्थात ख्रिसमस निमित्त बँकांचे कामकाज बंद राहणार आहे. यानंतर २८ डिसेंबर रोजी चौथा शनिवार म्हणून नियमानुसार बँकांचे कामकाज बंद असेल. नंतर २९ डिसेंबर रोजी रविवार म्हणून नियमानुसार बँकांचे कामकाज बंद असेल. यामुळे वर्ष संपण्याच्या सुमारास राज्यात बँकांचे कामकाज बुधवार २५ डिसेंबर, शनिवार २८ डिसेंबर आणि रविवार २९ डिसेंबर असे तीन दिवस बंद राहणार आहे. बँकांचे कामकाज बंद राहणार असले तरी एटीएम सेवा, नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग सुरू राहणार आहे. यामुळे बँकेत न जाता दैनंदिन आर्थिक व्यवहार करणाऱ्या कोट्यवधी बँक ग्राहकांचे काम विना अडथळा सुरू राहणार आहे.

**बँकांचे कामकाज 'या' दिवशी बंद राहणार :** बुधवार २५ डिसेंबर २०२४ - नाताळ अर्थात ख्रिसमस निमित्त सुटी, शनिवार २८ डिसेंबर २०२४ - चौथा शनिवार, सुटी, रविवार २९ डिसेंबर २०२४ - रविवारची सुटी

## राज्यात २७,२८ डिसेंबरला मेघ गर्जनेसह पावसाची शक्यता
### शेतकऱ्यांना कृषी विभागाचे आवाहन

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२४ डिसेंबर : राज्यातील विविध भागांमध्ये काही प्रमाणात आभाळी हवामानाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. काही भागात अवकाळी पाऊस होण्याची शक्यता आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी अंदाज घेऊन नियोजन करावे असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.२६ डिसेंबरला कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यांतील दक्षिणेकडील तुरळक भाग; २७ डिसेंबर रोजी खानदेश (नाशिक विभाग), मध्य महाराष्ट्र (पुणे विभाग), उत्तर मराठवाडा, आणि पश्चिम विदर्भातील विविध ठिकाणी; आणि २८ डिसेंबर रोजी खानदेश, मराठवाडा (प्रामुख्याने उत्तरेकडील जिल्हे), आणि विदर्भातील काही भागांमध्ये मेघ गर्जनेसह पावसाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे.

या भागातील शेतकऱ्यांनी या पुढील कृषी सल्ला आणि हवामानाच्या अंदाजांकडे लक्ष ठेवावे आणि त्यानुसार नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

# लाडकी बहिण योजनेचा डिसेंबरचा हप्ता लवकरच खात्यावर वर्ग होणार; सन्मान निधीच्या वाटपाला सुरवात

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २४ डिसेंबर: विधानसभा निवडणुकीत 'गेम चेंजर 'ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता आता येत्या काही दिवसातच पात्र महिलांच्या खात्यावर जमा होणार आहे. त्यासाठीचा आवश्यक निधी खात्याकडे वर्ग करण्यात आला असल्याचे शासनाकडून स्पष्ट करण्यात आले. पहिल्या टप्प्यात आधार सिडींग राहिलेल्या १२,८७,५०३ पात्र महिलांना आणि दुसऱ्या टप्प्यात सुमारे ६७,९२,२९२ पात्र महिलांना या महिन्याचा सन्मान निधी प्रदान करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीने सपाटून पराभव करावा लागल्यानंतर ऑगस्ट महिन्यापासून मुख्यमंत्री लाडके बहीण योजना सुरू केली होती त्यानंतर पंधराशे रुपये प्रत्येक महिलाच्या खात्यावर देण्यात

आले.४ महिन्याच्या आत्ता वर्ग केल्यानंतर विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झालेले त्याची कार्यवाही थांबले होते विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या प्रचंड बहुमतामागे ही योजनाच कारणीभूत ठरली असल्याचे माहितीच्या नेत्यांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर ही योजना पुन्हा सुरू राहील की नाही याबाबत शंका उपस्थित करण्यात येत होते तर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांनी जाहीर नाम्यात नमूद केलेले २१०० रुपये देण्याची मागणी करण्यात येत होते त्या पार्श्वभूमीवर सरकारने हिवाळी अधिवेशनात या योजनेसाठी लागणारे अतिरिक्त निधीच्या पुरवणी मागण्यांना मंजुरी दिली

होती. याबाबत महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना महिलांच्या सशक्तीकरणासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या योजनेमुळे महिलांना सन्मान निधी मिळून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल होईल आणि त्यांना स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.राज्य शासन महिलांच्या सशक्तीकरणासाठी कटिबद्ध असून, या योजनेमुळे महिलांना आर्थिक स्थैर्य मिळण्याबरोबरच आत्मसन्मानाने जगण्याचा आत्मविश्वास मिळेल.

## मुख्यमंत्रीच ठरले चिटफंड घोटाळ्याचे बळी!
### मोहन चरण माझींनी केले जागरूक राहण्याचे आवाहन

भुवनेश्वर : जनतेने कष्टाने कमावलेला पैसा गुंतवताना सतर्क राहणे आवश्यक आहे. मी स्वतः चिटफंड घोटाळ्याचा बळी ठरलो होतो. त्यामुळे जनतेने पॉन्झी योजनांबद्दल सतर्क राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी केले. राष्ट्रीय ग्राहक दिन सोहळ्यात ते बोलत होते.

यासंदर्भात मुख्यमंत्री म्हणाले की, पॉन्झी कंपन्यांचे एजंट त्यांच्या योजना अतिशय आकर्षक पद्धतीने मांडायचे आणि मीही त्यांच्या गोष्टीत येऊन गुंतवणूक केली, पण शेवटपर्यंत मला माझे पैसे मिळू शकले नाहीत असे माझी यांनी सांगितले. चिटफंडच्या नावाखाली १९९० आणि २००२ मध्ये दोन पॉन्झी कंपन्यांनी माझी फसवणूक केली. मी त्या योजनांमध्ये पैसे जमा केले, परंतु जेव्हा मॅच्योरिटीची वेळ आली तेव्हा त्या कंपन्या गायब झाल्या.


त्यानंतर फसवणूक झालेले पैसे परत मिळण्याची प्रक्रिया इतकी लांब आणि कठीण होती. त्यामुळे आपण पैसे परत घेऊ शकलो नाही. यासोबतच कोणतीही गुंतवणूक करण्यापूर्वी संपूर्ण माहिती घ्यावी आणि पॉन्झी कंपन्यांच्या फंदात पडू नये, असे आवाहनही मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी केले. तसेच, अशी फसवणूक थांबवण्यासाठी जनजागृती आणि दक्षता आवश्यक आहे. कष्टाने कमावलेला पैसा सुरक्षित ठेवणे हे आमचे प्राधान्य असले पाहिजे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# आलाना कंपनीच्या अवैध पार्किंगमुळे अनेकांचा बळी

### जड वाहनांची मुख्य रोडवर अवैध पार्किंग

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २४ डिसेंबर.



छत्रपती संभाजीनगर ते पैठण रोडचे मागील दोन वर्षापासून पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचे व रोडचे काम सोबतच सुरू असूच ब्रुक बाँड गेवराई तांडा येथील आलाना कंपनीमध्ये महाराष्ट्रासह देशभरातून अनेक मोठी जड वाहने ये जा करतांना दिसत असुन बऱ्याच वाहन धारकांचा कंपणीच्याआतमधे प्रवेश करण्यासाठी नंबर तासनतास तर कधी दोन तीन दिवस नंबर लागत नसल्याने ही जड वाहतूक करणारी वाहणे छत्रपती संभाजीनगर ते पैठण रोडवर अवैध पने वाहतूक पोलिसांच्या नाकावर टीचून उभी असतात या अवैध पार्किंगमुळे उभ्या वाहनाला धडकून आजपर्यंत अनेकांना जीव गमवावा लागला असून अपघात झाल्यावर वाहतूकोंडीमुळे अनेक वाहनाच्या रांगा एक ते दोन किलोमीटर पर्यंत लागलेल्या दिसुन येतात अलाना कंपनीच्या अवैध पार्किंगमुळे दररोज कंपनी सूरु व बंद होण्याच्या वेळी कामगाराच्या छोट्या मोठ्या व कंपनीचा माल वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे गेवराई तांडा येथे दररोज वाहतुक कोंडी होताना दिसून येत आहे. या आलाना कंपनीची पार्किंग स्वतः कंपनीच्या व्यवस्थापकाने कंपनीच्या आतमध्येच करावी अशी मागणी छोटे मोठे वाहन चालक व गेवराई येथील ग्रामस्थ करीत असून याकडे वाहतूक पोलिसांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे दिसून येत आहे.

# मुख्यमंत्री बीड,परभणीला केव्हा जाणार?; संजय राऊत यांचा सवाल

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई, दि.२४ डिसेंबर: लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधीच्या परभणी दौऱ्यावर टीका करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे परभणी व बीड मधील घटनेची गृहमंत्री म्हणून केव्हा जबाबदारी घेणार , ते कधी घटनास्थळी भेट देणार आहेत ?, असा सवाल ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी मंगळवारी पत्रकारांशी बोलताना केला.

छगन भुजबळांना दूर करू शकता, पण खुनाचा संशय असलेल्यांना मंत्रिमंडळात स्थान कसे दिले? असा सवाल उपस्थित करत मुख्यमंत्री फडणवीस व मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली.

राहुल गांधी यांनी सोमवारी परभणी न्यायालयीन कोठडीत मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले होते. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राहुल गांधी हे जाती-जातीत रिक्स्ट निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत त्यांचे तेवढेच काम आहे असं टीका केली होती त्याबाबत राऊ त्यांच्याकडे विचारणा केली असता ते म्हणाले की, विरोधी पक्षाने, जनतेने, नागरिकांनी काय करावे, कुठे जावं, काय खावं, कोणत्या भूमिका मांडाव्यात हे नरेंद्र मोदी, अमित शहा, देवेंद्र फडणवीस ठरवणार आहेत का? या देशात लोकशाही आहे का ? महाराष्ट्राची परिस्थिती बिहारपेक्षा गंभीर आहे हे फडणवीसांनी समजून घ्यावे. गृहमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारत त्या ठिकाणी भेट द्यावी आणि मुख्य आरोपींना तातडीने अटक करावे, असे आवाहन करून ते म्हणाले,'

परभणी आणि बीडमध्ये ज्या घटना घडल्या आहेत, त्या राज्याच्या प्रतिष्ठेला काळिमा फासणाऱ्या आहेत. त्या भयंकर अपराधाशी संबंधित असलेले संशयित गुन्हेगार तुमच्या मंत्रिमंडळात आहेत. त्यांच्यावर लोकांचा संशय आहे, रोष आहे असे लोकं आपल्या मंत्रिमंडळात आहेत. छगन भुजबळांसारख्या नेत्याला दूर ठेवू शकता, पण खुनाचा संशय असलेल्या लोकांना मंत्रिमंडळात स्थान कसे मिळतं ? असा सवाल करीण मुख्यमंत्री फडणवीसांवर निशाणा साधला.

न्यायाच्या, द्वेषाच्या गोष्टी करणारे फडवणीस गृहमंत्री म्हणून बीडला गेले का ? राहुल गांधी बीडला गेले किंवा परभणीत गेले, यामुळे तुमचं पित्त का खवळलं ? असा सवाल राऊतांनी फडणवीसांना केला. राहुल गांधी हे लकोसभेचे विरोधी पक्षनेते आहेत. भारतीय संविधानाने त्यांन जो संसदेत आहे, तो कॅबिनेट मंत्र्याचा आहे. तो दर्जा त्यांना नरेंद्र मोदी, अमित शाह किंव फडणवीसांनी दिलेला नाही. जेव्हा तुमच्या हातात होतो, तेव्हा तुम्ही त्यांना विरोधी पक्षनेतेपद मिळू दिले नाहीत, आता लोकसभेतल्या आकडेवारीनुसार त्यांना हे पद मिळालंय. मोदींना तिथे बहुमत नाहीये हे मान्य करा, ते कुबड्यांवर आहेत, अशी टीकाही राऊतांनी केली.

संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येची जबाबदारी या राज्याच्या गृहमंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांनी घ्यायलाच हवी. राहुल गांधी त्यांना भेटायला गेले यावर बोलण्यापेक्षा, ज्यांनी या हत्या घडवल्या त्यांच्यावर बोला. हा महाराष्ट्र मानवतेसाठी, माणूसकीसाठी ओळखला जात होता. गेल्या पाच वर्षांमध्ये या राज्यामध्ये माणूसकीचा खून झाले आहेत,

ज्यांच्यावर लोकांचा संशय आहे, अशा व्यक्ती फडणवीसांच्या मंत्रीमंडळात आहेत. तुम्ही छगन भुजबळ यांना मंत्रीमंडळातून दूर करू शकता, पण एका खुनाचा , कटकारस्थानाच संशय ज्याच्यावर आहे, अशा व्यक्तीला तुम्ही मंत्रीमंडळापासून दूर ठेवत नाही ? कारण तुमचं जातीचं राजकारण आहे. तुम्ही एक समाज वापरून घेताय, अशी टीका राऊतांनी फडणवीसांवर केली. काही आमदारांचा विरोध आहे म्हणून भुजबळांना दूर ठेवता, पण जिथे बीडसह महाराष्ट्रातल्या संपूर्ण जनतेचा विरोध आहे. संतोष देशमुख यांच्या खुनाच्या कारस्थानात ज्यांचा संशयास्पद हात आहे, अशी व्यक्ती राज्याच्या मंत्रीमंडळात नको, अशा घोषणा अजित पवार यांच्यासमोर देण्यात आल्या. खऱ्या आरोपींना पकडण्याची हिंमत देवेंद्र फडणवीसांमध्ये आहे का ? असा प्रश्नही राऊतांनी उपस्थित केला.

# साखर कारखान्यांनी शेतकरी हित जपण्याचा प्रयत्न करावा : सिद्धाराम सालीमठ



अहिल्यानगर दि.२४- सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांच्या हितासाठी असल्याने शेतकऱ्यांना नुकसान होईल अशी कोणतीही कृती कारखान्यांनी करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात साखर कारखान्यांच्या प्रश्नाबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस प्रादेशिक सहा संचालक साखर संतोष बिडवई, निवासी उपजिल्हाधिकारी शाहूराज मोरे, उप विभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, उपसंचालक साखर संजय गोंदे, जिल्हा सहकार उपनिबंधक गणेश पुरी, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे,विशेष लेखा परीक्षक आर. एफ. निकम आदी उपस्थित होते.

श्री.सालीमठ म्हणाले, साखर कारखान्यांनी एफआरपीपेक्षा कमी दर देऊ नये. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी शेतकऱ्याचे समाधान होईल असा दर देण्याचा प्रयत्न करावा. शेतकऱ्याला अधिकची रक्कम देता यावी यासाठी इथेनॉलसारख्या उपउत्पादनाकडे वळण्याचा प्रयत्न करावा. ऊसाची रक्कम शेतकऱ्यांना वेळेवर अदा करावी. शेतातील पाचट जाळून ऊस तोडणी करू नये. असे प्रकार आढळल्यास प्रदूषण नियंत्रण कायद्याखाली कारवाई करण्यात येईल.

साखर कारखान्यांनी वजन काट्याचे मानकीकरण करून घ्यावे, त्यासाठी अधिकाऱ्यांनी काही कारखान्यांना भेट देऊन वस्तुस्थिती तपासावी. भेटीदरम्यान वजन कमी असल्याचे प्रकार लक्षात आल्यास कारवाई करण्यात येईल. वजन करण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी कारखान्यांनी डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करावा.

साखर कारखान्यांनी करार करून तोडणीसाठी लावलेल्या हार्वेस्टर चालकांना शेतकऱ्यांकडून अतिरिक्त पैसे न घेण्याचे स्पष्ट निर्देश द्यावे, असे प्रकार आढळल्यास त्वरित कारवाई करावी. ऊसाची वाहतूक करताना वाहतूक नियमांचे पालन करावे, वाहतूक नियमांचे उल्लंघन झाल्यास प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीत ऊसाचा दर, गतवर्षीच्या ऊसाची अदा करायची रक्कम, पाचट जाळून ऊस तोडणी करणे, कारखान्याच्या वजन काट्याची तपासणी, ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांवर रिफ्लेक्टर लावणे, ऊस दर जाहीर करताना परिपत्रक काढणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.







# 'सीटीआर'चा ६० वा वर्धापनदिन उत्साहात



छत्रपती संभाजीनगर : येथील चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील नामांकित सीटीआर कंपनी मध्ये दिनांक १८.१२.२०२४ रोजी कंपनीचा ६० वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सीटीआर कंपनीच्या ग्रुप मधील पुणे, नाशीक आणि औरंगाबाद येथे ही यावेळी महारक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले होते. या नीमीत्त कंपनीचे उपाध्यक्ष (व्हाईस चेअरमन) श्री.अनील कुमार तसेच सौ. प्रजक्ता कुमार (संचालक) यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीच्या प्रांगणात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. रक्तदाना सोबतच ६० पर्यावरणपुरक वृक्षांचे रोपण करण्यात आले. याप्रसंगी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री व्ही.के.वाघचौरे व डायरेक्टर श्री आर.व्ही. तळेगावकर यांनी वृक्षारोपण केले. तसेच जनरल मॅनेजर श्री प्रणव शंकर यांनी वृक्षरोपणाचे महत्व पटवुन दिले. यावेळी श्री आर.बी. लाड, श्री ए.कौलवार, श्री बी.के. सीन्हा, श्री एस.एस. दानेकर, श्री पी.पी. कुलकर्णी यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कंपनीच्या सर्व कर्मचारी व कामगार यांनी सहभाग घेतला. श्री अनिल कुमार यांनी वर्धापनदिनानिमित्त आयोजित महारक्तदान शिबीर व वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## सोयगाव शहरातील अरुण सोहनी यांचा कृषी कार्यलय सोयगाव यांच्याकडून सत्कार सोहळा संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ डिसेंबर : सोयगाव शहरातील प्रगतशील शेतकरी तथा कृषीभुषण प्राप्त आसलेले शेतकरी अरूण श्रीराम सोहनी यांना छत्रपती संभाजीनगर येथील सु-लक्ष्मी बहुउद्देशिय सेवा भावी संस्था व माणुसकी रुग्णसेवा समूह शासकीय रुग्णालयाच्या आठ व्या वर्धापन दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष सुमीत पंडीत यांच्या कडून सेवागौरव व कृषीभुषण पुरस्कार आमंत्रण पत्रिका पाठवल्याबद्दल सोयगाव येथील कृषी कार्यलय यांच्या कडून अधिकारी व कर्मचारी यांच्या कडून शाल,श्रीफळ,फुल गुच्छ देऊन सत्कार करून पुढील वाटचालस शुभेच्छा दिल्या.यावेळी रमेश गुंडले तालुका कृषी अधिकारी,प्रदीप पाटील कृषी पर्यवेक्षक,अतुल पाटील कृषी पर्यवेक्षक,समाधान चौधरी कृषी पर्यवेक्ष,किशोर महाजन कृषी पर्यवेक्षक,हेमंत देशमुख कृषी पर्यवेक्षक,बेबीचंद चौरे कृषी सहाय्यक सोयगाव,कैलास कुमावत कृषी सहाय्यक,विश्वजीत तायडे कृषी सहाय्यक,विनोद कायस्थ,शिदे मामा आदींसह उपस्थित होते.तर या कार्यक्रमाचे सुत्रंसचालन कैलास कुमावत यांनी केले तर आभार समाधान चौधरी यांनी मानले.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल व ब्लु माउंटेन प्री स्कुल मध्ये आनंद नगरी व ख्रिसमस उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २४ डिसेंबर

पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतिलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल व ब्लु माउंटेन प्री स्कुल मध्ये आनंद नगरी व ख्रिसमस आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर व शाळेचे विद्यार्थी, पालक व शिक्षकवृंद उपस्थित होते. ख्रिसमस निमित्त शाळेतील विद्यार्थी सांता क्लॉज च्या खास पोशाखात आकर्षक दिसत होते. प्री प्रायमरी च्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करुन उपस्थितांची मने जिंकली आणि कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला. त्याचबरोबर शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थीना आर्थिक व्यवहार कळावे. या हेतु ने आज शाळेमध्ये आनंद नगरी हा कार्यक्रम पार पडला या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यां बरोबरच पालकांनीही आनंद घेतला. आनंद नगरी मध्ये इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थीनी स्वत: तयार केलेल्या खाद्यपदार्थांचा स्टॉल मांडला होता. विद्यार्थीनी व पालकांनी मुलांच्या स्टॉल ला भरभरुन प्रतिसाद दिला. हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्याठी शाळेतिल शिक्षक, विद्यार्थी, व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## नवीन वर्षात भेटीला येणार दाभाडे कुटुंब 'फसक्लास दाभाडे' चित्रपटाचा धमाकेदार टीझर रिलीज

छत्रपती संभाजीनगर : काही दिवसांपूर्वीच दाभाडे कुटुंबीयांनी गुलाबी थंडीत मस्त 'यल्लो यल्लो' हळदीचा जबरदस्त समारंभ साजरा केला. त्यावेळी या दाभाडे कुटुंबाची थोडी तोंडओळख प्रेक्षकांना झालीच. मात्र नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टीझरमधून ही दाभाडे फॅमिली का फसक्लास आहे, याचा अंदाजही प्रेक्षकांना आला आहे. 'फसक्लास दाभाडे' चित्रपटाचा टिझर नुकताच सोशल मीडियावर झळकला असून या कुटुंबाला भेटण्याची आता प्रेक्षकांना प्रचंड उत्सुकता लागली आहे. हेमंत ढोमे लिखित, दिग्दर्शित या चित्रपटात क्षिती जोग, सिद्धार्थ चांदेकर, अमेय वाघ, निवेदिता सराफ, हरिष दुधाडे, राजन भिसे, राजसी भावे यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

हेमंत ढोमे यांचे चित्रपट नेहमीच वास्तविकतेला धरून असतात. त्यातील पात्रे नेहमीच आपल्या आजूबाजूची, आपल्या घरातील असतात आणि म्हणूनच त्यांचे चित्रपट प्रेक्षकांना खूप जवळचे वाटतात. असेच एक तुमच्या आमच्या सारखे कुटुंब प्रेक्षकांना 'फसक्लास दाभाडे' मध्ये पाहायला मिळणार आहे. टीझरमध्ये हसतं-खेळतं दाभाडे कुटुंब दिसत असून भावंडांमधील भांडणे, कुरबुरी यात दिसत आहेत. हे सगळे दिसत असतानाच त्यांच्यातील घट्ट बॉण्डिंगही दिसत आहे. दाभाडेंच्या घरातील या तीन खांबांना भेटणं म्हणजे प्रेक्षकांसाठी पर्वणी असणार आहे.

निर्माते भूषण कुमार म्हणतात, 'फसक्लास दाभाडे' हा चित्रपट कुटुंबातील प्रत्येकासाठी खास असणारा आहे. प्रत्येक वयोगटासाठी असणारा हा चित्रपट प्रेक्षकांनी सहकुटुंब पाहावा. हा चित्रपट पाहाताना यातील प्रत्येक व्यक्तिरेखा प्रेक्षकांना आपल्याच घरातील भासेल. चेहऱ्यावर हास्य आणणारा हा चित्रपट आवर्जून बघावा.'' निर्माते आनंद एल राय म्हणतात, 'फसक्लास दाभाडे' हा चित्रपट म्हणजे कुटुंबातील नातेसंबंधांचा उत्सव आहे. जो हास्य, भावना आणि जीवनातील साध्या क्षणांचा आनंद साजरा करतो.

# एसा सभासदांसाठी 'एम्पॉवरमेंट ऑफ इंजिनिअर्स फॉर बेटर सोसायटी थ्रू मेडीटेशन' यावर कार्यशाळा संपन्न

### इंजिनिअर्सने आपले स्वास्थ्य उत्तम ठेवल्यास चांगल्या शहराची निर्मिती करतील - इंजि.राजयोगी दशरथजी



नगर : संपत्तीपेक्षा मनःशांती जास्त आवश्यक असून चांगले विचार आणि आचरणाच्या माध्यमातून आपण हे साध्य करू शकतो. इंजिनिअर हा समाजात एक चांगला आणि महत्वाचा घटक असून मेडीटेशनच्या माध्यमातून त्यांनी आपले स्वास्थ्य उत्तम ठेवल्यास चांगल्या शहराची निर्मिती करतील व त्याद्वारे एक सदृढ समाजाची निर्मिती होण्यास मदत होते. मेडीटेशन ही भारत देशाने जगाला दिलेली देणगी आहे त्यातून मन शांत होते, वाद कमी होतात, सामाजिक स्तरावर एकता निर्माण होण्यास मदत होत असून त्याचीच आज गरज आहे, असे प्रतिपादन इंजि. राजयोगी दशरथजी यांनी केले

आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हे अर्स असो. अहील्यानगर, पोलाद स्टील जालना आणि ब्रह्मकुमारीज अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने एम्पॉवरमेंट ऑफ इंजिनिअर्स फॉर बेटर सोसायटी थ्रू मेडीटेशन या मार्गदर्शनपर सेशनचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुणे ब्रह्मकुमारी सेंटरचे इंजि. राजयोगी दशरथजी बोलत होते. यावेळी एसाचे अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे, आदेश गुंगे तसेच एसा संस्था सचिव अभिजित देवी, सुनिल औटी, रत्नाकर कुलकर्णी, आदिनाथ घुले, राजेंद्र गवळी, प्रदिप तांदळे, अन्वर शेख, संतोष खांडेकर, विजय पादिर, सतीश कांबळे, एस यू खान, विनायक मैड, अजिंक्य बालटे, भगवान गायकवाड, दिनेश येवले आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्या नगर सेंटरच्या मुख्य राजेश्वरी दीदी यांनी उपस्थितांचे स्वागत करून नगर मधील सेंटर आणि त्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची आणि सामाजिक कामांची माहिती सर्वांना दिली. पोलाद स्टील प्रायोजित नॉलेज सिरीज अंतर्गत या उपक्रमात राजयोगी दशरथ सरांनी इंजिनीअर्स, आर्किटेक्ट तसेच सर्व्हेअर्स यांनी रोजच्या कामाच्या तणावातून मनःशांती करीता दिवसातून आपल्या स्वतः साठी एक तास वेळ ध्यान आणि मेडीटेशन साठी देण्याची गरज असल्याचे नमूद केले.

यावेळी बोलताना राजयोगिनी सुनंदा दीदी यांनी अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा पैकी निवारा देण्याचे बनवण्याचे महत्त्वाचे काम आर्किटेक्ट इंजिनीअर्स करत असून त्यांचे मानसिक आरोग्य चांगले असेल तर चांगल्या वास्तूची निर्मिती होऊ शकेल त्यासाठी आपल्यासाठी रोज वेळ देऊन मेडीटेशन करण्याचे आवाहन केले. तसेच उपस्थितांकडून गायडेड मेडीटेशन करून घेतले.

संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांनी ब्रह्मकुमारी परिवाराच्या अनेक तालुके आणि जिल्ह्यात शाखा असून अनेक नागरिक या अंतर्गत होणाऱ्या उपक्रमाच्या माध्यमातून जोडले जात असल्याचे नमूद करून संस्था सभासदांनी मेडीटेशन कार्यशाळेमध्ये सहभाग घेऊन मनःशांती साठी हा सोपा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ब्रह्मकुमारीज अहील्यानगर सेंटरच्या सुवर्णा दीदी यांनी केले तर एसा सचिव अभिजित देवी यांनी उपस्थित संस्था सभासद आणि नगरकरांचे आभार मानले.

## पंढरपूर ग्रामपंचायतीच्यावतीने नवीन संगणक कक्षाचे उद्घाटन



वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- आजच्या विज्ञान युगात चोहोकडे संगणकीकरण सुरू आहे. संगणक साक्षर होणे आजची काळाची गरज असल्याचे ओळखून पंढरपूर ग्रामपंचायतीच्यावतीने नवीन संगणक कक्षाची स्थापना करण्यात आली असून, आज दि. २४ रोजी या संगणक कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक संजय गिते, बाळासाहेब आंधळे, सरपंच वैशाली बाळासाहेब राऊत, शेख अख्तर, के.व्ही. गायकवाड, ग्रामविकास अधिकारी प्रकाश तुपे होते. यावेळी मार्गदर्शन करताना पोलिस उपनिरीक्षक गिते म्हणाले की, सध्या संगणक साक्षर होणे काळाची गरज असून, पंढरपूर ग्रामपंचायतीने काळाची गरज ओळखून सुरू केलेल्या या संगणक कक्ष निर्मितीचे मी अभिनंदन करतो, यापुढेही नवनवीन उपक्रम राबवले जातील, अशी आशा बाळगतो असे म्हणून विकासकार्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी सरपंच वैशाली राऊत व उपनिरीक्षक संजय गिते यांच्या हस्ते संगणक कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपसरपंच रेश्मा शेख, शेख अख्तर, महेबूब चौधरी, आशा काकाजी भोळे, मीरा गिरे, महेंद्र खोतकर,राजू उबाळे,अमर पठाण,अलका गायकवाड,हारुण पटेल, विठ्ठल सोनवणे, अक्रम पटेल आदींची उपस्थिती होती.

## जटवाडा येथे वार्षिक यात्रा महामहोत्सव व महाआरतीचे आयोजन

### १०८ दिपकांनी भगवंताची महाआरतीचे आयोजन, आचार्य कुशाग्रनंदीजी महाराज ससंघाची उपस्थिती





छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - शहरापासुन १२ कि.मी. अंतरावरील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे सालाबादाप्रमाणे वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले असुन या निमीत्त भरगच्च कार्यकम यावेळी संपन्न होणार आहे.संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा २८०१ व्या जन्म दिवस महाअर्चना एवंम महाआरती यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे। महोत्सवासाठी आचार्य कुशाग्रनंदीजी महाराज मुनि अजयऋषी महाराज, स्वस्तीश्री देवेंद्रकिर्तीस्वामी ससंघाची सानिध्यात यात्रा होनार आहे. संपुर्ण महोत्सव हा नमोकार भक्ती मंडळाच्या साग्रसींतामध्ये करण्यात येणार आहे.

सर्वप्रथम सकाळी ९.३० वाजता आहारचर्या, सकाळी १०.०० वाजता श्रीमती.बदामबाई सुंदरलालजी अजमेरा सौ. लता सुनिल अजमेरा सौ.श्रध्दा अक्षय सौ.पलक आयुष अजमेरा परिवार गारजवाला यांच्या वतीने धर्मध्वजारोहन करैन यात्रेची सुरैवात करण्यात येईल. तदनंतर १०.३० वा. मुलनायक संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा महामस्तकाभिषेक सोहळा होईल. यासाठी सौधर्म इंद्र इंद्राणी म्हणुन विनोद विजया गौरव अपेक्षा सेठी परिवार हडको हे लाभले आहे. यावेळी उपस्थित भाविकांना संजयकुमार किसनलाल, सौ.ज्योती, अभिषेक,सौ. अंकिता,मयुर,सौ.किर्तीका,पियुष महावीर पाटणी, आदेश पदमकुमार पाटणी, सिध्दांत कैलास पाटणी, पाटणी परिवार खंडाळावाला याच्या वतीने महाप्रसाद आयोजन करण्यात आले आहे. वार्षिक यात्रा कार्यकमाच्या पंचरंगी पत्रिकेसाठी ललीत,विनीत लोहाडे परिवार यांचे योगदान लाभले आहे. संध्याकाळी ७ वाजता भगवंताची महाआरती व शास्त्र वाचन चे आयोजन करण्यात आले आहे. वार्षिक यात्रेनिमीत्त मंदिर परिसरावार आकर्षक रोषणाई करण्यात येणार असुन भगवान पार्श्वनाथाच्या २८०१ व्या जन्मकल्याणक महोत्सव निमीत्त क्षेत्रावर १०८ दिपकांनी भगवंताची महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

## दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरीता नवीन वाहन क्रमांक मालिका सुरु

अहिल्यानगर, दि.२३ - दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरिता नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू करण्यात येत असून इच्छुक अर्जदारांनी २६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या विहीत शुल्काच्या धनाकर्षासह अर्ज चांदणी चौकातील नवीन इमारतीत खिडकी क्रमांक २० येथे जमा करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी केले आहे.

अर्ज सादर करताना वाहन नावावर असलेल्या व्यक्तीच्या नावाच्या अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, पॅन कार्ड, आधार कार्डला संलग्न असलेला भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांक धनाकर्ष अहमदनगर कॅम्प ब्रँच, ट्रेझरी ब्रँच कोड नं १३२९६ करिता देय असणे आवश्यक आहे.

एका पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज आला असेल त्यांची व एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आले असतील त्यांच्या पसंती क्रमांकाची यादी २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता वाजता चांदणी चौक येथील नवीन इमारतीत सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल. एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोन पेक्षा जास्त अर्ज आलेल्या यादीमधील पसंती क्रमाकांसाठी ज्यांनी अर्ज केला आहे, अशा अर्जदारांनी २७ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वाजता पसंती क्रमांक शुल्काच्या धनाकर्षाव्यतिरिक्त जादा रक्कमेचा धनाकर्ष बंद लिफाफ्यात सिलबंद करून खिडकी क्रमांक २० येथे जमा करून याच दिवशी दुपारी ३ वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनात उपस्थित राहावे.

लिलावासाठी उपस्थित राहणाऱ्या अर्जदाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने ओळखपत्र व प्राधिकार पत्रासह हजर रहावे. कार्यालयात सादर झालेले जादा रक्कमेचे धनाकर्ष अर्जदारासमोर उघडण्यात येतील. ज्या अर्जदाराने जास्त रक्कमेचा धनाकर्ष सादर केला असेल त्याला तो पसंती क्रमांक देण्यात येईल व उर्वरित कमी रक्कमेचा धनाकर्ष संबंधित अर्जदारांना परत देण्यात येईल. विहीत वेळेत अनुपस्थित अर्जदारांचा कुठलाही प्रकारचा विचार केला जाणार नाही. पसंती क्रमांकासाठी कोणत्याही अर्जदारास दूरध्वनी, भ्रमणध्वनी अथवा एसएमएस केला जाणार नाही, याची नोंद घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## 'सोयरिक ग्रुप'ने १३ वर्षांत बांधल्या २५०० विवाहाच्या गाठी

### पोपटराव सपकाळ यांची माहिती

छत्रपती संभाजीनगर, दि. २३ (प्रतिनिधी) - सध्याकाळात विवाह जुळविणे जिकरीचे काम झाले असताना 'महाराष्ट्र मराठा समाज सोयरिक ग्रुप'ने सामाजिक बांधिलकी जपत विवाह जुळविण्याचे काम आरंभिले आहे. या ग्रुपने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १३ वर्षांत २५०० विवाहाच्या गाठी बांधल्या असून, यामाध्यमातून विवाहबध्द झालेले दाम्पत्य गुण्या - गोविंदाने संसाराचा गाडा हाकत आहेत. असे सोयरिक ग्रुपचे राज्य समन्वयक पोपटराव सपकाळ यांनी सांगितले.

'मराठा समाज सोयरिक ग्रुप'च्या माध्यमातून मराठा समाजातील वधु-वरांचा मोफत परिचय मेळावा आयोजित करून विवाह गाठी बांधण्याचे कार्य करीत आहे. याच ग्रुपच्या माध्यमातून राज्यभर हे सामाजिक कार्य सुरू आहे. राज्यात मराठा समाजाचे १८० सोयरिक ग्रुप कार्यरत आहेत. या ग्रुपच्या माध्यमातून उपवर वधु-वरांचा मोफत मेळावा आयोजित केला जात आहे. याच मेळाव्यातून अनेकांचे संसार जुळले आहेत. त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रुप अधिक सक्रिय आहे. आतापर्यंत या ग्रुपने मराठा समाजातील वधु-वरांचे ३१ परिचय मेळावे यशस्वी केले आहेत. असे सपकाळ म्हणाले. छत्रपती संभाजीनगरमध्ये रविवारी आयोजित केलेला ३२ वा मेळावा आहे. या मेळाव्याची संयोजक समितीच्या वतीने जोरदार तयारी सुरू आहे.

मथुरा लॉन्स येथे रविवारी मेळावा

महाराष्ट्र मराठा समाज सोयरिक ग्रुपच्या वतीने येत्या रविवारी २९ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते ५ या वेळेत मराठा समाज वधु-वर परिचय मेळावा आयोजित केला आहे. ग्रुपच्या वतीने आयोजित केलेला हा ३२ मेळावा असून, हर्सूल जळगाव रोडवरील मथुरा लॉन्स येथे हा नि:शुल्क मेळावा होत आहे. मेळाव्याचे उद्घाटन काँग्रेसचे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते, खासदार संदीपान भुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षणाधिकारी डॉ. टी. पी. पाटील, माजी न्यायाधिश शंकरराव ढवळे, बिल्डर अॅण्ड डेव्हलपर्स संदीप चव्हाण, संतोष कावले यांची उपस्थिती राहणार आहेत.

मेळाव्यास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य समन्वयक पोपटराव सपकाळ, आयोजक भाऊसाहेब काळे, शिवाजी निकम (बीड), अंकूश पाटील मनगटे, प्रभाकर गायकवाड, मनोहर पाटील, प्रतिभा जगताप, डॉ. आशा झोंड, डॉ. उषा मोरे, मनोहर वडजे, श्रीमंत उर्किडे, वसंतराव औटी, डॉ. संतोष हारणे, देवानंद गरड, कल्याण चव्हाण, जगन्नाथ परांजे, जयकिशन वाघ, मुरलीअण्णा चौधरी, बाबुराव डकले, कृष्णा लोंखडे आदींनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २२७/२०२४.

१. शोभाबाई विलास सोनवणे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. गलवाडा (सो), ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर. २. प्रेरणा विलास सोनवणे, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे. ३. रोशन विलास सोनवणे, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत विलास शामराव सोनवणे यांचा दिनांक १२/०४/२०२१ रोजी गलवाडा (सो), ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत विलास शामराव सोनवणे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २४/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.२२/०१/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी फोजदारी न्यायालय सोयगाव.

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २२६/२०२४.

१. सुमन रामदास सुरजुसे, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. सोयगांव, ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत चिंधाबाई सांडु शिवदे यांचा दिनांक ०३/१२/२०१० रोजी सोयगांव, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ हे मयत चिंधाबाई सांडु शिवदे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आज रोजी दिनांक २४/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २०/०१/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी फोजदारी न्यायालय सोयगाव.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब क-स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ५७९/२०२४

अर्जदार : १. शाईनाथ ज्ञानदेव शिंदे वय. ४० वर्ष धंदा. शेती २. अर्जुन ज्ञानदेव शिंदे वय. ३५ वर्ष धंदा. शेती १ व २ रा. नरसापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. आशा राधाकिसान बोडखे वय. ३० वर्ष धंदा. शेती रा. शिल्लेगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्ध :-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन अॅक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला अर्जदार नं. १ ते ३ यांची आई नामे गयाबाई ज्ञानदेव शिंदे यांचे अपघात झाल्याने दि. ०७/०२/२०२४ रोजी उपचारादरम्यान शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्नालय, छ. संभाजीनगर ता.जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल नामे ज्ञानदेव दगडू शिंदे हे देखील दि. २९/०३/२०२१ रोजी मौजे नरसापूर येथे मयत झाले असल्याने अर्जदार हे मयत गयाबाई ज्ञानदेव शिंदे यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत गयाबाई ज्ञानदेव शिंदे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत गयाबाई ज्ञानदेव शिंदे यांचे अपघाती निधन झाल्याने अर्जदारांना शासकीय योजनांचा व विम्याचा लाभ मिळण्यासाठी मयत गयाबाई ज्ञानदेव शिंदे यांचे वारस प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत गयाबाई ज्ञानदेव शिंदे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत गयाबाई ज्ञानदेव शिंदे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दी नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

## जाहीर प्रगटन

**(मौजे लोहगाव बु., ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, येथील गट नं.५९ एकूण क्षेत्र ०६ हेक्टर ७० आर पोट खराब ०३ पैकी क्षेत्र १ हे. ८३ आर बाबत.)**

सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी नामे व्यंकट भानु राधाकृष्ण कोमादगीरी के., व सुप्रिया व्यंकटभानु राधाकृष्ण कोमादगीरी, रा. प्लॉट नं. २१६, एचएमटी, सतवाहना नगर, कुकतपल्ली, त्रिरुमलागिरी, कुकतपल्ली हैद्राबाद, आध्रप्रदेश-५०००७२, यांच्या मालकीची व ताब्यातील मौजे लोहगाव बु.. ता. पैठण, जि. औरंगाबाद, गट नं.५९ मधील एकुण क्षेत्र ०६ हेक्टर ७० आर पोटखराब ०३ आर पैकी १ हेक्टर ८३ आर, ही शेतजमीन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा तोंडी करार केला आहे, ज्याच्या चर्तु सिमा खालील प्रमाणे :-

पुर्वेस: बापूराव रुपेकर यांची जमीन.

पश्चिमेस :- दिलीप अशोक रुपेकर यांची जमीन.

दक्षिणेस :- विनायक कोंडीराम नरवडे यांची जमीन.

उत्तरेस : रस्ता.

वर वर्णन केलेली मिळकत ही माझे पक्षकाराने कायमस्वरुपी मालकी हक्काने खरेदी करण्याबाबतचा तोंडी करार लिहुन देणार नामे व्यंकट भानु राधाकृष्ण कोमादगीरी के., व सुप्रिया व्यंकटभानु राधाकृष्ण कोमादगीरी, यांच्या बरोवर केलेला आहे व ईसाराची रक्कमही लिहुन देणार यांना देण्यात आलेली आहे व लवकरच सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत माझे पक्षकाराचे हक्कात करण्यात येणार आहे. वर वर्णन केलेल्या मिळकतीचे मालक यांनी माझे पक्षकारास खात्री व हमी दिलेली आहे की, वर नमुद केलेली मिळकत ही निर्विवाद व र्निजोखमी आहे. तसेच सदर मिळकत ही यापुर्वी कोणासही विक्री, गहाण, दान, तारण, बक्षीस, चोळी बांगडी इत्यादी केलेली नाही व त्या मिळकतीवर कोणत्या प्रकारचा खाजगी अथवा सरकारी कर्ज बोजा, कोर्टाची डिक्री, वाटणी हिस्सा इत्यादी नाही. याऊपरही जर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप, उजर सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत असल्यास त्यांनी त्यांचा लेखी आक्षेप लेखी पुराव्यासह माझ्या कार्यालयात सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत नोंदवावा, जर सात (७) दिवसांच्या आत कोणीही कोणत्याही प्रकारचा लेखी आक्षेप लेखी पुराव्यासह आक्षेप न नोंदवल्यास माझे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्विवाद आहे असे गृहीत धरुन त्यांचे हक्कात नोंदणीकृत खरेदीखत करून घेतील. मुदतीतनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व ते आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

करीता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : २३/१२/२०२४.

मार्फत,

२३/१२/२४.

**अॅडे. विठ्ठल म. उघडे**

ऑफिसः- प्लॉट नं. १३/२, तारक हौ. सो.. बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर, मो.नं. ८००७९१९८६८

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आमदार अनुराधाताई चव्हाण यांचा सत्कार



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२४ डिसेंबर

फुलंब्री विधानसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित आमदार अनुराधाताई चव्हाण आमदार म्हणून निवडून आल्या बद्दल सोयगाव तालुका भाजपाच्या वतीने अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.यावेळी जयप्रकाश चव्हाण,सोयगाव भाजपा तालुका अध्यक्ष बद्री राठोड,सुनील गावंडे,मंगेश सोहनी,भाजपा तालुका उपाध्यक्ष सुनील ठोंबरे,दिपक पाटील,राहुल परदेशी,आदींसह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ.विक्रांत जयसवाल यांना सर्व्हिस टू रुरलं पीपल पुरस्कार प्रदान



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २४ डिसेंबर ग्रामीण भागातील रुग्णावर मोफत उपचार करून बिडीएस , एमडीएस ऑर्थोडोंटिस्ट डॉ. विक्रांत जयसवाल यांनी पाच हजार रुग्णांची सेवा केली प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सचे कुलपती डॉ . आर .विखे यांच्या हस्ते सर्व्हिस टू रुरलं पीपल पुरस्काराने डॉ.जयसवाल यांना सन्मानित करण्यात आले इंडियन ऑर्थोडोंटिक सोसायटीचे अध्यक्ष डॉ.पुनीत बटारा सचिव डॉ.संजय लाभ . डॉ.एन .जी तोष्णीवाल यांनी अभिनंदन केले

# प्रहार दिव्यांग संघटनेच्या जेहुर औराळा सर्कलपदी तेजस सातदिवे यांची नियुक्ती



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२४ डिसेंबर - प्रहार दिव्यांग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची दि.२४ रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात निवड करण्यात आली, औराळा जेहुर सर्कलपदी तेजस सातदिवे यांची नियुक्ती तालुकाध्यक्ष गणेश नलावडे यांनी केली आहे,सदर निवड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री बच्चू कडू,जिल्हा अध्यक्ष शिवाजी गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे,तालुक्यातील अंध, दिव्यांगाचे कल्याण व पुनवर्सन करण्याची जबाबदारी आपण खांद्यावर घेऊन या पदाला न्याय देऊ अशी भावना तेजस सातदिवे यांनी व्यक्त केली यावेळी प्रहार दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

# नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी मोहीमस्तरावर काम करा : जिल्हाधिकारी

अहिल्यानगर दि.२४- जिल्ह्यातील नागरिकांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी बँकांनी मोहीम स्तरावर प्रयत्न करावे आणि दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आशिष नवले, नाबार्ड बँकेचे विक्रम पठारे, रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी राजेंद्र कनीशेट्टी, विविध शासकीय विभागांचे अधिकारी आणि जिल्ह्यातील सार्वजनिक आणि खासगी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सालीमठ म्हणाले, रब्बी हंगाम सुरू झाला असून शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज मिळणे गरजेचे आहे, त्यादृष्टीने बँकांनी नियोजन करावे. मुख्यमंत्री रोजगार कार्यक्रम अंतर्गत उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रस्तावांना बँकांनी ३१ जानेवारीपर्यंत मंजुरी देऊन तातडीने निधी वितरण करावे. पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत अधिकाधिक पात्र नागरिकांना लाभ देण्यात यावा. पीएम स्वानिधी योजनेत जिल्ह्याची कामगिरी चांगली असली तरी प्रलंबित प्रस्तावावर लवकर कार्यवाही करावी.



शासनाच्या चांगल्या योजना असूनही त्याबाबत नागरिकांना बँकांनी माहिती देणे गरजेचे आहे. कृषी पायाभूत सुविधा निधी सारख्या योजनेद्वारे शेतकऱ्यांना चांगल्या सुविधा उभारता येतील. बँकांनी अशा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्यासाठी पुढाकार घ्यावा. जिल्ह्यात 'एक जिल्हा एक उत्पादन' अंतर्गत ऊस आणि दुग्धोत्पादन निवडण्यात आले आहे. बँकांनी याच्याशी निगडित प्रक्रिया उद्योग आणि व्यवसायांना प्रोत्साहन द्यावे.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत प्रस्ताव तातडीने मार्गी लावावेत. प्रस्ताव नाकारण्याची कारणे तपासून ते मंजूर होण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे. प्रस्ताव मंजूर झाल्यावर निधी वितरण अधिक काळ प्रलंबित असल्यास असे प्रकरण तपासून संबंधित बँक अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करावी.

अण्णासाहेब पाटील महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ, लिडकॉम अंतर्गत अधिकाधिक लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी संबंधित महामंडळाने पुढाकार घ्यावा आणि लाभार्थ्यांना सहकार्य करावे. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचे उद्दिष्ट गतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# ग्राहकांनी दुकानातून वस्तू घेतांना पक्के बिल पावती द्यावी

## पावती मध्ये वस्तूची गॅरंटी,वॉरंटी,विक्री परतावा सेवा बाबी नमुद असाव्यात : प्रभाकर कुळकर्णी

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२४ डिसेंबर

ग्राहकांच्या हिताचे अधिक चांगल्या प्रकारे संरक्षण व्हावे व ग्राहकांवर होण्याऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, त्याला त्याच्या हक्काची जाणीव करुन देण्यासाठी, ग्राहकाला फसवणूकीची गव्हाणी मांडता यावी,अन्याय झाला असेल तर त्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी शासनाने ग्राहक न्यायालयाची स्थापना केलेली आहे.असे प्रभाकर कुळकर्णी तालुका अध्यक्ष व ग्राहक संरक्षण समिती परिषद जिल्हा सदस्य यांनी तहसील कार्यालयातील



दालनात भाषणात मंगळवारी (दि.२४ ) डिसेंबर राष्ट्रीय ग्राहक दिन निमित्ताने बोललत होते.

यावेळी मंचावर संजय शहापूरकर तालुका उपाध्यक्ष,सुधीर कुलकर्णी तालुका संघटक,काकासाहेब सावळे नायब तहसीलदार (पुरवठा विभाग ),पत्रिके - नायब तहसीलदार (निवडणूक विभाग ),चैनसिंघ बहुरे - नायब तहसीलदार (संजय गांधी विभाग )जयवळ (अव्वल कारकून अस्थापना)पुढे कुळकर्णी म्हणतात की,ग्राहकांनी दुकानातून वस्तू घेतांना पक्के बिल पावती द्यावी पावती मध्ये वस्तूची गॅरंटी,वॉरंटी,विक्री परतावा सेवा बाबी नमुद असाव्यात सीजीएसटी,बीएसटी ,व्हीएटी,जीएसटी या सर्व बाबी बिल पावती मध्ये नमुद असेल तर ग्राहकाची लुबाडणूक अथवा फसवणूक झाल्यास त्यास त्यास ग्राहक पंचायत न्यायालयात न्याय नक्कीच मिळतो असेही कुळकर्णी आपल्या भाषणात म्हणाले.यावेळी शिवाजी दौंड,योगेश बोखारे,शेख सुलेमान,विजय पगारे,तहसील कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते या कार्यक्रमाचे सुत्र संचालन पूनम क्षीरसागर (पुरवठा निरीक्षक सोयगाव तहसील कार्यालय ) यांनी केले.

# लाखांचे टायर्स लंपास; गुन्हा दाखल

वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- ट्रान्सपोर्टच्या माध्यमातून बीकेटी कंपनीचे २५ लाख ८४ हजार ९६७ रुपये किमतीच्या टायर्स पोहच न करता दुसरीकडेच नेऊन परस्पर विक्री केल्याप्रकरणी आरोपी अझरुद्दीन रईस खान (रा. शिवपुरा, कुरावर राजगड, मध्य प्रदेश) याच्या विरुद्ध ट्रान्सपोर्ट कंपनीच्या कर्मचार्याने दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, एमआयडीसी वाळूज भागातून देशभरात विविध ठिकाणी माल पोहोचविण्याचे काम बजाजनगरातील सुरत गुडस ट्रान्सपोर्ट च्या वतीने करण्यात येते. नेहमीप्रमाणे बीकेटी कंपनीचे टायर्स पोहोचविण्याचे भाडे आल्यानंतर व्यवस्थापक मुकेश शर्मा यांनी त्यांच्या ओळखीचे आंध्रा, तेलगंणा ट्रान्सपोर्टचे मालक संतोष नेले यांच्या ट्रकमधून टायर घेऊन जाण्याचे भाडे ठरवले. त्यानुसार बीकेटी कंपनीमध्ये टायर भरून ट्रक (डीडी ०१ एफ ९२९६) लोड झाल्याचे शर्मा यांना कळवण्यात आले. ट्रक मालक-चालक असणारा आरोपी अझरुद्दीन रईस खान हा सर्व कागदपत्रे सोबत घेऊन आणि ट्रान्सपोर्ट मालक संतोष नेले यांच्याकडून भाड्यापोटी ठरलेले ४४ हजार ५०० रुपयांपैकी ३५ हजार रुपये घेऊन इन्फ्रा प्रा. लिमिटेड सतना या ठिकाणी पोहचविण्यासाठी रवाना झाला. ते टायर्स ४ ते पाच दिवसांत सतना येथे मालासह पोहोचणे अपेक्षित होते.

परंतु सतना येथे माल पोहोचलाच नसल्याचे कळाल्याने अझरुद्दीन यास फोनवर चौकशी केली असता, त्याने दुसरीकडेच मालाची विक्री केल्याचे समजले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे शर्मा यांच्या लक्षात येताच त्यांनी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाणे गाठत फसवणूक झाल्याची तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोउपनि प्रवीण पाथरकर हे करीत आहेत.

# खबरदार मांजा विक्री कराल तर गुन्हे दाखल करू !

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : मांजामुळे घातक इजा होत असल्याच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत आहे, त्यामुळे मांजा विक्री करणारे व सोबत बाळगणार्यांवर कठोर कारवाईचे पोलीस आयुक्तांकडून आदेश प्राप्त झाले आहेत. त्या धर्तीवर पोलिस निरीक्षक कृष्णा शिंदे व त्यांच्या पथकाने औद्योगिक परिसरातील कुरीअर छापा मारत झाडा-झडती घेत मांजाची वाहतूक न करण्याबाबत लेखी नोटीस जारी केली. तसेच वाळूज औद्योगिक परिसरात दुकानदार किंवा व्यक्ती नायलॉन मांजाची विक्री करताना आढळून आल्यास त्याच्यावर थेट गुन्हा दाखल करण्याचा इशारा पोलिस निरीक्षक शिंदे यांनी दिला.

चायनीज मांजा, नायलॉन मांजा, काचेचा चूर्याचे कोटिंग असलेला मांज्याच्या विक्रीवर बंदीचे आदेश वरीष्ठांकडून प्राप्त झाल्याने, नियमांचे उल्लंघन करणार्यांवर कारवाई करण्यासाठी पोलिस निरिक्षक शिंदे यांनी पोउपनि प्रविण पाथरकर, संदीप काळे, पोहेकॉ बाळासाहेब आंधळे, राजाभाऊ कोल्हे, बबलू थोरात या पथकासोबत औद्योगिक परिसरातील कुरीअर सेंटरवर छापे मारत झाडा-झडती घेतली. परंतू एकाही ठिकाणी मांजा आढळून न आल्याने लेखी नोटीसद्वारे तंबी देवून मांजा विक्रीसंदर्भात सक्त ताकीद देत मांजा विक्री करतांना आढळून आल्यास थेट गुन्हे दाखल करू, असा इशारा दिला.

# एमजीएम आणि हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ज यांच्यामध्ये सामंजस्य करार

छत्रपती संभाजीनगर, दि.२४ : महात्मा गांधी मिशन आणि हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ज, लडाख (क्ख-ङ) या दोन संस्थांमध्ये शैक्षणिक विषयासंदर्भात शनिवार, दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी कुलपती अंकुशराव कदम आणि शिक्षणतज्ञ तथा पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या प्रमुख उपस्थितीत एमजीएम विश्वस्त कार्यालय येथे सामंजस्य करार करण्यात आला.

यावेळी, महात्मा गांधी मिशन रुग्णालय व महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ.प्रविण सूर्यवंशी, एमजीएम स्कूलच्या संचालिका डॉ. अपर्णा कक्कड, अधिष्ठाता



डॉ. रेखा शेळके, प्रशासकीय अधिकारी प्रेरणा दळवी, डॉ.डॉस प्रकाश व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलपती अंकुशराव कदम म्हणाले, एमजीएम कायम विविध संस्था, विद्यापीठे यांच्याशी सामंजस्य करार करीत आले आहे. या अगोदर अनेक संस्थांशी आम्ही अशा प्रकारचे करार केले असून हा पहिल्यांदाच एका लडाख स्थित संस्थेशी आम्ही करारबद्ध होत आहोत. येत्या काळामध्ये रोजगाराभिमुख अभ्यासक्रम, तंत्रज्ञानाधारीत अभ्यासक्रम, कृषि अभ्यासक्रम, तंत्रज्ञान हस्तांतरण, संशोधन अशा प्रकारचे अभ्यासक्रम या कराराच्या माध्यमातून राबविले जातील. हा करार करीत असताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक यांनी हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ज, लडाख या शैक्षणिक आणि संशोधन संस्थेची स्थापना केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी पर्यायी शिक्षण व शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. त्यांच्या शिक्षण आणि पर्यावरण क्षेत्रातील कामगिरीची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि एमजीएम संस्थेंतर्गत सर्व संस्थांमध्ये नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती शिकविण्यात येणार आहे. यामध्ये शालेय शिक्षण, आरोग्य विज्ञान (मेडिकल, डेंटल, फिजिओथेरपी, नर्सिंग, बायोमेडिकल सायन्सेस), अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, आर्किटेक्चर, कृषी, पत्रकारिता, पर्यटन तसेच हॉटेल मॅनेजमेंट यांसारख्या विविध क्षेत्रांचा समावेश असणार आहे.

महात्मा गांधी मिशन आणि हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ज यांच्या एकत्रित येण्याने संस्थांच्या गुणवत्तेत आणि दर्जामध्ये वाढ होऊन भविष्यकालीन शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण पाऊल टाकले गेले आहे.

# युवा कार्यप्रशिक्षण योजनेचा प्रशिक्षण कालावधी व कार्यकाळ वाढवण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.२४ डिसेंबर - मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेचा प्रशिक्षण कालावधी व कार्यकाळ वाढवण्याची मागणी तरुण व युवकांनी निवेदन देऊन केली आहे. महाराष्ट्र शासनाव्दारे सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत महाराष्ट्रातील बेरोजगार तरुण युवकांना या योजनेव्दारे अल्पकालावधीसाठी रोजगार मिळवून दिला आहे. राज्य शासनाने सुरू केलेल्या योजनेतुन युवकांना शासनाच्या कामकाजाविषयी जवळून माहिती मिळवणे ती समजून घेणे शक्य झाले आहे. पण नियुक्ती झाल्यानंतर आचारसंहिता लागल्यामुळे त्या कालावधीत या युवकांना प्रशिक्षण घेण्यात व्यत्यय आला असल्यामुळे हा प्रशिक्षण कालावधी वाढवून देण्यात यावा. शासनाव्दारे हा कालावधी सहा महिन्यांचा देण्यात आला आहे. तो अकरा महिन्याचा करण्यात यावा. शासनाव्दारे प्रशिक्षण घेऊनही युवक वर्ग पुन्हा बेरोजगार होऊन नये याबाबतचा कार्यकाळ वाढवावा अशी मागणी कन्नडचे उपविभागिय अधिकारी व पंचायत समिती गट विकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी तरूण व युवकांनी केली आहे.

# बिडकीन येथे नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यावर पोलीसांची कारवाई; पाच हजाराचा मांजा जप्त

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २४ डिसेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील परिसर मध्ये तसेच बिडकीन येथील दोन किराणा दुकानात प्रतिबंधित मांजा विक्री होत असल्याच्या गुप्त माहीती नुसार पोलीसांनी पैठण वेस मारोती मंदीर जवळी साना किराणा दुकानात व तथागत नगर मधील पवित्र किराणा दुकानात धाड टाकुन मांजा जब्त केला या घटनेची अधिक माहिती अशी की मानव जीव व पक्षी यांच्या जीवीतास ईजा पोहचवणाऱ्या घातक अश्या नॉयलॉन मांजा विक्री / खरेदी वा वापरावर जिल्हाअधिकारी छ्त्रपती संभाजी नगर यांचे प्रतिबंधित आदेशाला झुगारुन गैर कायदेशीर नॉयलान मांजा विक्री ची माहिती मिळाल्याने पोलीस उपनिरीक्षक महेश



घुगे व बीट जमादार संदीप धनेधर सह. मगरे वाघमोडे यांनी धाड टाकुन अफजल अन्वर पठाण व ऋतीक बाबासाहेब हिवाळे या दोघां कडुन ५ हजार रु. किमती चा नॉयलान मांजा च्या चक्री जब्त करुन यांच्या विरोधात बिडकीन पोलीस ठाण्यात कलम २२३ व कलम पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सहाय्यक . पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

# बार असोसिएशनच्या वतीने न्यायाधीश व वकिलांना स्मरणिकेचे वितरण

## जिल्हा न्यायालयाच्या द्विशताब्दीची स्मरणिका संस्मरणीय, वाचनीय व पुढील पिढ्यांना मार्गदर्शक : न्यायाधीश अंजू शेंडे

नगर - जिल्हा न्यायालयाचे द्वीशताब्दी वर्ष व सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करून बार असोसिएशनने उत्कृष्ट काम केले आहे. त्यानिमित्त संवेदनशीलतेने काढलेली स्मरणिका ही संस्मरणीय, वाचनीय व पुढील पिढ्यांना मार्गदर्शक आहे. जिल्हा न्यायालयाचा २०० वर्षांचा वैभवशाली इतिहास हा सतत वाचला जाऊन जतन केला गेला पाहिजे. यासाठी वकील संघटनेने काम करावे, असे प्रतिपादन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.

जिल्हा न्यायालयास २०० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने गेल्या ऑगस्ट महिन्यात एका खास दिमाखदार सोहळ्याचे



आयोजन नगरमध्ये केले होते. या यानिमित्त काढण्यात आलेल्या विशेष स्मरणिकेचे वितरण प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते न्यायाधीश व वकिलांना मंगळवारी झाले. यावेळी जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, केंद्र सरकारचे वकील सुभाष भोर, वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.नरेश गुगळे व सचिव ॲड.संदीप शेळके आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष राजेश कातोरे, उपाध्यक्ष वैभव आघाव, सचिव संदीप बुरके, असोसिएशनचे पदाधिकारी, न्यायिक अधिकारी व मोठ्या संख्यने वकील उपस्थित होते.

प्रास्ताविकात ॲड.नरेश गुगळे म्हणाले, १८२३ साली स्थापना झालेल्या ऐतिहासिक जिल्हा न्यायालयाचे द्विशताब्दी वर्ष सर्वांच्या सहकार्याने व सहभागाने मोठ्या उत्साहात साजरे झाले आहे. यासाठी बऱ्याच हातांनी मदत केली. न्यायालयाच्या २०० व्या वर्षपूर्ती निमित्त जुन्या इतिहासाचे वर्णन असलेली २०० पानांची स्मरणिका प्रकाशित करण्यात आली आहे. या स्मरणिकेत वकील व न्यायाधीशांचे विविध विषयांवरील लेख, वकील खासदार असलेले स्व.उत्तमचंद बोगावत व स्व.भाऊसाहेब कानवडे यांच्या वरील लेख, सर्वाना काय मार्गदर्शन करणरे स्व.जी.जी.खान, ॲड. मेहेर यांच्या सारख्या जुन्या वकीलांच्या कार्यावर लेख यासह विविध उपयुक्त माहितीचा या स्मरणिकेत समावेश आहेत. ही स्मरणिका नव्या वकिलांना मार्गदर्शक ठरेल. कालच बार असोसिएशनच्या नव्या पदाधिकाऱ्यांची निवड झाली आहे. चांगले काम करणरे पदाधिकारी या निवडणुकीत निवडून आल्याने बार चे काम चांगले चालणार आहे,

या स्मरणिकेसाठी मुख्य संपादक अभय राजे, गौरव दांगट, सुयोग गुगळे, नितीन खैरे, रामेश्वर कराळे यांनी स्मरणिकेसाठी योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभय राजे यांनी केले, सचिव ॲड. संदीप शेळके यांनी आभार मानले. यावेळी बार उपाध्यक्ष ॲड. महेश शेडाळे, महिला सहसचिव ॲड. भक्ती शिरसाठ, खजिनदार ॲड. शिवाजी शिरसाठ, सह सचिव ॲड. संजय सुंबे, कार्यकारणी सदस्य ॲड. अमोल अकोलकर, ॲड. सारस क्षेत्रे, ॲड. विनोद रणसिंग, ॲड. देवदत्त शहाणे, ॲड.शिवाजी शिंदे, ॲड.रामेश्वर कराळे, ॲड. अस्मिता उदावंत आदींसह माजी पदाधिकारी, वरिष्ठ वकील व वकील व महिला वकील उपस्थित होते.

# वजनी गटाच्या कबड्डी स्पर्धेत राजमुद्रा क्रीडा मंडळ शिंदे पिंपळगाव (जालना) संघ प्रथम

## सोयगावचा छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळाचा संघ ठरला उपविजेता तर जय सेवालाल निबायती संघास तृतीय पारितोषिक

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२४ डिसेंबर

छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळ सोयगाव व क्रीडा भारती यांच्या सयूंक्त विद्यमाने सोयगाव येथे दि.२१ व २२ डिसेंबर ला प्रदीप चित्र मंदिर सोयगाव मैदानावर घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय वजनी गटाच्या कबड्डी स्पर्धा पार पडल्या.या स्पर्धेत दुसऱ्या दिवशी रविवारी अत्यंत चुरशीच्या व लक्षवेधी ठरलेल्या राजमुद्रा क्रीडा मंडळ शिंदे पिंपळगाव (जालना) संघाविरुद्ध छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळात रंगलेल्या अटीतटीच्या सामन्यात राजमुद्रा क्रीडा मंडळ शिंदे पिंपळगाव (जालना) संघाने प्रथम पारितोषिकासाठी बाजी मारली.त्यांनी प्रतिस्पर्धी छ्त्रपती शिवाजी क्रीडा मंडळ सोयगावच्या संघाचा अवघ्या दोन गुणांनी



पराभव केला.या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक २१ हजार रुपये त्यांनी पटकावले,तर छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळ सोयगाव यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक ११ हजार रुपये मिळवीत उपविजेता पारितोषिक मिळविले,तृतीय पारितोषिका साठी जय सेवालाल संघ निबायती यांनी ७ हजार रुपये यांनी तसेच स्व.गणेश दादा राठोड क्रीडा मंडळ जटवाडा यांनी चतुर्थ पारितोषिक ५ हजार रुपये पटकावले. त्याच प्रमाणे बेस्ट रेडर सद्दाम शेख व बेस्ट डिफेंडर आदित्य इंगळे कापूस वाडी यांनी विशेष पारितोषक मिळविले.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी (शनिवारी) दि.२१ ला राज्यातील एकूण ३६ संघानी सहभाग नोंदविला होता.सर्व संघांनी संघाने आपले क्रीडा कौशल्य पणास लावून पारितोषिक पटकावले.स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रशिक्षक आबा पवार,माजी खेळाडू गोविंदा सोनवणे,भरत पगारे,विष्णू खाकरे,बबन चौधरी,जितेंद्र चौधरी पंच कमलेश काळे, युवराज वामने,दत्तू काटोले,छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळाचे प्रशिक्षक आबा पवार,यांच्या हस्ते करण्यात आले.

या कबड्डी स्पर्धेसाठी छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळाचे माजी खेळाडू ज्ञानेश्वर वाडेकर,करीम देशमुख,अलिखा पठाण,श्रीकांत बोरसे,दिलीप पायघन,भूषण पवार,दिपक बनकर,ईश्वर जावळे,कैलास काळे,नाना वामने,अविनाश पाटील,रतन फूसे,वासुदेव जुमनाके,अनिल रोकडे,दत्तू पोटदुखे यांनी परिश्रम घेतले.

# पुरवठा अधिकारी निलेश राठोड यांचा ग्राहकदिनी सन्मान

## ९ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात केले पैसे जमा

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२४ डिसेंबर - तालुक्यात शेतकरी लाभार्थी योजनेत उत्कृष्ठ काम केल्याबद्दल कन्नड ततहसिल कार्यालयातील पुरवठा अधिकारी निलेश राठोड यांचा छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन निमित्त मंगळवारी (दि.२४) आयोजित कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. पुरवठा अधिकारी राठोड यांनी कन्नड तालुक्यातून ९ हजार ४३० शेतकरी शिधापत्रिका धारकांना जानेवारी २३ ते डिसेंबर २४ या कालावधी मध्ये १३ कोटी ५० लाख रुपयांचा लाभ थेट डिबीटी स्वरूपात लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले होते व जिल्ह्यात शेतकरी लाभार्थी योजनेत उत्कृष्ठ काम केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे होते. पुरवठा उपायुक्त अनंत गव्हाणे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले



होते. निलेश राठोड यांचे तहसीलदार विद्याचरण कडवकर , नायब तहसीलदार दिनेश राजपूत , सोनवणे , विशाल तोंडे , पवन खंडागळे आदींनी अभिनंदन केले . अद्याप जे पात्र शेतकरी लाभार्थी या डिबीटी लाभापासून वंचित आहेत त्यांना आवश्यक कागदपत्रे तातडीने तहसील कार्यालयात जमा करण्याबाबत आवाहन यावेळी करण्यात आले.

## अग्रलेख...

# ग्रामीण जनतेचा खर्च कशावर?

अन्न हा नेहमीच भारतीय समाज आणि अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. अवघ्या दशकभरापूर्वीपर्यंत देशातील दारिद्र्यरेषा माणसाला एका दिवसात किती कॅलरीजची गरज आहे आणि त्यासाठी किती खर्च करावा लागेल या आधारे ठरवली जात होती. यामुळेच जुन्या सर्वेक्षणातील खर्चाचे आकडे मुख्यतः अन्नावर केंद्रित होते. १९६० च्या दशकात, कुटुंबाच्या वार्षिक खर्चाच्या तीन चतुर्थांश खर्च फक्त अन्नावर होत असे. तथापि, लोकांकडे खर्च करण्यासाठी पैसा येऊ लागला. ते अन्नावर कमी आणि इतर गोष्टींवर जास्त खर्च करू लागले. हा बदल भारतातील शहरी भागात १९९० च्या अखेरीस दिसून आला. त्या काळात लोक अन्नापेक्षा इंधन, भाडे, शिक्षण, आरोग्य, प्रवास इत्यादींवर जास्त खर्च करू लागले होते; मात्र आता हा बदल ग्रामीण भारतातही पाहायला मिळत आहे. पहिल्यांदाच ग्रामीण भागात लोक जेवणाऐवजी इतर गोष्टींवर जास्त खर्च करू लागले आहेत. ताज्या आकडेवारीनुसार, भारतात अन्नावर होणारा खर्च आता ग्रामीण आणि शहरी लोकांच्या मासिक खर्चाच्या निम्म्याहून कमी आहे. गेल्या काही दशकांमध्ये हा वाटा झपाट्याने घसरला आहे. एका अहवालात भारतीय घरांच्या उपभोग खर्चाची तपशीलवार माहिती दिली आहे. हा अहवाल स्पष्ट करतो की, ही जगभरातील एक सामान्य प्रवृत्ती आहे. कारण लोकांचे उत्पन्न वाढते. ते शारीरिक श्रमापासून दूर जातात आणि त्यांचा अन्नावरील खर्च कमी होतो. याचा अर्थ असा की, लोक अधिक कमावू लागतात, तेव्हा ते अन्नावर कमी खर्च करतात. कारण त्यांच्याकडे इतर गोष्टींवर खर्च करण्यासाठी पैसे असतात.

उदाहरणादाखल अमेरिका आणि जर्मनीसारख्या विकसित देशांकडे पाहता येते. या देशांतील लोक त्यांच्या एकूण खर्चापैकी केवळ १५ टक्के अन्नावर खर्च करतात. याचे कारण म्हणजे तेथील लोक अधिक कमावतात आणि त्यांच्याकडे अन्नाशिवाय इतर अनेक गरजांसाठी पैसा असतो. सांख्यिकी मंत्रालयाने भारतीय कुटुंबांच्या घरगुती खर्चासंदर्भात एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार २०११-१२ च्या तुलनेत ग्रामीण भागातील मासिक खर्चातला खाण्यापिण्याचा खर्च ५३ टक्क्यांवरून ४६.४ टक्क्यांवर आला आहे. शहरी भागाबद्दल बोलायचे झाले तर या काळात अन्नधान्याचा वाटा ४२.६ टक्क्यांवरून ३९.२ टक्क्यांवर आला आहे. शहरी भागात अन्नाऐवजी अखाद्य पदार्थांचा वाटा ५७.४ टक्क्यांवरून ६०.८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. ग्रामीण भागात हा वाटा ४७ टक्क्यांवरून ५३.६ टक्क्यांवर पोहोचला आहे. लोक आता प्रवासावर जास्त खर्च करू लागले आहेत. शहरी भागात लोक दर महिन्याला वाहतुकीवर सरासरी ५५५ रुपये खर्च करतात तर ग्रामीण भारतात हा खर्च २८५ रुपये आहे. याशिवाय ग्रामीण भारत पान, तंबाखू आणि मादक पदार्थांवर जास्त खर्च करतो. २०२२-२३ मध्ये पान, तंबाखू आणि मादक पदार्थांवर दरडोई मासिक खर्च १४३ रुपये होता. १९९९-२००० मध्ये शहरी भागातील खर्चामध्ये वाहतूक खर्चाचा १०.६ टक्के हा वाटा २०२२-२३ मध्ये वाढून १४.१ टक्के झाला आहे. त्याच वेळी ग्रामीण भारतात हा वाटा आणखी वेगाने वाढला. मागील दोन दशकांमध्ये ग्रामीण भारतात सातत्याने वाढलेला खर्च टेलिव्हिजन, मोबाईल फोन, गृहोपयोगी उपकरणे इत्यादी उपभोग्य वस्तूंवर होत आहे. ग्रामीण भारत आता मनोरंजनावर पूर्वीपेक्षा दुप्पट खर्च करतो.

लोक अधिक कमावू लागले, त्यांच्याकडे अन्नाव्यतिरिक्त इतर गोष्टींवर खर्च करण्यासाठी पैसे येत आहेत. त्यामुळे अन्नावरील खर्चाचा वाटा कमी झाला आणि लोक भाडे, शिक्षण, आरोग्य, प्रवास, मनोरंजन इत्यादी जीवनावश्यक वस्तूंवर खर्च करू लागले. पूर्वी बहुतेक लोक हाताने काम करायचे (जसे की शेती, बांधकाम इ). त्यात शरीराला जास्त कॅलरीजची आवश्यकता असते. आता बहुतेक लोक ऑफिस किंवा मशीनवर काम करताना शारीरिक श्रम कमी करतात. त्यामुळे जास्त सकस अन्न खाऊन कॅलरी खर्च करण्याची गरज कमी झाली आहे. याचा परिणाम असा झाला की, अन्नावरील खर्च कमी झाला. लोक श्रीमंत होत गेले, तसतसा लोकांनी आपला आहार बदलला. तो फक्त भात किंवा रोटीपुरता मर्यादित राहिला नाही. आता त्यांनी फळे, भाज्या, दुग्धजन्य पदार्थ, मांस आणि इतर पौष्टिक पदार्थांवर खर्च करायला सुरुवात केली आहे. हे महाग असले, तरी लोकांनी त्यांचा आहारात समावेश करण्यास सुरुवात केली आहे. भारतातील सरकारी योजनांतर्गत गरीब कुटुंबांना स्वस्त धान्य (तांदूळ, गहू इत्यादी) मिळत आहे. त्यामुळे त्यांचा अन्नावरील खर्च कमी झाला आहे. परिणामी अन्नावरील एकूण खर्चही कमी झाला आहे. शहरी भागातील लोक पॅकेज्ड आणि प्रोसेस्ड फूडवर जास्त खर्च करू लागले आहेत. याशिवाय बाहेरच्या जेवणाची सवय वाढली आहे. या गोष्टी महाग असतात.

'नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिस' (एनएसएसओ) ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ग्रामीण भारतातील सरासरी दरडोई वापर खर्च (वस्तू आणि सेवांवर घरगुती खर्च-एमपीसीई) ३७७३ रुपये आहे. या खर्चाचा मोठा हिस्सा खाद्यपदार्थांवर जातो. २०२२-२३ च्या सर्वेक्षणानुसार, दरडोई उपभोग खर्चातील खर्च दोन प्रमुख भागांमध्ये विभागला आहे. तांदूळ, गहू, फळे, भाज्या, कपडे, शिक्षण, आरोग्य, भाडे, मनोरंजन, वाहतूक आदींचा त्यात समावेश होतो. सिक्कीममधील ग्रामीण भागात सरासरी 'एमपीसीई' ७,७३१ रुपये आहे आणि त्यातील एक मोठा भाग अन्नावर खर्च केला जातो. कारण सिक्कीममध्ये अन्न खर्चाचा वाटा जास्त आहे तर छत्तीसगडच्या ग्रामीण भागात, सरासरी एमपीसीई २४६६ रुपये आहे. हा खर्च इतर राज्यांपेक्षा कमी आहे. येथे अन्न खर्च तुलनेने जास्त असेल; कारण कमी उत्पन्नाच्या बाबतीत अन्नावरील खर्चाचा वाटा जास्त असतो. १९९९-२००० ते २०२२-२३ या काळात भारतातील ग्रामीण आणि शहरी भागात दरडोई उपभोग खर्चात (एमपीसीई) लक्षणीय वाढ झाली आहे. ग्रामीण भारतातील सरासरी 'एमपीसीई' १९९९-२००० मध्ये ४८६ रुपये होता. तो २००४-०५ मध्ये ५७९ रुपयांपर्यंत वाढला. २००९-१० मध्ये १०५४ रुपये तर २०११-१२ मध्ये १४३० रुपये आणि २०२२-२३ मध्ये ३७७३ वर पोहोचला. याचा अर्थ गेल्या काही वर्षांमध्ये ग्रामीण भागातील लोक अन्न आणि गैरखाद्य बाबींवर अधिक खर्च करू लागले आहेत.

शहरी भागातही उपभोगात वाढ दिसून आली आहे. शहरी भारताचा सरासरी 'एमपीसीई' १९९९-२००० मध्ये ८५५ रुपये होता. तो २००४-०५ मध्ये ११०५ रुपये, २००९-१० मध्ये १९८४ रुपये, २०११-१२ मध्ये २६३० रुपये तर २०२२-२३ मध्ये ६४५९ रुपये इतका वाढला. शहरी भागात ही वाढ ग्रामीण भागापेक्षा जास्त होती. हे दर्शवते की, शहरी लोक प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य आणि इतर सुविधांवर जास्त खर्च करीत आहेत. चांगल्या दर्जाच्या अन्नाचा अभाव असल्याने ग्रामीण भागात फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ आणि मांस, अंडी आणि कडधान्ये या प्रथिनयुक्त अन्नावरील खर्च कमी असू शकतो, कारण ते महाग आहेत. त्यांच्या कमतरतेमुळे पौष्टिकतेची कमतरता होऊ शकते; जी विशेषतः लहान मुले आणि वृद्धांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. यामुळे वाढत्या वयाबरोबर मानसिक आणि शारीरिक विकासात अडथळा येतो. पौष्टिक आहार न घेतल्यास त्यांच्यामध्ये मधुमेह, हृदयरोग, उच्च रक्तदाब आणि पचनसंस्थेचे आजार यासारख्या दीर्घकालीन आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. अशा रोगांच्या उपचारावरील खर्च वाढू शकतो आणि गरीब कुटुंबांसाठी तो अतिरिक्त भार बनू शकतो. विशेषतः मुलांमध्ये पोषणाच्या अभावामुळे शारीरिक आणि मानसिक विकासाला विलंब होतो. कमकुवत रोगप्रतिकारक शक्तीमुळे ते सहज आजारी पडू शकतात. शिवाय मुलांच्या शिक्षणात आणि ज्ञान संपादनातही घट होऊ शकते. त्यांच्या मानसिक विकासात पौष्टिक आहार महत्त्वाची भूमिका बजावत असतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# श्रीलंका आणि भारतविरोधी कारवाया

श्रीलंकेच्या संसदेत २२५ सदस्य असतात. यापैकी १९६ सदस्य जिल्हा मतदारसंघातून निवडले जातात. प्रत्येक मतदारसंघातून एकापेक्षा जास्त सदस्य (समजा ५) निवडायचे असतात. अशा मतदारसंघांना बहुसदस्यीय मतदारसंघ (मल्टिसीट कॉन्स्टिट्युएन्सी) असे नाव आहे. प्रत्येक पक्षाला (समजा तीन पक्ष आहेत) एकूण मतदानापैकी (समजा १००) प्रत्येक पक्षाला जेवढी मते मिळतील त्या मतांच्या प्रमाणात त्या पक्षाला जागांचे वाटप केले जाते. समजा अ पक्षाला ५० टक्के, ब पक्षाला ३० टक्के आणि क पक्षाला २० टक्के मते मिळाली आणि एकूण जागा १० आहेत तर जागा अनुक्रमे ५, ३, २ अशाप्रकारे अ, ब व क पक्षांना मिळतील. अशीच वाटणी सर्व मतदारसंघांच्या बाबतीत होईल. आता उरल्या २९ जागा. यांची वाटणी करण्यासाठी संपूर्ण देशभरात मिळून कोणत्या पक्षाला किती टक्के मते मिळाली हे पाहून त्या टक्केवारीच्या प्रमाणात २९ जागांचे वाटप करण्यात येईल.

या पद्धतीनुसार हिशेब होऊन निरनिराळ्या पक्षांना मिळालेल्या जागा अशा आहेत.

अ) जनता विमुक्ती पेरामुनाप्रणीत नॅशनल पीपल्स पॉवर आघाडीला एकूण ६२ टक्के म्हणजेच ६८ लाख मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून १४१ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून १८ अशा १५९ जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत १५६ जागा जास्त मिळाल्या.

ब) विरोधी पक्ष असलेल्या समागी जन बलवेगया या पक्षाला एकूण १८ टक्के मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून ३५ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून ५ अशा ४० जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत १४ जागा कमी मिळाल्या.

क) इलन्काई तमिळ अरासू कात्ची या सर्वांत मोठ्या तमिळ पक्षाला एकूण २.३ टक्के मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून ७ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून १ अशा ८ जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत ८ जागा जास्त मिळाल्या.

ड) मावळते अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांच्या न्यू डेमोक्रॅटिक फ्रंटला एकूण ४.५ टक्के मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून ३ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून २ अशा ५ जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत ५ जागा जास्त मिळाल्या.

इ) आणि माजी अध्यक्ष महिंदा राजपक्षे यांच्या श्रीलंका पाडुजन पेरामुना पक्षाला एकूण ३.१ टक्के मते मिळाली. जिल्हा मतदारसंघातून २ जागा आणि राष्ट्रीय मतदारसंघातून १ अशा ३ जागा मिळाल्या. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत ९७ जागा कमी मिळाल्या. उरलेल्या जागा डझनावारी पक्ष आणि अपक्षात वाटल्या गेल्या आहेत.

या निवडणुकीच्या अगोदर श्रीलंकेत अध्यक्षपदाची निवडणूक पार पडली होती. त्या निवडणुकीत स्वतंत्र उमेदवार, विद्यमान अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे, समागी जन बलवेगया पक्षाचे उमेदवार आणि विरोधी पक्षनेते साजित प्रेमदासा आणि डावीकडे झुकलेल्या सिंहली वर्चस्ववादी एनपीपीचे चीनसमर्थक मार्क्सवादी उमेदवार अनुरा कुमारा दिसानायके यांच्यात लढत झाली. कुणाही एका उमेदवाराला मतदानाच्या पहिल्या फेरीत ५० टक्क्यांचा जादुई आकडा गाठता आलेला नव्हता. पहिल्या फेरीत अनुरा कुमारा दिसानायके (ऊर्फ एकेडी) वय वर्ष ५५ यांना ४२.३६ टक्के म्हणजेच सुमारे ५६ लाख, साजित प्रेमदासा यांना ३२.७२ टक्के म्हणजेच सुमारे ४३ लाख, तर रानिल विक्रमसिंघे यांना १७.२५ टक्के म्हणजेच सुमारे २३ लाख मते मिळाली व ते तिसरे ठरल्यामुळे बाद झाले. पुढे दिसानायके आणि साजित प्रेमदासा यातच पुढचा पसंतिक्रम वाटला गेला आणि दिसानायके विजयी झाले. अख्खा युरोप आज उजवीकडे वळू पाहात असताना श्रीलंकेने स्वीकारलेला हा उरफाटा वाम मार्ग आश्चर्य वाटावा असा आहे.

नुकत्याच अध्यक्षपदी निवडून आलेल्या अनुरा कुमारा दिसानायके यांनी अध्यक्षीय निवडणुकीपाठोपाठ आता पार्लमेंटच्या निवडणुकीतही नेत्रदीपक यश मिळवून दाखविले आहे. अशाप्रकारे देशाच्या राजकारणावर त्यांनी आपली पकड चांगलीच पक्की केली आहे. दिसानायके हे मूळचे मार्क्सवादी विचारांचे कट्टर पुरस्कर्ते राहिलेले आहेत. एकेकाळी त्यांचा जनता विमुक्ती पेरामुना (जेव्हीपी) हा पक्ष सुद्धा सिंहली वर्चस्ववादी राजकारण करीत असे. पण श्रीलंकेत भडकलेला भयंकर वांशिक हिंसाचार काहीही साध्य करू शकला नाही याची त्यांना जाणीव झाली. अनेक सिंहली नेत्यांनाही असाच साक्षात्कार झाला. दिसानायके त्यांच्या पक्षाने तर शांततेच्या मार्गाने व लोकशाही पद्धतीने कार्य करण्याची घोषणा करून ती अमलात आणली.

दिसानायके यांनी स्थापन केलेल्या आघाडीला २०२४ च्या निवडणुकीत १५९ जागा मिळाल्या. याचा अर्थ असा होतो की तमिळ भाषक मतदारांनीही या आघाडीला समर्थन दिले आहे. डाव्या विचारसरणीच्या एनपीपीने श्रीलंकेतील उत्तरेकडे असलेल्या जाफना जिल्ह्यात विजय मिळवून इतिहास घडवला आहे. कारण जाफना भागात तमिळांची संख्या जास्त आहे. दिसानायके यांचा पक्ष देशाच्या दक्षिणेकडील भागातील एक प्रमुख सिंहली पक्ष आहे. दक्षिणेकडील सिंहली पक्षाने उत्तरेतील तमिळबहुल भागात असे यश प्रथमच प्राप्त केले आहे. या पक्षाला एकेकाळी आक्रमक सिंहली-बौद्ध राष्ट्रवादी मानले जायचे. पण श्रीलंकेतील भाषावाद कमी होतो आहे. आता सिंहली आणि तमिळ यातील दुरावा कमी होत गेला आणि सर्वसमावशकतेच्या धोरणाचा अवलंब झाला तर ती फार मोठी सकारात्मक बाब ठरेल. श्रीलंकेच्या नवीन पार्लमेंटमध्ये निर्माण झालेले पक्षांचे बल बघितले की, श्रीलंका डावीकडे वळू पाहते आहे, हे स्पष्ट होते. याला भारताचा आक्षेप असण्याचे कारण नाही. फक्त नवीन राजवट चीनच्या इशाऱ्यावर नाचणारी असू नये, अशी मात्र भारताची अपेक्षा आहे.

वर्षभरापूर्वी दिसानायके यांनी भारताला भेट दिली होती. त्यावेळी श्रीलंकेत निवडणुका व्हायच्याच होत्या. या दोन देशांत मैत्रीचे संबंध असावेत यावर त्यांनी तेव्हा भर दिला होता. त्यांचा हा मुद्दा शंभर टक्के बरोबर होता आणि आहे. पण त्यासाठी श्रीलंकेलाच आपले चीनच्या तालावरचे नाचणे थांबवावे लागेल. श्रीलंका भारताचा शेजारी देश आहे. त्याचा उपयोग भारतविरोधी कारवायासाठी होऊ नये हे तेव्हा त्यांना मान्य होते. आता सत्तेवर आल्यावरही आपली प्रत्यक्षात हीच भूमिका असेल, असे आश्वासन त्यांनी नुकतेच पुन्हा एकदा दिले आहे.

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# संगणक युगात क्वांटम घडविणार क्रांती

जशी जशी प्रगतीची दारे उघडत गेली, त्याच प्रमाणामध्ये मानवाच्या गरजाही वाढत गेल्या. त्यानंतर संगणकाच्या दुनियेत सुपर संगणकाने प्रवेश केला अन् पुन्हा एक नवीन क्रांतीचे युग सुरू झाले. त्यानंतर या संगणकाच्याही काही मर्यादा असल्याने त्याही पलीकडे जाऊन काही वेगळा शोध लावण्याची जगामधील शास्त्रज्ञांची होड लागली. या शोधामध्ये गुगलच्या हाती एक अफाट शक्ती लागली असून, त्यामुळे जग पुन्हा एकदा संगणकाच्या घडणाऱ्या क्रांतीसाठी सज्ज झाले आहे. गुगलने क्वांटम कॉम्प्युटिंगसाठी विलो नावाची चिप तयार केली आहे.

आजमितीस जगामध्ये अस्तित्वात असलेल्या सर्वाधिक सुपरफास्ट संगणकाला जे गणित सोडवायला करोडो वर्ष लागतील तेच गणित हे चिप काही क्षणांत सोडवेल असा दावा गुगलने केला आहे. क्वांटम कॉम्प्युटिंगच्या क्षेत्रामधील हा एक प्रचंड मोठा शोध असून, तयार करण्यात आलेल्या सर्वाधिक चांगला प्रोसेसर मानला जात आहे. क्वांटम कॉम्प्युटिंग म्हणजे भौतिकशास्त्रामधील मूलभूत कणाच्या तत्त्वांचा वापर करून एक शक्तिशाली संगणक तयार करण्याचा प्रयत्न होय. हा संगणक एवढा शक्तिशाली असेल की, तो मानवाच्याही कल्पनेबाहेर असणार आहे. मागील दहा वर्षांपासून गुगलची एक चमू यावर संशोधन करीत आहे. तब्बल दहा वर्षांनंतर सुपर संगणकावर मात करणारे नवीन तंत्रज्ञान गुगलच्या हाती लागले आहे. सध्या जगामध्ये जे सर्व संगणक प्रचलित आहे, ते सर्व बायनरी कोडवर आधारित आहेत. त्यामध्ये फक्त ० आणि १ चा वापर केला जातो. त्यांना बिट्स म्हटले जाते. परंतु, गुगलच्या विलो चिपमध्ये क्युबिट्सचा वापर केला गेला आहे. त्यामध्ये क्वांटम मेकॅनिक्समधील तत्त्वांचा वापर करून ० आणि १ यांचा एकाचवेळी अथवा वेगवेगळा वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे सध्या अस्तित्वामध्ये असलेल्या सुपर संगणकाला सुद्धा शक्य नसलेल्या गोष्टी अवघ्या काही मिनिटामध्ये करण्याची किमया हे सगणक करू शकते, असा गुगलचा दावा आहे. क्वांटम कॉम्प्युटिंगचे वैशिष्ट्य असलेल्या सुपर पोझिशनमध्ये क्युबिट्स आपल्या दोन आधारभूत अवस्थांच्या लिनियर कॉम्बिनेशनमध्ये अस्वित्वात राहू शकतात. क्वांटम संगणक तयार करणे ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नक्कीच नाही. या संगणकाचा आकार एखाद्या ऑक्टोपससारखा विचित्र असून, हा संगणक उणे २५८.१५ एवढ्या थंड तापमानावर ठेवावा लागतो. अंतराळामध्ये असणाऱ्या तापमानापेक्षाही हे तापमान कमी आहे. या संगणकामध्ये क्युबिट्सचा वापर केला जात असल्यामुळे कमी क्युबिट्समध्ये भरपूर माहिती साठविली जाऊ शकते. तसेच ती अधिक वेगानेही प्रोसेस केली जाऊ शकते. हे क्युबिट्स ट्रॅप्ड आयन्स, फोटॉक्स किंवा अणूच्या अर्ध कणांपासून बनलेले असू शकतात.

क्वांटम संगणकामध्ये याच सूक्ष्म कणांचा वापर केला जातो. हे क्युबिट्स अतिशय वेगवान असले तरी ते फार संवेदनशील आहेत. त्यामुळे या संगणकामध्ये अल्गोरिदम चालविताना चुका होण्याचे प्रमाण सर्वाधिक होते. संशोधनातला हा सर्वाधिक मोठा अडथळा असला तरी विलो चिप विकसित करताना प्रोसेसिंगचा वेग वाढवून चुकांचे प्रमाण कमी केल्याचे गुगलने म्हटले आहे. क्वांटम संगणकामध्ये जेवढे क्युबिट्स जास्त तेवढे चुकांचे प्रमाण कमी असल्याचेही गुगलने जाहीर केले आहे. क्वांटम संगणकामुळे अतिशय गुंतागुंतीच्या व क्लिष्ट गोष्टी समजून घेता येतील. भौतिकशास्त्रामधील जी गुंतागुंतीची समीकरणे सोडविण्यासाठी आजपर्यंत जगात साधनेच उपलब्ध नव्हती, ती चुटकीसरशी सोडविता येतील. या संगणकामुळे नवीन औषध शोधण्यासाठीच्या संशोधनालाही वेग येऊ शकतो. इलेक्ट्रिक कारच्या चांगल्या बॅटरीपासून तर न्यूक्लिअर रिॲक्टरपर्यंत सर्व आव्हानांसाठी त्याची मदत होण्याचा अंदाज गुगलचे अभियांत्रिकी विभागाचे उपाध्यक्ष हार्टमट नेव्हन यांनी म्हटले आहे. रॅण्डम सर्किट सॅम्पलिंग नावाची प्रक्रिया करून विलो चिपचा वेग आणि अचूकता सुपर संगणकाच्या तुलनेत तपासून पाहण्यात आली आहे. जगामधील अडचणी सोडविण्याची क्षमता क्वांटम संगणकामध्ये येण्यासाठी कदाचित अजून बरीच वर्षे लागू शकतात. या क्वांटम संगणकाचा वापर चुकीच्या गोष्टीसाठी होण्याची भीतीही शास्त्रज्ञांनी वर्तविली आहे. आपला डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी आर. एस. ए. एनक्रीप्शन केले जाते. सुपर संगणक किंवा साध्या संगणकाला हे एनक्रीप्शन भेदता येत नाही. परंतु, एनक्रीप्शन भेदण्यासाठी या क्वांटम संगणकाचा वापर केला जाऊ शकतो, अशी भीतीही तज्ज्ञांना वाटत आहे.

९८८१७१७८५६

## प्रासंगिक

**श्यामकांत पात्रीकर**

# दिरंगाईने ग्राहक न्याय वंचित!

२४ डिसेंबर १९८६ रोजी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी व राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांनी ग्राहक संरक्षण कायद्यावर स्वाक्षरी केली. त्यामुळे दरवर्षी भारतात २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करतात. त्यानंतर संसदेने पारित केलेल्या क्रांतिकारी ग्राहक संरक्षण कायद्याला मंजुरी दिली आणि भारतीय ग्राहक चळवळीत नवचैतन्याची लाट आली.

**ग्राहक कायद्याची गरज :** १९७२ च्या दुष्काळानंतर भारतातील सर्वसामान्य माणसाची परिस्थिती बिकट होती. भाववाढ, अन्नधान्याची टंचाई, भेसळ याद्वारे ग्राहकाची लूट सुरू होती. १९७८ च्या निवडणुकीत ग्राहकांनी त्यांचे मागणीपत्रकच जाहीर केले. त्यात ग्राहकांसाठी स्वतंत्र न्यायालये, ग्राहक संरक्षण कायदा आणि स्वतंत्र ग्राहक कल्याण मंत्रालयाची मागणी करण्यात आली होती. अनेक न्यायमूर्ती आणि कायदेतज्ज्ञांशी विचारविनिमय करून एक मसुदा तयार करण्यात आला. केंद्र सरकारने हा मसुदा कायद्यात रूपांतरित करावा, ही आग्रही मागणी ग्राहक संघटनांनी केली. शेवटी २४ डिसेंबर १९८६ रोजी हा मसुदा 'ग्राहक संरक्षण विधेयक' म्हणून राष्ट्रपतींच्या सहीने मंजूर झाला. तत्पूर्वी, एप्रिल १९८५ मध्ये युनायटेड नेशन्सने ग्राहक संरक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली होती. त्यात संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांना ग्राहक कायदा करण्याची सूचना केली गेली होती. ग्राहकांच्या शोषणमुक्तीसाठी कुठल्याही राजकीय पक्षाचा आधार न घेता, कोणताही बंद, उपोषण, धरणे, तोडफोड न होता संसदेत पारित झालेला हा एकमेव कायदा होय. त्यामुळे तो ग्राहक कायदा चळवळीतील एक मैलाचा दगड ठरलाय! ३१ कलमे असलेल्या या ग्राहक संरक्षण कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट होते, बाजारात ग्राहकांची होणारी फसवणूक, शोषण यापासून सर्वसामान्य ग्राहकांचे संरक्षण करायचे. तसेच ग्राहकांच्या सहा हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हेही या कायद्याचे उद्दिष्ट होते. या उद्दिष्टपूर्तीसाठी या कायद्यात एकीकडे जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ग्राहक संरक्षण परिषदांची तरतूद केली, तर दुसरीकडे याच तीन स्तरांवर ग्राहकांच्या तक्रार निवारणासाठी ग्राहक आयोगांची (ग्राहक न्यायालयांची) निर्मिती केली गेली. निवारणाची यंत्रणा ही सोपी, सुटसुटीत आणि जलद असेल, असेही उद्दिष्ट ठरवून तक्रार निवारण हे सर्वसाधारणपणे तीन ते पाच महिन्यांत होईल, असेही निश्चित करण्यात आले. प्रचलित न्याय प्रक्रियेत जसा कायद्याचा कीस काढला जातो, तो न काढता सरळ, सोप्या, सुलभ पद्धतीने तक्रार निवारण व्हावे, यासाठी न्यायिक अधिकाऱ्याशिवाय समाजातील दोन प्रतिष्ठित व्यक्तींची ग्राहक आयोगांवर नेमणूक करण्याचीही तरतूद करण्यात आली. दिवाणी आचारसंहिता आणि भारतीय एव्हिडन्स ॲक्ट या तक्रार निवारणाला लागू असणार नाही, असेही या कायद्यात स्पष्ट करण्यात आले. इतकेच काय, तर या आयोगासमोर बाधित ग्राहक वकील न देता स्वतः किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत बाजू मांडण्याची तरतूदही करण्यात आली. थोडक्यात, ग्राहकांच्या हातात अल्लादिनचा दिवा दिला गेला. साहजिकच सर्वच ग्राहक संघटनांनी या ग्राहक संरक्षण कायद्याचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. साधारणपणे १९८८ च्या सुमारास सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे देशात हळूहळू सर्वत्र ग्राहक न्यायालये कार्यरत झालीत. त्यानंतरची पाच, दहा वर्षे हा ग्राहक चळवळीचा सुवर्णकाळ ठरला. ग्राहकांच्या अनेक तक्रारींचे जलद आणि सोप्या पद्धतीने निवारण होताना दिसू लागले. दुसरीकडे अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर ग्राहक हितैषी निर्णय येऊ लागले. या सर्वांचा परिणाम म्हणजे 'ग्राहक' म्हणून एक चेहरा आपल्याला मिळाला. बाजारातील 'गिऱ्हाईकाचा ग्राहक' झाला. रेल्वे, महानगर टेलिफोन निगम, गृहनिर्माण संस्था असो वा विमा कंपन्या अथवा वीज कंपनी असो, या सर्व कंपन्या ग्राहक संरक्षण कायद्यात अंतर्भूत असून, त्यांच्या सेवांमध्ये त्रुटी अथवा निष्काळजीपणा आढळल्यास ग्राहकाला त्यांच्याविरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्यात दाद मागता येईल, असा स्पष्ट निर्वाळा या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने दिला. इतकेच नव्हे, तर जिथे एखाद्या सार्वजनिक अथवा सरकारी कंपनीला, ग्राहकाला कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे नुकसान भरपाई देण्याचे आदेश झाले, तर ती नुकसानभरपाई संबंधित कर्मचारी/अधिकाऱ्याकडून वसूल करण्यात यावी, असेही स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने या ऐतिहासिक निर्णयात दिलेले आहेत. ग्राहक चळवळीच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा असा पथदर्शी निर्णय म्हणायला हवा. या निर्णयाची दखल सर्व सरकारी आस्थापना आणि सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना घ्यावीच लागली आणि त्यांनी त्यांच्या ग्राहकविषयक धोरणात आमूलाग्र बदल करून ग्राहक सेवा ग्राहकाभिमुख करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली. ग्राहक संरक्षण कायद्याचे हे फार मोठे यश मानले जाते. वैद्यकीय सेवा या ग्राहक संरक्षण कायद्यात अंतर्भूत आहेत की, नाही, याबाबतही मोठा कायदेशीर विवाद उभा राहिला होता. यावर आपण वैद्यकीय सेवा ग्राहक कायद्यात अंतर्भूत आहेत, अशी सुस्पष्ट भूमिका घेऊन मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीमच राबवली. यथावकाश सर्वोच्च न्यायालयाने 'इंडियन मेडिकल असोसिएशन विरुद्ध व्ही. पी. शांता' या केसमध्ये आपल्याच भूमिकेवर शिक्कामोर्तब केले आणि वैद्यकीय सेवा आणि डॉक्टर्स हे ग्राहक संरक्षण कायद्यात अंतर्भूत आहेत, असे स्पष्ट केले. इतकेच नव्हे, तर सरकारी अथवा पालिकेच्या कोणत्याही इस्पितळात एखाद्या रुग्णाने मोफत सेवा घेतली असेल, तरीही त्या इस्पितळात एखादा पेइंग वार्ड असेल, तर मोफत सेवा घेणाऱ्या रुग्णाला लाभार्थी ग्राहक म्हणून ग्राहक संरक्षण कायद्याअंतर्गत अशा इस्पितळाविरुद्ध त्याला मागता येऊ शकेल, असा क्रांतिकारी आदेशही सर्वोच्च न्यायालयाने या निमित्ताने दिला. नुकत्याच एका निर्णयाद्वारे सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायमूर्तींच्या न्यायासनाने या निर्णयाचा पुनरुच्चार केलेला आहे. दरम्यानच्या काळात बाजारपेठांमध्ये अनेक बदल होत गेले. तंत्रज्ञानात क्रांतिकारी बदल झाले. ई-कॉमर्स आणि ऑनलाईन खरेदी, ऑनलाईन पेमेंट्स हे परवलीचे शब्द बनू लागले. त्यामुळे साहजिकच ग्राहकांना नव्या संधी उपलब्ध होत गेल्या. त्याचबरोबर ग्राहकांपुढे नवनवीन आव्हानेही उभी राहिली. सोयी जशा वाढल्या तशाच गैरसोयी आणि धोकेही वाढले.



आणि त्यामुळेच हा सर्व विचार करून संसदेने २०१९ मध्ये अधिक व्यापक असा नवा ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ पारित केला आणि जून २०२० पासून तो प्रत्यक्षात ३१ कलमांचा जुना ग्राहक संरक्षण कायदा जाऊन १०७ कलमांचा नवा ग्राहक संरक्षण कायदा अंमलात आला.

ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ आणि २०१९ मुळे ग्राहकांना त्यांचे अधिकार निश्चितच मिळाले. त्यामुळे ग्राहक जागृतीही बऱ्यापैकी झाली, असे म्हणायला हरकत नाही. पण प्रत्यक्षात जेव्हा ग्राहकांवर अन्याय होतो, त्याची फसवणूक होते, तेव्हा ग्राहक न्यायालय या ग्राहकाला खरोखरच अल्पावधीत सोप्या, सुटसुटीत पद्धतीने न्याय देऊ शकतो का, याचे उत्तर आजही नकारार्थी सापडते.

**प्रशासकीय औदासीन्य :** ग्राहक संरक्षण कायदा झाला परंतु त्याची अंमलबजावणी मात्र जवळपास दुर्लक्षित असल्याने ग्राहक आयोगांवर कोणाचाच वचक नसल्याचे लक्षात आले आहे. प्रकरणे प्रलंबित असून, ग्राहक संरक्षण कायद्याच्या उद्दिष्टालाच छेद गेला आहे. राष्ट्रीय ग्राहक दिन सर्वत्र मोठ्या प्रमाणात साजरा होणे आवश्यक असताना प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

९८८१७१७८४६

## वाचक पत्रे

### वाचनालयातील पुस्तकांना वाचकांची प्रतीक्षा

वाचन हे मानवी मनाचे टॉनिक आहे. एकदा वाचनाची आवड निर्माण झाली की ती आवड व्यक्तीला आपोआप पुस्तकांकडे घेऊन जाते. एक चांगले पुस्तक हातात आले की ते पुस्तक पूर्ण वाचून झाल्याशिवाय चैन पडत नाही. एकानंतर एक चांगली व दर्जेदार पुस्तके वाचली की व्यक्तीची वैचारिक पातळी वाढते. पुस्तके वाचनाचा छंद जीवनाला कलाटणी देतो. मोबाईलच्या चक्रव्यूहात अडकून जीवनाचा सत्यानाश करण्यापेक्षा आजच्या तरुणांनी वाचनाचा छंद जोपासला पाहिजे. ग्रंथालयातील पुस्तके आजच्या तरुणांची आतुरतेने वाट पाहत आहेत. सुदैवाने मला माझ्या कॉलेज जीवनात पुस्तके वाचनाचा छंद जडला होता. माझ्या वाचन छंदाचे बीज शालेय जीवनात पेरण्यात आले होते. स्वांतत्र्यसैनिक कालिदासराव देशपांडे आणि विज्ञानाचे शिक्षक गणेशराव गुळवे गुरुजी यांनी मला अवांतर वाचनाचे महत्त्व पटवून दिले होते.



रामजी सुभेदार यांनी आर्थिक परिस्थिती बिकट असूनही पुस्तके विकत घेऊन ती पुस्तके डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाचायला दिली आणि जगातील अन्य भाषांतील अनेक ग्रंथ वाचून बाबासाहेब जागतिक कीर्तीचे ज्ञानी बनले. त्यांनी पुस्तकांसाठी घर बांधले. हे वाचकांसाठी खरोखर प्रेरणादायी आहे. आजच्या काळात गावोगावी ग्रंथालये आहेत. त्यातील कपाटांमध्ये खूप पुस्तके आहेत. पण पुस्तके वाचणारे वाचक संख्येने फार कमी आहेत. ती पुस्तके वाचकांची आतुरतेने वाट पाहत आहेत. म्हणून आजच्या तरुणांनी पुस्तके वाचनाचा छंद जोपासला पाहिजे, वाचन चळवळ टिकवून ठेवण्यासाठी पुस्तके वाचली पाहिजेत.

**बबन गुळवे**/९५४५४४२६४८

### देवाने दिलेले आधार कार्ड अपडेट करा

आम्ही भारतातील जे जीवन जगत आहोत ते भारत सरकारने आणि देवाने आपल्याला दिले त्या आधार कार्डवर! आपल्याजवळ आधार कार्ड नसेल तर, आपण असून नसल्यासारखे आहोत. आणि देवाने जर आपल्याला विविध प्रकारे आधार दिला नसता, त्याचे अदृश्य कार्ड आपल्याकडे नसते तर आपले काय झाले असते, काही सांगता येत नाही.

आपली नाममात्र ओळख भारत सरकारचे आधार कार्ड करून देते परंतु खरी ओळख नाही करून देत. आपले खरे कर्म त्यात दिसून येत नाही. परंतु देवाकडे जे आपले आधारकार्ड असते, त्यात आपले चांगले वाईट कर्म लिहिले असतात. त्यामुळे आपली ओळख त्या देवाला माहीत असते. दर दहा वर्षांनी आपले आधार कार्ड सरकार अपडेट करावयास सांगते. आपले नाव किंवा इतर काही बदल झाला असेल तर किंवा चेहरा किंवा बोटाचे ठसे बदलले असेल तर आधार कार्डचे नवीनीकरण करणे आवश्यक असते. ते केले नाही तर आपली बँक किंवा इतर सरकारी कामे होत नाहीत. आपली सर्व आर्थिक आणि सरकारी या आधार कार्डशी जोडली असतात. आधार कार्ड भारताचे जरी असले तरी काही मोठे लोक भारताविरुद्ध बोलतात तेव्हा त्याचे नवल वाटते. कारण आपले कर्म या आधार कार्डशी जोडलेले नसतात. परंतु देवाने आपले आधार कार्ड तयार केले असते, त्या कार्डाशी आपले चांगले वाईट कर्म जोडले असतात आणि त्यानुसार आपल्याला चांगली किंवा वाईट फळे प्राप्त होत असतात. हे देवाचे कार्ड आपल्याला रोज अपडेट करावे लागते. सुखी, शांत आणि पवित्र जीवन जगण्यासाठी आपले भारत सरकारचे आधार कार्ड राष्ट्रभक्तीशी आणि देवाचे आधार कार्ड ईश्वरभक्तीशी पूर्णपणे जोडले जाणे गरजेचे आहे. त्याशिवाय आपले आणि आपल्या भावी पिढीचे जीवन कधीच पूर्णपणे समृद्ध होऊ शकणार नाही एवढे मात्र निश्चित.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

### मंत्रिपदाचा कालावधी अडीच वर्षे नको

१५ डिसेंबरला महाराष्ट्र राज्याच्या महायुतीच्या २३४ विजयी आमदारांपैकी ३९ आमदारांचा मंत्री म्हणून शपथविधी नागपुरात संपन्न झाला. या ३९ मंत्र्यांमध्ये भाजपा १९, शिवसेना ११ व राष्ट्रवादी काँग्रेसचे ९ मंत्री झाले आहेत. ज्या आमदारांना मंत्रिपद मिळाले नाही, त्यांना पण मंत्रिपदाचा लाभ मिळण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी मिळालेले मंत्रिपद अडीच वर्षे करण्यात येईल असे सुचविले आहे. या सूत्राने पण निवडून आलेल्या सर्व आमदारांना मंत्रिपदाची संधी मिळणार नाही. ५ वर्षे करावयाची कामे अडीच वर्षांत पूर्ण न झाल्यास आधीच्या मंत्र्यांची जबाबदारी राहणार नाही. त्यामुळे हा अडीच अडीच वर्षे मंत्रिपद देण्याचा विचार न करता इतर आमदारांना महामंडळांचे संचालक अथवा तत्सम पदे देण्यात यावी असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)





बीड : संक्रांतीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर खण, सुगडे, येळी, बोळके बनविण्याची लगबग बीड येथील कुंभारवाड्यात सुरु आहे. (छाया:कृष्णा शिंदे)

# लोकमान्य टिळक विद्यालयात अहिल्यादेवी होळकर यांच्या चित्रप्रदर्शनीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२४ डिसेंबर**

पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षा निमित्त दि.२३ डिसेंबर २०२४ सोमवार रोजी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील विविध प्रसंगावर आधारित चित्रप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्म त्रिशताब्दी स्थानिक समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन अंबाजोगाई येथील राजर्षी शाहू नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष राजू मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी भा.शि.प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा शालेय समिती अध्यक्ष आप्पाराव यादव,गावचे सरपंच तथा त्रिशताब्दी समितीचे स्थानिक सदस्य श्रीहरी होळकर व मुख्याध्यापक संजयराव विभूते उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक विभूते यांच्या हस्ते मान्यवारांचे यथोचित स्वागत करण्यात आले.यावेळी चित्रप्रदर्शनी आयोजनामागची संस्थेची भूमिका नितीन चौधरी यांनी स्पष्ट केली.चित्रप्रदर्शनीत अहिल्यादेवी यांच्या जीवनातील विविध प्रसंग ज्यात बालपण,शिक्षण,विवाह सोहळा,राजमुद्रा, राज्यकारभार, नाणी, हस्ताक्षर, शिक्का, इंदोरचा राजवाडा, मंदिर जीर्णोद्धार आदी सामाजिक, शैक्षणिक,राजकीय, धार्मिक कार्यावर आधारित सचित्र माहिती फलक ठेवण्यात आले होते. प्रमुख मान्यवर,विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, पालक आणि स्थानिक ग्रामस्थ यांना अहिल्यादेवी यांच्या समग्र जीवन कार्याची ओळख या प्रदर्शनीच्या माध्यमातून करून देण्यात आली.



# शनिवारी श्रीमती गो.कुं.यो.कन्या विद्यालयाचा सुवर्ण महोत्सव वर्षाचा सांगता समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२४ डिसेंबर**

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ कन्या विद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव वर्षाचा सांगता कार्यक्रम शनिवार २८ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती विद्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

मुख्य कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रख्यात मराठी अभिनेत्री व मराठी शाळांच्या सदिच्छा दूत चिन्मयी सुमीत या उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर हे असतील. सकाळी साडे आठ वाजता पू.स्वामी रामानंद तीर्थ स्मृति स्थळ ते विद्यालय परिसर शोभायात्रा तर दुपारच्या सत्रात गुणवंत विद्यार्थिनी गौरव, मुलाखती व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख/संचालिका प्रा.डॉ.जयश्री मोटेगांवकर ह्या तर समन्वयक म्हणून विभाग प्रमुख/ संचालिका ऍड. कल्याणी विर्धे आणि साधना कुंकूलोळ, मधुवंती साने,डॉ.क्षमा देवशटवार,अपेक्षा कसबे आदी पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.



**मराठी अभिनेत्री चिन्मयी सुमीत यांची उपस्थिती**

विद्यालयाच्या माजी विद्यार्थीनींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष ऍड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य,सहसचिव प्रा. भीमाशंकर शेटे व सर्व शालेय पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीडच्या सोहम लांगोरे व श्रेयस शिंदे याचे बुद्धिबळ स्पर्धेत नेत्रदीपक यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ डिसेंबर**

पाथर्डी येथे संपन्न झालेल्या दोन दिवशीय खुल्या राज्यस्तरीय स्पर्धेत बीडचा चि.सोहम अतुल लांगोरे याने १५ वर्षाखालील वयोगटामध्ये ७ पैकी ६.५ गुण घेत ७ पैकी ६ सामने जिंकून एका सामन्यात बरोबरी करत अपराजित राहून दुसरा क्रमांक पटकावला.तसेच बीड येथील चि.श्रेयस अनिल शिंदे याने देखील १२ वर्षे वयोगटाच्या आतील स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळवत यश संपादन केले.



आनंद चेस क्लब आयोजित खुल्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा दि. २१ ते २२ डिसेंबर यादरम्यान झालेल्या प्रतिवार्षिक व तीस वर्षाच्या अखंडित असलेल्या स्पर्धेचे कुशल मार्गदर्शक डॉ.विनय कुचेरिया हे करत आहेत यामध्ये एकूण १६८ खेळाडूंनी सहभाग घेतला होता ज्यात २८ आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडू खेळत होते. या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. बुद्धिबळ प्रशिक्षक श्री.दत्तात्रेय क्षीरसागर व श्री. रामप्रसाद शेंडगे यांचे त्यांना विशेष मार्गदर्शन लाभले.बीड शहरातील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. विजय मोहनराव कट्टे यांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंचा काल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सोहम अतुल लांगोरे, श्रेयस अनिल शिंदे,अभिनव नितीन राऊत, आदित्य बाळू घुगे, विश्व संजय होळकर व कु.वेदा विजय कट्टे हे विद्यार्थी व प्रशिक्षक उपस्थित होते.

# महाराष्ट्र संघात साक्षी शिंदे, अनुश्री स्वामी यांची निवड

## बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून दोघींचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ डिसेंबर**

जळगाव येथे सुरु असलेल्या १९ वर्ष आतील निवड चाचणी स्पर्धेत १०० रनची खेळी करून निवड समितीचे लक्ष वेधले. साक्षी उत्कृष्ट उजव्या हाताने फलंदाजी करते. बीड संघाकडून खेळताना चमकदार कामगिरी साक्षीने केली आहे. साक्षीला अमित गोरे , मोहित परमार, माही परमार यांचे मार्गदर्शन लाभले.

साक्षीला तिचे वडील भाऊसाहेब व आई वनमाला यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन २३ वर्ष वयाच्या मुलींच्या संघात बीडच्या अनुश्री स्वामी यांची निवड झाली असून पुणे याठिकाणी सुरु असलेल्या २३ वर्ष आतील निवड चाचणी स्पर्धेत ६२ आणि ३९ रनची खेळी करून निवड समितीचे लक्ष वेधले. अनुश्री उत्कृष्ट उजव्या हाताने फालदाजी करते अनुश्री लहानपणी पासून राकेश उबाळे क्रिकेट अकॅडमी व अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमी याठिकाणी क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे. अनुश्रीला राकेश उबाळे, मोहित परमार, माही परमार, स्वप्नील कोकाटे यांचे मार्गदर्शन लाभले. बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखुदे,



# शेतकऱ्यांच्या उत्पादनाला हमीभाव देऊन खरेदी केंद्र सुरू करा, विजेचे खाजगीकरण थांबवा– प्रा. सुशीलाताई मोराळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ डिसेंबर**

दिनांक २३ डिसेंबर हा राष्ट्रीय शेतकरी दिवस संपूर्ण देशात साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य म्हणून आज संपूर्ण देशभर संयुक्त किसान मोर्चा नवी दिल्ली व किसान संघर्ष समितीच्या वतीने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना शेतकऱ्यांच्या मागण्याचे निवेदन प्रा. सुशीलाताई मोराळे राष्ट्रीय उपाध्यक्ष किसान संघर्ष समिती मार्फत देण्यात आले.

दिवसेंदिवस शेती क्षेत्र कार्पोरेटच्या घशात घातले जात आहे. पंजाब हरियाणा चा शेतकरी या विरोधात लढत आहे. जगजीत सिंग डल्लेवाल हे प्राणांतिक उपोषणाला बसले आहेत. त्यांचा प्राण धोक्यात आला आहे मात्र सरकार एक शब्द बोलत नाही. देशात एनडीए ३ सरकार लोकशाहीची हत्या करत आहे. पंजाबच्या शंभू व खनौरी सीमावर हजारो शेतकरी बसले आहेत. अश्रुधुर, रबराच्या गोळ्या, पाण्याचे फवारे त्यांच्यावर सोडले जात आहेत.



अत्यंत क्रुरतापूर्वक हे आंदोलन चिरडण्याचे काम सुरू आहे. गेली २१ दिवस ग्रेटर नोएडाच्या जेलमध्ये शेतकऱ्यांना कोंडले आहे. नवी राष्ट्रीय कृषी बाजार नीती, तीन कृषी कायदे मागच्या दाराने पुन्हा पारित करण्याचा डाव आहे. राष्ट्रीय कृषी बाजार नीती परत घ्या, डिजिटल कृषी मिशन व राष्ट्रीय सहयोग निती वापस घ्या. संघर्ष करणाऱ्या शेतकरी संघटनांशी चर्चा करा. एम एस पी ऋण माफी धोरण अंमलबजावणी करा. विजेचे खाजगीकरण थांबवा. शेतकऱ्यांचे दमण तंत्र थांबवा. जगजीत सिंग डल्लेवाल चे प्राण वाचवा. आशा मागण्या किसान किसान संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती द्रोपदी मुरमु यांना निवेदन देवुन केल्या आहेत. या निवेदनावर माऊली शिरसाट बबनराव आंधळे राजेंद्र दराडे सचिन गवळी उद्धव सानप तुकाराम बारगजे इत्यादींच्या सह्या आहेत

# श्री संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये आनंद नगरी व पालक मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२४ डिसेंबर**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये सोमवारी सकाळी आनंद नगरी व पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. तालुक्यातील चिंचोली माळी येथील नामांकित श्री संस्कार इंग्लिश मध्ये सोमवारी सकाळी मोठ्या उत्साहाच्या भरात आनंद नगरी अर्थात खरी कमाई व पालक मेळावा संपन्न झाला.



सध्याच्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक गुणवत्ते बरोबरच विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक, सामाजिक, व व्यावसायीक दृष्टीकोनातून सर्वांगीण विकास व्हावा म्हणून श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्या वतीने वेगवेगळे उपक्रम राबविले जातात आणि त्याचाच एक भाग म्हणून आनंद नगरी कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी आप आपले छोटे छोटे खाऊचे दुकाने थाटली तर त्यांच्या पालकांनी त्यांना सहकार्य केले.या कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते विद्येची देवता माता सरस्वती च्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. राम मेजर राऊत हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून चिंचोली माळीच्या सरपंच सौ रोहिणीताई सुनील देशमुख, शहाजी अप्पा गलांडे, मा. मुख्याध्यापक, दिलीप तात्या देशमुख, सुनील बापू देशमुख, मा. सरपंच, चंद्रकांत भुजबळ, चेअरमन से.स.सो.वरपगाव, दिलीप गायकवाड सर, मा.मुख्याध्यापक, ह.भ.प.आबा महाराज मेहरकर, अभिषेक भिसे, केज तालुका सचिव रा. युवक कॉ. शप गट, ह.भ.प मृदंगदास सुनील महाराज गालफाडे, बाळु राऊत, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार रामदास तपसे, पत्रकार दशरथ चवरे, रोहन गलांडे, आनंद पंढरीनाथ वनवे, त्रिंबक प्रभु सारुक, बापुराव तोंडे, प्रमोद नखाते सर, हे होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष राम मेजर राऊत, शहाजी अप्पा गलांडे, ह.भ.प.आबा महाराज मेहरकर, चंद्रकांत भुजबळ यांनी शाळेविषयी गौरवोद्गार काढले व उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे व मुख्याध्यापिका सिमा काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन निलम जोगदंड यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका सिमा काळे, शिक्षीका देशमुख मॅडम, जोगदंड मॅडम, गायकवाड मॅडम, खंदारे मॅडम, शिंदे मॅडम, सेविका चंदनशिव तसेच संस्थेचे पदाधिकारी अमोल गलांडे, रामराजे गलांडे, अमजत पठाण, लहु राऊत, श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन चे प्रशिक्षक अदित्य गलांडे, अनिकेत सोनवणे, ओम हुंबे अभिषेक पुरी यांनी परिश्रम घेतले.यावेळी मोठ्या प्रमाणात पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# संस्कार विद्यालयमध्ये गणित व क्रीडा उत्सवाचा श्री गणेशा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ डिसेंबर**

संस्कार विद्यालयाच्या माध्यमातून विभागांतर्गत अत्यंत हर्ष उल्हासामध्ये संस्कार वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त क्रीडा उत्सव तथा श्री श्रीनिवास रामानुजन यांच्या जन्मदिनानिमित्त गणित उत्सवाच्या श्रीगणेशा करण्यात आला . आरंभी संस्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक सतीश गंधेसर यांनी थोर भारतीय गणितज्ञ श्री श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे माल्यार्पणाने पूजन केले . याप्रसंगी संस्कार गणित विषय समितीचे प्रमुख गणित तज्ञ विनायक जोशी रघुनाथ तावरे आनंद मोरे श्रीमती कुलकर्णी एस एस तसेच क्रीडा शिक्षक रामदास भोसले बापू भोसले यांचे विशेष उपस्थिती होती .विनायक जोशी यांनी याप्रसंगी श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन कार्याचा वेध घेतला व विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील मौलिक प्रसंग विशद करून सांगितले .भारतीय गणितज्ञ रामानुजन यांच्या स्वलिखित गणितांच्या वह्यांवर परदेशामध्ये परदेशी लोक गणितामध्ये संशोधन करत आहेत हा आपल्या भारतीयांचा गौरव आहे असे प्रशंसनीय उद्गार श्री विनायक जोशी यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले .तसेच विविध भारतीय गणित तज्ञांची ओळख ही या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली . रघुनाथ तावरेसर यांनी गणित विषयावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धा घेतली व विद्यार्थ्यांशी संवाद साधला व विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली. क्रीडा शिक्षक बापू भोसले यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

### जळगाव सपकाळ येथील मेंढपाळांचि मुलगी झाली पोलीस उपनिरीक्षक

# लता च्या यशाने गावकऱ्यांची मान उंचावली!

**तभा वृत्तसेवा**
**पारध/रामसिंग राजपुत**

येथील एक गरीब कुटुंबातील मुलगी कुमारी लता सुरेश सावळे ही नाशिक येथून पीएसआय चे प्रशिक्षण पूर्ण करून गावाला भेट दिली असता त्यानिमित्त गाव गावकऱ्यांच्या व समाजाच्या वतीने तिचा नागरिक सत्कार करण्यात आला कु लता सुरेश सावळे तिचे वडील शेती करून जोडधंदा म्हणून मेंढी पालन करतात तशी घरची परिस्थिती हालाखीची असतानाही आपली मुलगी आणि मुलगा शिक्षणापासून वंचित न ठेवता त्यांना शिक्षण देण्याचे काम केले लता सावळे हिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा




परिषद शाळा जळगाव आणि ८वी ते १२ पर्यंतचे शिक्षण विनय माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय या ठिकाणी झाले आपल्याला काहीतरी करून दाखवायचं त्या उद्देशाने तिने पुढील पदवीचे शिक्षण संभाजीनगर येथे घेऊन २०२३ चे मुख्य परीक्षेत तिला यश मिळाले तिने नाशिक येथे आपले ट्रेनिंग पूर्ण पूर्ण केले आणि तिची पहिली पोस्टिंग मुंबई शहरात झाली आहे.

त्यानिमित्त गावकऱ्यांच्या वतीने आणि समाजाच्या वतीने तिचा नागरिक सत्कार करण्यात आला आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या याप्रसंगी गावातील समाजातील महिला मंडळ पुरुष मंडळ व तरुण मित्र मंडळ विद्यार्थी हजर होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राग मित्र मंडळ श्री जी एस सपकाळ श्री आर ए सपकाळ अमोल सपकाळ शिवा दौड भास्कर सावळे संतोष सपकाळ संतोष सावळे पत्रकार गोकुळ सपकाळ पत्रकार गणेश नाना गोकुळ सपकाळ पत्रकार गणेश राजगुरू पत्रकार ज्ञानेश्वर सपकाळ पत्रकार विनोद सपकाळ यांनी परिश्रम घेतले सूत्रसंचालन राग मित्र मंडळाचे सदस्य यांनी केले.

# मोफत गणवेश वाटप योजनेची अंमलबजावणी शाळा व्यवस्थापनाकडे

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या पहिली ते ८ वी मधील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटपास दिरंगाई होत असल्याकारणाने पूर्वीप्रमाणे म्हणजे शालेय व्यवस्थापन समितीमार्फत गणवेश वितरण करण्यात यावे, अशी मागणी प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने केली होती, त्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाने शासन आदेश निर्गमित केला असून पूर्वीप्रमाणे शालेय व्यवस्थापनं समितीमार्फत गणवेश वाटप करण्यास मंजुरी दिली आहे.

चेरेंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी मधील शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती व जमातां प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांना – मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत तसेच, राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेंतर्गत सर्व पात्र शाळांतील इ.१ ली ते इ.८ वी मध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सन २०२३– २४ या शैक्षणिक वर्षामध्ये राज्य शासनाने कापड पुरवठा करून शिलाई ही महिला बचत गट व शालेय व्यवस्थापन समितीकडे देण्यात आली होती. शैक्षणिक सत्र संपत येऊन देखील अद्याप गणवेश वितरण झाले नव्हते. गणवेश वितरण झाल्याने विद्यार्थी गणवेशापासून वंचित असल्याची बाब प्रहार शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने शासनाच्या लक्षात आणून देत तातडीने गणवेश वितरण करून पुढील शैक्षणिक सत्रासाठी गणवेश वितरण हे शालेय व्यवस्थापन समितीकडे द्यावे, अशी मागणी केली होती. २०२५–२६ या शैक्षणिक वर्षापासून मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात यावी. त्यासाठी रक्कम शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर विहीत कालावधीत वर्ग करण्यात यावी. विद्यार्थ्यांना एकसारखे दोन गणवेश देण्यात येतील. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेशाची रचना आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाची हाफ पँट अशी असावी. तसेच, विद्यार्थिनींच्या गणवेशाची रचना आकाशी रंगाचा बाह्य असलेला गडद निळ्या रंगाचा, पिनो फ्रॉक, आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाचा स्कर्ट तसेच, ज्या शाळांमध्ये विद्यार्थिनीना सलवार–कमीज असा गणवेश असेल तर गडद निळ्या रंगाची सलवार व आकाशी रंगाची कमीज असावी.'

## संक्षिप्त

### लाभार्थ्यांनी तहसील कार्यालय कागदपत्र जमा करावेत –नायब तहसीलदार

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील एपीएल केशरी शिधापत्रिकाधारक १४४७ शेतकरी लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती १५० रुपये या दराने रोख रक्कम हस्तांतरित करण्यात आली असून उर्वरित लाभार्थ्यांनी कागदपत्र तहसील कार्यालयात जमा करावेत असे आवाहन नायब तहसीलदार श्री राजपूत यांनी केले आहे. ही योजना शासनाने २८ फेब्रुवारी २०२३ पासून सुरु करण्यात आली असून सदर योजने अंतर्गत मंठा तहसिल कार्यालयांतर्गत एकून एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक लाभार्थी २४३६ आहेत त्यापैकी १४४७ लाभार्थ्यांना १५० रु प्रति व्यक्ती या दराने रोख रक्कम हस्तांतरण करण्यात आली आहे. मंठा तहसिल अंतर्गत असलेल्या रास्तभाव दुकानातील ९८९ लाभार्थी रोख रक्कम हस्तांतरणापासून बाकी आहेत. तहसिल प्रशासनाच्या वतीने तहसिलदार श्रीमती सोनाली जोंधळे व पुरवठा नायब तहसीलदार श्री राजपूत यांनी बाकी असलेल्या लाभार्थ्यांना तहसिल कार्यालयात सदर योजनेसाठी आवश्यक असलेले कागदपत्रे जमा करावेत असे आवाहन करण्यात आले आहे.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अवमान प्रकरणी काँग्रेस पक्षातर्फे शुक्रवारी मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा करण्यात आलेला अवमान आणि लोकसभा अधिवेशनात भारतीय राज्य घटनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त चर्चेला गालबोट लावण्याचा प्रयत्न भाजपाकडून करण्यात आला. ही बाब न्याय, समानता आणि आत्मसन्मानाच्या आदर्शाचा अपमान असून याप्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन भारतातील जनतेची माफी मागावी यासाठी जिल्हा व शहर काँग्रेसच्या वतीने येत्या २७ डिसेंबर शुक्रवार रोजी जालन्यात मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी आज येथे एका पत्रकार परिषदेत दिली.

येथील हॉटेल अंबर मध्ये आज सोमवारी सकाळी आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष तथा मा.आ. कैलास गोरंट्याल,जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र राख,जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा नंदाताई पवार, अविनाश चव्हाण, अण्णासाहेब खंदारे,सोपान सपकाळ,अब्दुल रफीक, शेख शाशोद्दीन, शेख खलील आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना राजाभाऊ देशमुख म्हणाले की, भारतीय राज्यघटनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेतोल विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी लोकसभा सभापतींना संविधानावर चर्चेची विनंती करणारे पत्र लिहिले होते. हा प्रस्ताव मान्य झाला आणि संसदेत विचारविनिमयाची प्रक्रिया सुरु झाली. मात्र, संविधानावरील गंभीर आणि महत्त्वपूर्ण चर्चा म्हणून जी सुरुवात झाली ती भाजपच्या राजकीय संधिस्तधूरणाच्या लज्जास्पद प्रदर्शनात बदलली. प्रसंगी प्रतिष्ठा जपण्याऐवजी भाजपने विरोधी पक्षनेत्यांची बदनामी आणि अपमान करण्यसाठी व्यासपीठाचा गैरवापर केला. त्याहूनही वाईट म्हणजे केंद्रीय गृहमंत्र्यांनी राज्यघटनेचे मूलतत्त्व आणि त्याचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अवहेलना केली असून आंबेडकर, आंबेडकर असे वारंवार म्हणणे ही एक फैशन बनली आहे. देवाचे नाव इतक्या वेळा घेतले असते, तर त्यांना सात जन्मासाठी स्वर्ग मिळू शकला असता असे धक्कादायक विधान करत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केवळ डॉ. आंबेडकरांचा अपमान केला नाही तर तर थेट भारताच्या आत्म्याचा अपमान केला असा आरोप देशमुख यांनी यावेळी केला.

महत्वाची बाब म्हणजे हे भयंकर बर्तन असूनही भाजप आणि त्यांच्या नेतृत्वाने कोणताही पश्चाताप दाखवला नाही. त्याऐवजी, ते अशा विधानाचा बचाव करून कोट्यवधी भारतीयांच्या भावनांना ठेच पोहचवली. ही घटना काही वेगळी नाही, ही घटना आरएसएसची ऐतिहासिक आणि वैचारिक भूमिका प्रतिबिंबित करते, ज्याने भारतीय राज्यघटनेला सुरुवातीपासूनच विरोध करून राज्य घटनेचा उघडपणे अपमान केला आहे.

भाजपने जात जनगणना करण्यास नकार दिल्याने उत्तरदायित्वाची भीती आणि भारतातील उपेक्षित समुदायांबद्दलचा द्वेष अधिक अधोरेखित होतो, जात जनगणनेला विरोध दर्शवून भाजपने आपली दलितविरोधी, आरक्षणविरोधी भूमिका उघड केली. ज्यामुळे समानता आणि न्यायाच्या घटनात्मक तत्त्वांना धक्का बसला, अनुसूचित जाती आणि उपेक्षित समुदायांच्या उत्थानाबद्दलचे त्यांचे पोकळ वक्तृत्व त्यांच्या कृतींद्वारे विरोधाभासी आहे, ज्याचे उद्दिष्ट पद्धतशीर असमानता राखणे आणि या गटांना प्रतिनिधित्व आणि संसाधनांमध्ये त्यांचा हक्काचा वाटा नाकारणे आहे. न्याय, समता आणि बंधुता या तत्त्वांचे रक्षण करण्यासाठी निवडून आलेले लोकप्रतिनिधी या नात्याने, संविधानाचा अवमान करण्याच्या आणि बाबासाहेबांचा वारसा कलंकित करण्याच्या या निर्लज्ज प्रयत्नांविरुद्ध आपण एकजुटीने उभे राहणे आवश्यक आहे. भारतीय राज्यपटना हा केवळ कायदेशीर दस्तावेज नाहीं, तो आपल्या लोकशाहीचा पाया आहे आणि प्रत्येक भारतीय नागरिकासाठी, विशेषतः शोषित आणि उपेक्षितांसाठी हक्कांची हमी देणारा आहे. या कृत्यांचा निःसंदिग्धपणे निषेध करतो आणि संविधानाच्या मूल्यांचे आणि डॉ. आंबेडकरांच्या संकल्पनेतील न्याय्य आणि सर्वसमावेशक भारताचे रक्षण करण्यासाठी स्वतःला पुन्हा बचन्नत्वद्ध राहण्यास कटिबद्ध आहोत. भारतातील उपेक्षितांचा आवाज ऐकला जाईल आणि संविधानावरील हल्ल्याचा प्रत्येक पावलावर प्रतिकार केला जाईल असे देखील राजाभाऊ देशमुख यांनी यावेळी स्पष्ट केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतातील जनतेची त्वरित माफी मागावी आणि गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा यासाठी दि.२७ डिसेंबर शुक्रवार रोजी जालना शहर व जिल्हा काँग्रेसच्या वतीने नूतन वसाहत भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# त्या प्रकरणाची चौकशी करून तात्काळ कारवाई करण्याची मागणी



## सकल मराठा समाजाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्गुण झालेल्या खुन व परभणी येथे पोलीस कोठडीत सोमनाथ सुर्यवंशी यांचा झालेला मृत्यू या दोन्ही घटना विषयी जाफ्राबाद पोलीस ठाणे येथील सहायक पोलिस निरीक्षक वैशालीताई देठे पवार यांना सकल मराठा समाज बांधव यांनी दिले. या निवेदनात म्हटले आहे की दिनांक ९ डिसेंबर रोजी बीड जिल्ह्यातील मसाजोग गावचे सरपंच कै. संतोष देशमुख यांचे अपहरण करुन अत्यंत क्रूरपने,अमानवीय पद्धतीने निर्दयी अशी हत्या करण्यात आली आणि आज १४ दिवस उलटूनही या घटनेतील आरोपी मोकाट फिरत आहेत. तरी आपल्या मार्फत आम्ही शासनास कळवीत आहोत की या अमानवीय कृत्यात सहभागी प्रत्येक आरोपीस लवकरात लवकर अटक करून फाशीची शिक्षा देऊन कै. संतोष देशमुख यांना व त्यांचा कुटुंबीयांना लवकरात लवकर न्याय द्यावा ही आपणास विनंती करीत आहोत,तसेच

परभणी जिल्ह्यात निघालेल्या मोर्चात पोलीस प्रशासनाने अटक केलेल्या भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू हा पोलीस कोठडीत झाला असून या घटनेचा निषेध करून आम्ही आपणास विनंती करीत आहोत या मृत्यूचा देखील सखोल तपास करण्यात यावा व स्व. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस जबाबदार अधिकारी कर्मचारी यांना कठोर शिक्षा करून त्यांचा कुटुंबीयांना न्याय लवकरात लवकर द्यावा ही आपणास विनंती करीत आहेत, अन्यथा सकल मराठा समाज यांच्या वतीने या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ व सरकारच्या विरोधात सकल मराठा समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. यावेळी तालुक्यातील सकल मराठा समाज बांधव मोठ्या

# वादग्रस्त भूखंडाच्या चौकशीचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आदेश

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

तीर्थपुरी येथील गायरान गट नं.२६२ मधील एक हेक्टर क्षेत्रापैकी नवीन बसस्थानकासाठी दिलेल्या ५० आर भूखंडाबाबत वाद निर्माण झाला आहे. बसस्थानक वगळता व्यापारी गाळ्यांमध्ये जिल्हाधिकारी यांच्या अटी व शर्ती नियम झुगारुन लिज लिलाव केल्याबाबतचे निवेदन वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते अतिश वानखेडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांच्या ११ एप्रिल २००५ च्या आदेशान्वये तीर्थपुरी येथील गायरान गट नं. २६२ क्षेत्रापैकी नवीन बसस्थानकासाठी दिलेली ५० आर जमीन तत्कालीन सरपंच ग्रा.पं. तीर्थपुरी (ता. घनसावंगी) यांना बसस्थानकासाठी हस्तांतरित केल्याचे दिसून येत असल्याचे निवेदनात नमूद केले होते. दरम्यान, तीर्थपुरी येथे महाराष्ट्र शासनाच्या नावे असलेल्या गट नंबर २६२ मध्ये एकूण १ हेक्टर जमीन असून, त्यातील बसस्थानकाला दिलेल्या ५० आर जमीन वगळता उर्वरित ७० आर जमीन कुठे गेली ? असा प्रश्न आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी बसस्थानकाला दिलेल्या ५० आर जमिनीवर नियम व अटी, शर्तीचा भंग झाला का ? याबरोबरच भविष्यात पुन्हा वाद उद्भवू नये म्हणून उर्वरित ७० आर जमिनीवर कोणी अतिक्रमण केले का ? त्याबाबतही सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

# दु:खीनगर व मनियार मोहल्ला येथील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**तभा प्रतिनिधी**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील दु:खी नगर व मनियार मोहल्ला येथील अनेक युवक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक २३/१२/२०२४ रोजी शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष तथा मौलाना आझाद विकास महामंडळाचे सदस्य शहा आलमखान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य आण्णासाहेब चितेकर, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शिवचरण बाळराज, जालना तालुका अध्यक्ष संतोष ढेंगळे, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर हंडे, भटक्या विमुक्त



जमातीचे जिल्हाध्यक्ष विजय सोनवणे, दलित आघाडीच्या जिल्हाध्यक्ष कांचन शिरभे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शेख युनाफ शेख अमान अली,साहिल मनीयार,अमेर भाई ,मोसिन लक्की,हारुण भाई, कुरेशी जावेद , शेख साईल मणियार, मोहसीन शेख ,अब्दुल समीर देशमुख, शाकिर शेख ,जावेद बागवान, हबीब फारुखी, सरफराज खान, मिनाज खान, शहेबाज खान, सय्यद नवीद, शेख नदीम ,जमील अहमद, शेख अमजद,शेख शाहिद मणियार, शेख जुनेद,अहमद सय्यद कुरेशी ,जावेद बागवान, हरून , जोहान मुसा, शेख जावेद, हनीफ मणियार ,शेख अब्राहम ,शेख अजीज, शेख अमीर, शेख निहाल मणियार ,शाहिद मणियार ,शेख जुनेद, शेख रेहान,राहील पठाण, शेख सोहेल, सोफिया खान, शेख फय्याज,शेख इजाझ,अझर देशमुख यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### परतूर रेल्वे संघर्ष समितीच्या विविध मागण्यांची दखल

# परतुर रेल्वे स्टेशनचे काम कासवगतीने प्रवाशांची कसरत!

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने डॉ. स्वप्नील बी. मंत्री अध्यक्ष व सर्व सदस्यांच्या वतीने परतुर रेल्वे स्टेशन वर अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत चालु असलेले वाल कंपाऊंड, लिफ्ट, शेडचे काम अत्यंत कासवगतीने चालू असुन प्रवासी वर्गाना मोठ्या प्रमाणात अडचण होत असुन कामाचा दर्जा चांगल्या प्रकारे करावे जेणेकरून प्रवाश्यांना धोका निर्माण होणार नाही. या कामावर वरीष्ठ अधिकारी यांनी पाहणी करून चौकशी करावी जेणेकरून कामाला गती येइल ह्या विविध मागण्यांची दखल घेण्यात आली असून कामाची गती वाढवून लवकरच वरिष्ठ अधिकारी कामाची पाहणी करण्यासाठी येतील असे रेल्वे मंत्रालयाकडून सांगण्यात आले.

त्यासोबतच डॉ. मंत्री यांनी रेल्वे स्टेशन इमारत श्री लक्ष्मी नृसिंह हेमाडपंथी मंदिर पद्धतीत करावेत ही केलेली सूचना स्वीकारण्यात आली असून त्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात येवून परतूरचा



सांस्कृतीक वारसा जपण्यात येईल असे नमूद केले आहे. प्रवासी सुरक्षा व सुविधा बद्दल केलेल्या मागण्यांची दखल घेतल्याबद्दल रेल्वे मंत्रालयाचे डॉ. स्वप्नील मंत्री, अर्जुन पाडेवार, डॉ सुधीर आंबेकर, डॉ हरिप्रसाद ढेरे, निहित सकलेचा, सखाराम कुलकर्णी, सौरभ बगड़िया, रघुनाथ बहिवाळ, गौतम कोटेचा, राजेश देवढे, रवी मुंदडा, डॉ शीतल लाहोटी, सचिन काटे, नारायण मुंदडा, अनिरुद्ध कातारे, पवन अग्रवाल, बाळू सोळंके, रवी दायमा, बालाप्रसाद जेथलिया, डॉ दिपक कंदोई, जयंत हतवनकर, दुर्गेश पोद्दार, अनिल अग्रवाल, भरत आंबेकर, आनंद बगड़िया, आनंद कोटेचा, अजित पोरवाल, डॉ दर्शन मंत्री, अभिजीत जोशी, प्रशांत डोम, धन्यवाद मानलेत.

### शेतकऱ्यांच्या फळबाग पिक विम्यांची रक्कम तात्काळ अदा करुन

# ज्ञानराधा मल्टीस्टेट बँकेच्या ठेवीदाराच्या ठेवी परत करा आ.नारायण कुचे यांची विधानसभेत मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतीनीधी**

जालना जिल्ह्यातील फळबाग पिक विमाची रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ अदा करुन ज्ञानराधा मल्टीस्टेट बँकेच्या ठेवीदाराला ठेवी तात्काळ ठेवीदारांना तात्काळ देण्याची मागणी बदनापूर–अंबड विधानसभा मतदार संघाचे आ.नारायणराव कुचे



यांनी नागपुर येथील हिवाळी अधिवेशनाच्या औचीत्याचा मुद्यावरुन विधानसभा अध्यक्षाकडे केली.

यावेळी नागपुर येथील हिवाळी अधिवेशनात आ. कुचे म्हणाले की, जालना जिल्ह्यातील शेतकऱ्याचे फळबागाचे, व झाडाचे व पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे परंतु पिक विमा कंपनीने काही निवडक शेतकऱ्यांनाच पिकविमा दिला असून उर्वरीत काही शेतकऱ्यांना अद्याप पिकविमा कंपनीने दिलेला नाही तरी राज्यशासनाने याबाबत पिक विमा कंपनीला सुचना देवून पिकविमा शेतकयांना तात्काळ देण्याची मागणी केली तसेच जालना जिल्ह्यातील बदनापूर व अंबड ज्ञानराधा मल्टीस्टेट बँकेच्या साडेतिन लाख ठेवीदारांच्या ठेवी असुन यामध्ये शेतकरा, कामगार व सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या ठेवी असुन त्या ठेवी संबधीत ठेवीदारास तात्काळ अदा करण्यात येवुन बँकेच्या दोषी संचालक वर तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी आ.नारायण कुचे यांची विधानसभेत राज्यशासनाकडे केली आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# वाहनासाठी रिफ्लेक्टर वापरा आणि अपघात टाळा : अभिजीत राऊत

**▶▶ सायकली, दुचाकी बैलबंड्याना रिफ्लेक्टर लावा**

**▶▶ प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत रस्ता सुरक्षा सप्ताह**

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २४ डिसेंबर**

रस्ता सुरक्षा सप्ताह अंतर्गत आज नांदेडच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत जिल्ह्यातील साखर कारखान्यातील वाहनचालकांसोबत रस्ता सुरक्षा संदर्भातील संवाद साधण्यात आला. स्वतः जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी वाहन चालकांना भेटून त्यांना रस्ता सुरक्षा विषयक सूचना केल्या.

नांदेड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात साखर कारखान्यामध्ये सध्या ऊसतोड करून ऊस पोचवण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामुळे हजारो ट्रॅक्टर ट्रॉल्या गावागावातून प्रवास करतात.या ट्रॅक्टर ट्रॉल्यांना कोणताही अपघात होऊ नये, यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड यांच्याकडून रस्ता सुरक्षा सप्ताह राबविण्यात आला आहे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय कुमार अहिरे,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संदीप निमसे व त्यांच्या अन्य सहकार्यांनी यासंदर्भात आज सर्व साखर कारखान्याच्या वाहन चालकांची वेगवेगळ्या ठिकाणी वाहतूकदारांशी संपर्क साधला.

स्वतः जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी उपप्रदेशक परिवहन अधिकारी संदीप निमसे यांच्यासोबत लोहा येथील साखर कारखान्यामध्ये वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी ऊस वाहतूक करताना रिफ्लेक्टर कापड व रिप्लेक्टिव्ह रेडियम टेप ट्रॅक्टर वर लावण्यात यावा असे आवाहन केले. रात्रीच्या अंधारामध्ये अनेक वेळा ट्रॅक्टरचे इलेक्ट्रॉनिक रिफ्लेक्टर, लाईट काम करत नाहीत अशावेळी अपघात होण्याची शक्यता असते त्यामुळे रिफ्लेक्टिव्ह रेडियम टेप आणि रिफ्लेक्टर कापड याचा वापर करण्याबाबतच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.



यासंदर्भात साखर कारखान्यातील वाहतूक व्यवस्थेची संपर्क साधला असला तरी अन्य

छोटी वाहने सायकली बैल बंड्या व दुचाकी वाहने चालवताना रिफ्लेक्टिव्ह रेडियम टेपचा अधिकाअधिक वापर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनयकुमार अहिरे यांनी केले आहे. अल्प किमतीच्या या रिफ्लेक्टर मुळे रात्रीच्या वेळी मोठी सुरक्षा प्रदान होते. तसेच नागरिकांनी रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी लावण्यात आलेल्या रिफ्लेक्टरची सुरक्षाही सामाजिक जाणीवेतून करावी, सुरक्षा आदेशाचे पालन करावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

श्री अहिरे यांनी भारतामध्ये होत असलेल्या अपघातांची संख्या बघता प्राथमिक सूचनांचे देखील पालन महत्त्वपूर्ण ठरते त्यामुळे रिफ्लेक्टिव्ह रेडियम टेप रिफ्लेक्टर कापड मोठ्या संख्येने वापरण्यात यावा असे, आवाहनही केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### चाडावार यांचा वाढदिवस साजरा

**किनवट**-व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिनकर चाडावार यांचा वाढदिवस ठिकठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला असून या निमित्त आमदार भीमराव केराम यांच्या निवासस्थानी केक कापून व सत्कार करून वाढदिवसाचे अभिष्टचिंतन करण्यात आले. व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून किनवटच्या व्यापारवृद्धीत दिनकर चाडावार यांचे मोठे योगदान आहे असे मत आ.केराम यांनी या प्रसंगी बोलताना व्यक्त केले आहे. व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष तथा किनवट नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष दिनकर चाडावार यांचा वाढदिवस २३ डिसेंबर रोजी ठिकठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त आमदार भीमराव केराम यांच्या निवासस्थानी वाढदिवसाचा छोटेखानी कार्यक्रम साजरा झाला. यावेळी आ. भीमराव केराम यांनी दिनकर चाडावार यांचा सत्कार केला व केक भरऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दिनकर चाडावार यांच्या सर्वसमावेशक व नियोजनबद् कार्यामुळे किनवटची बाजारपेठ वृद्धिंगत झाली. निवडणूक काळातील त्यांची सा घटनात्मक बांधणीचा पक्षाला मोठा फायदा झाला असे मत आ भीमराव केराम यांनी याप्रसंगी व्यक्त केले.यावेळी करपुडे पाटील, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, गोविंद अंकुरवाड यांची उपस्थिती होती. आर्य वैश्य समाज तसेच किनवट शहरातील विकासप्रेमी नागरिकांच्या वतीने कृष्णप्रिय गोशाळेतही दिनकर चाडावार यांचा वाढदिवस साजरा केला असून जयराम कंचरलावार यांनी वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

### श्री खंडोबा देवाचा वार्षिक महोत्सव

**नायगांव**-तालुक्यातील चिटमोगरा सकल समाज बांधवांच्या वतीने.प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षामध्ये चिटमोगरा स्थळी स्थापित असलेले सकल बहुजानाचे आराध्य दैवत श्री क्षेत्र खंडोबा देवाचा आजवार्षिक महोत्सवाचे मोठ्या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन केले आहे. बिलोली तालुक्यातील चिटमोगरा येथील सकल धनगर समाज बांधव व सकल ग्रामस्थांच्या पुढाकाराने गेल्या अनेक वर्षापासूनची आजतागायत ची परंपरा ही कायम ठेवीत येथे स्थापित असलेले तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र खंडोबा देवाचा दि.२४ डिसेंबर रोजी मंगळवार वार्षिक महोत्सव असुन.या वार्षिक महोत्सवाचे औचित्य साधून येथील सकल चिट मोगरा ग्रामस्थांच्या सहकार्याने मंगळवारी सकाळी ७वाजता मल्हारी मार्तंड या विजयी ग्रंथाची सुरुवात बाखु महाराज बाचोटीकर यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली तर मल्हारी सप्तशती पारायण नायगांव कर यांच्या हस्ते करण्यात आले.तद्नंतर दिनांक.२५ डिसेंबर रोजी बुधवार सकाळी९ वा.श्री योगेश महाराज बेटमोगरेकर यांच्या हस्ते अभिषेक होईल. यंदाच्या वर्षातील येथील श्री क्षेत्र खंडोबा देवाचा वार्षिक महोत्सवाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार रविंद्र चव्हाण , आ. जितेश अंतापुरकर, माणिकराव लोहगांवे , मिनल ताई खतगांवकर, संजय बेळगे , शिवकांत मैलारे, श्रीनिवास नरवाडे,रवि पा खतगांवकर ,शिवाजी पाच पिंपळीकर, प्रभाकर पेन्टे, उषाताई आनंदराव जिंके, विठ्ठल माने , माल्लु पेटेकर ,विश्वनाथ अब्दागिरी, गंगाधर प्यादेकर, अंबादास शिनगारे, हाणमंत गाजले, आकाश कोकणेसह, आदि मान्यवरांची या वेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या प्रमुख मान्यवरांच्या सत्कार कार्यक्रमा नंतर लगेचच चिटमोगरा गावातील मुख्यरस्त्यावरुन अटकळी धानोरा, आदमपूर, खतगांव, नरसी, रोळगाव, चिटमोगरा येथील सुप्रसिध्द गावचे वारू मंडळीच्या उपस्थितीमध्ये येथील श्री खंडोबा देवाचा पालखी सोहळ्याची भव्य मिरवणूक मिरवणुक काढण्यात येईल. मिरवणूकीची सांगता झाल्य नंतर सायंकाळी ५ वाजता.महाप्रसादाला सुरुवात होईल राजे मल्हार वाघे मंडळी गोविंद महाराज चिटमोगरेकर यांथा पांच मास्तर, ढोलकी वादक शंकर काळेकर, गोंधळी सुनिल महाराज गोळेगावकर यांच्या सहकार्याने रात्री आठ वाजता गाण्यांचा व जागरणाचा कार्यक्रमाला सुरुवात होईल ते पहाटे चार वाजे पर्यंत चालू राहील. या करिता चिट मोगरा सह परिसरातील बेट मोगरा, आळंदी टाकळी आदि गावातील भाविक भक्तांनी मोठया संख्ये ने उपस्थित राहून. महा प्रसाद व या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान समस्त गांवकरी मंडळी मल्हार गड चिट मोगरा येथील मंदिर कमिटीच्या वतीने या वेळी आवाहन केले आहे.

## खाजगी हस्तकामार्फत भ्रष्टाचारास प्रोत्साहन देणाऱ्या तालाठ्यावर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २४ डिसेंबर**


देगलूर येथील तलाठी खाजगी हस्तकामार्फत भ्रष्टाचारास प्रोत्साहन देत असून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करत खाजगी हस्तकवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हनुमंत मामीलवाड यांनी एका निवेदनाद्वारे विभागीय अधिकाऱ्याकडे केली आहे. देगलूर सज्जाचे तलाठी ज्ञानेश्वर रातोळीकर यांनी भ्रष्टाचारास प्रोत्साहन देण्यासाठी पूर्वीपासून कार्यालयात लुडबुड करणाऱ्या दोन खाजगी हस्तकांना हाताशी धरून त्यांच्या माध्यमातून कार्यालयातील अनेक कामे करण्यात येतात. तर दुसरीकडे या खाजगी इसमा मार्फत सर्वसामान्य नागरिकांना अपमानास्पद वागणूक मिळत आहे. मागील सात- आठ वर्षापासून हा प्रकार सुरू आहे. तात्कालीन तलाठ्याबरोबरच विद्यमान तलाठ्यांनी हाच प्रकार सुरू ठेवला असून तलाठी ज्ञानेश्वर रातोळीकर यांच्यावर निलंबनाची कारवाई करून खाजगी हस्तकावर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी हनुमंत मागील वाढ यांनी केली आहे.

## गावाने ठरवले तर गाव १०० टक्के व्यसनमुक्त होईल : सपोनि पांडुरंग माने

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड, दि. २४ डिसेंबर**

दापशेड ता. लोहा येथे सोनखेड पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने सरांच्या संकल्पनेतून सोनखेड पोलिस स्टेशनच्या वतीने व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले.

या कार्यक्रमासाठी मंचावर सपोनि माने सर, सरपंच प्रतिनिधी तथा माजी सैनिक बळीराम गजले, पोलीस पाटील अविनाश शितळे, तंटामुक्ती अध्यक्ष संजय मोरे, माजी सरपंच शिवाजी जमालपुरे, स्वामी विवेकानंद कोचिंग क्लासेसचे संचालक किशन टोनगे, पोलीस सेवेत कार्यरत असलेले शिवप्रसाद राजुरे, व्यवसायीक सोमनाथ राजूरे यांची उपस्थिती होती.



त्यानंतर कार्यक्रमाचे मुख्य वक्ते सहाय्यक पोलीस निरीक्षक माने सरांनी गावकऱ्यांना व्यसनमुक्ती संदर्भात व व गावाच्या विकासासाठी जे जे आवश्यक आहे ते करण्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असे मार्गदर्शन केले.. गावातील तरुणांनी व्यसनाकडे न वळता गावातच व्यायाम शाळा व वाचनालय, अभ्यासिका सुरू करून चांगल्या मार्गाने यशस्वी व्हावे असा महत्वपूर्ण सल्ला माने सरांनी त्यांच्या भाषणातून दिला. आणि दापशेड गावातील तरूणांच्या शैक्षणिक व आरोग्याच्या विकासासाठी जे काही मदत लागेल ते करायला तयार आहे. असा शब्द दिला. गावांनी ठरवले तर गावात परीवर्तन होईल आणि १००% गाव व्यसनमुक्त होईल. असा विश्वास त्यांनी आपल्या मनोगतातून केला. या कार्यक्रमाला गावकऱ्यांनी भरपूर प्रतिसाद दिला. सपोनि माने सरांनी हाती घेतलेल्या या सामाजिक कामाचं कौतुक संपूर्ण गावकऱ्यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस पाटील अविनाश शितळे यांच्या सह शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मारोती मोरे, शिवराज मोरे, सतिश शिवाजी मोरे, रामेश्वर जमालपुरे, सतिश विजय मोरे,रवी मोरे, किशन टोनगे यांच्यासह गावातील तरूणांनी सहकार्य केले.

## जिल्हा, अतिरिक्त सत्र न्यायालय व वरिष्ठ दिवाणी न्यायालय उभरण्याची मागणी

**मुख्यमंत्र्याकडे देगलूर अभिवक्ता संघाची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. २४ डिसेंबर**

देगलूर तालूका अभिवक्ता संघाने जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायालय, दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर जोड न्यायालय देगलूर येथे उभारण्यात यावे अशी मागणी देगलूर अभिवक्ता संघाच्या वतीने महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे देगलूर अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड . विरेंद्र नागनाथराव पाटील यांच्यासह ॲड. संजय देशमुख ढोसणीकर, ॲड. रविंद्र पाटील नरंगलकर, ॲड. विक्रम शिंदे, ॲड. धोंडीबा देवकत्ते, ॲड. प्रविण गुत्ते, ॲड. बस्वराज पाटील यांनी व इतर सर्व अभिवक्तांनी महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून सविस्तर चर्चा करीत आपल्या मागणीचे निवेदन दिले.

निजामकालीन देगलूर तालूक्यातील गावांना बिलोली येथील सत्र न्यायालय आर्थिक दृष्ट्या परवडत नसल्याने नागरिकांची होणारी हेळसांड पाहता देगलूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर जोड न्यायालय उभारण्यात यावे, अशी मागणी देगलूर अभिवक्ता संघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली आहे.



जिल्हयातील दुस-या क्रमांकाची बाजारपेठ व भौगोलिकदृष्ट्या मोठा तालूका असलेल्या देगलूर येथे अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची मागणी प्रलंबित आहे. देगलूर तालूका स्वातंत्र्यानंतर तेलंगाना कर्नाटक व महाराष्ट्र या तीन राज्यात विभागला गेला असून सध्या देगलूर तालुका महाराष्ट्राच्या सर्वदुर सीमेवर असलेला तालूका असून या ठिकाणी तालूक्यातील गाव खेडी, वाडी व तांडे हे दुर्गम भागात आहेत.

अनेक गावाला जाण्यासाठी रस्ते नाहीत. देगलूर येथे निजामकालीन न्यायालय स्थापित असून शंभर वर्षांची परंपरा असलेला तालूका न्यायालय आहे. तालुक्यात अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय, दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर ही दोन्ही न्यायालये नसल्याने सीमावर्ती भागातील नागरीकांची प्रचंड हेळसांड होत आहे.

## रानडुकरांनी दोन एकर शेत केले उध्वस्त

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. २४ डिसेंबर**

माहूर तालुक्यातील मौजे लखमापूर येथील एका महिला शेतकऱ्याच्या लिंबायत शिवारातील तीन एकर तुरीच्या शेतापैकी दोन एकर वरील तुरीचे पीक रानडुकरांनी उध्वस्त केल्याची खळबळजनक घटना दि. २३ डिसेंबर रोजी रात्री २.०० वाजताच्या सुमारास घडली असून, तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी नूकसानग्रस्त महिला शेतकरी देवकाबाई विष्णू राठोड यांनी वन विभागाकडे ऑनलाईन अर्ज द्वारे केली आहे.

माहूर तालुक्यात शेती पेक्षा जंगलाचे प्रमाण जास्त असल्याने येथे रान डुक्कर वाघ बिबट्या रोहि जनावरे शेतातील उभ्या पिकांचे नुकसान करून नागरिकांवर हल्ले करत असल्याच्या घटना दररोज घडत आहेत शासनाने शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया तयार केली असून ऑनलाईन अर्ज केल्यानंतर शेतकऱ्यास आर्थिक मदत कधी मिळेल याचा निश्चित कालावधी नसल्याने शेतकऱ्यांना दरवर्षी अस्मानी सुलतानी संकटासह जंगली जनावरां मुळे पिकांचे नुकसान सहन करावे लागत असून एकीकडे पिकांचा उतारा कमी





दुसरीकडे निसर्ग चक्राचा कोप पिकांना योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती दिवसेंन दिवस डबघाईस जात आहे. लखमापूर येथील देवकाबाई राठोड यांना फक्त तीन एकर शेती असून या शेतातील पिकावर त्यांचे दोन मुले सुना नातवंडे असे परिवाराचा वर्षभराचा उदरनिर्वाह चालतो त्यातच थंडीचे दिवस असल्याने शेतात जागलीसाठी कोणीही नव्हते त्यामुळे सुदैवाने जीवित्त हानी झाली नाही जागली किंवा कुठलाही आवाज नसल्याने २५ ते ३० रानडुकरांच्या कळपाने शेतामध्ये घुसून संपूर्ण तुरी च्या पिकात धुडगूस घालत दोन एकर वरील पीक उद्ध्वस्त केल्याने त्यांचे पन्नास हजारापेक्षा जास्त नुकसान झाल्याने त्यांनी वन विभागाकडे ऑनलाईन अर्ज दाखल केला असून शासनाकडून त्यांना तत्काळ भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

## कर्जबाजारी शेतकरी महिलेची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. २४ डिसेंबर**

माहूर तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ भागात असलेल्या मौजे पवनाळा (वरचा) येथील सावित्रीबाई तारासिंग जाधव वय ५५ या महिलेने बँकेकडून कर्ज वसुली नोटीस आणि शेतात झालेल्या नापिकीमुळे चिंताग्रस्त होऊन कर्ज कसे फेडावे या चिंतेने विषारी औषध प्राशन करून राहते घरी आत्महत्या केल्याची गंभीर तेवढीच धक्कादायक घटना दि. २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.०० वाजताच्या सुमारास घडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



आत्महत्याग्रस्त सावित्रीबाई यांचे भाऊ रमेश भिकु राठोड यांनी दिलेल्या जवाबा प्रमाणे मयत सावित्रीबाई यांचे सोबत पवनाळा (वरचा) येथील रहीवाशी असुन शेती व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहोत. सावीत्राबाई जाधव या दि.२२ डिसेंबर रोजी सा. ०५ वाजताच्या सुमारास कोणतेतरी किटकनाशक विषारी औषध पिवुन ती बेशुद्ध पडल्यानंतर त्यांना ग्रामीण रूग्णालय माहुर येथे भरती केले. तिच्यावर उपचार चालु असतांना संध्याकाळी ०८.०० वा.चे सुमारास तिची प्राणज्योत मालवली.

माहूर पोलीस स्टेशन येथे जवाब येताच सपोनि शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोउपनि पालासिंग ब्राह्मण, पोहेका प्रकाश गेडाम, पोहेका शारदासूत खामकर यांचे सह पोलिसांनी पंचनामा केला. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. किरणकुमार वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. देवेंद्र पेदापल्ली, डॉ.केशव शिंदे, सहाय्यक गजानन भोपाळे यांनी शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या स्वाधीन केले.

## एज्युव्हीजन प्राथमिक शाळेत संत वासुदेव यांच्या माध्यामातून जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर, दि. २४ डिसेंबर**

अर्धापूर शहरातील नामांकित एज्युव्हीजन प्रायमरी स्कूल आणि कोचिंग इन्स्टिट्यूट मध्ये दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी विद्यार्थ्यांना हिंदू संस्कृतीमधील मनोरंजनातून तत्वज्ञान देणारे संत वासुदेव यांच्या माध्यमातून जनजागृती घडून आणली.

शहरातील नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून समाजाला अनोखा संदेश देणाऱ्या एज्युव्हीजन प्रायमरी स्कूल मध्ये २५ डिसेंबर २०२४ रोजी साजरा करण्यात येणाऱ्या क्रिसमस डे निमित्त शाळेत खराखुरा संता क्लॉज म्हणून हरवत चाललेल्या वासुदेवाची ओळख व त्यांचे महत्त्व शाळेतीलच विद्यार्थी




आर्यन कदम शिवाजी कदम या विद्यार्थ्यांनी वासुदेवाची भूमिका साकार करून मुलांना प्रभावित केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील विभाग प्रमुख श्री प्रतीक चवरकर सर, श्री आशितोष पुरी सर, सौ छाया क्षीरसागर, सौ अंजली जडे, सौ स्वाती पांचाळ , सौ अल्का शिंदे, सौ ज्योती कांबळे या सर्वांनी परिश्रम घेतले. उपक्रम यशस्वी रित्या राबवल्याबद्दल शाळेच्या प्राचार्य सौ प्रिया रावते मॅडम तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री प्रवीण रावते सर यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## बारड ठाण्याच्या हद्दीत अनेक अवैध धंदे जोमात

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. १९ डिसेंबर**

मुदखेड तालुक्यातील बारड पोलीस ठाण्याच्या हद्दीत पुन्हा एकदा अवैध धंदे चालकांनी डोके वर काढले असून बारड पोलीस ठाण्याचा कारभार दलालांच्या विळाख्यात गेलाय?बारड पोलीस ठाणे नावालाच का? असे अनेक सवाल परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत.

बारड परिसरात अवैध धंदे चालकांनी अक्षरशः कहर केला असून, सर्रासपणे अवैधधंदे चालू असल्याने, आपली अवैध धंद्याची दुकाने मुख्य रस्त्यावर थाटण्यापर्यंत मजल गेली आहे. राष्ट्रीय महामार्गावर बारड येथे ठाण्याच्या शेजारीच काही अंतरावर पोलीसांच्या आशीर्वादाने अवैध दारू विक्री सुरू आहे. बारड ठाण्याच्या हद्दीत अनेक गावात अवैध दुकानदारांनी आपली दुकाने थाटली असल्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेत.




बारड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक ठिकाणी अवैध धंदे खुलेआम चालू असल्याने; बारड पोलीस कुठे व्यस्त आहेत? का अशी चर्चा जोरदार चालू आहे. गेल्या काही दिवसापासून बारड पोलिसांचे काम संशयास्पद असून, बेकायदेशीर धंदेवाल्यावर ना कोणाचा धाक आहे ना दरारा.विशेष म्हणजे पोलीस खात्याला हे अवैध धंदेवाले जुमानतसुद्धा नसल्याचे बोलले जात आहे.तर कोण पोलिस आमचे काही करू शकत नाही, अनेकवेधंदे चालकांचा आणि दलालांचा समज झाला आहे. सामान्य नागरिक ठाण्यात केले असता वेळेत तक्रारी सुद्धा नोंदवून घेतल्या जात नसल्याचे बोलले जात आहे. गंभीर गुन्ह्यांतील अनेक आरोपी पोलिसांच्या अवतीभोवती फिरताना दिसत आहेत.यामुळे जिल्हा पोलीस प्रशासनाने मात्र वेळीच यांना लगाम न घातल्यास,याचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात जनतेला आणि जिल्हा पोलीस प्रशासनाला सहन करावे लागणार हे मात्र निश्चित आहे.स्थानिक पोलीसांकडून या धंदेवाल्यांवर कार्यवाही करण्याऐवजी महिन्याला हप्ते वसुली केली जाते?अशी नागरीकामध्ये जोरदार चर्चा चालू आहे. तर याविषयी ठाण्यात तक्रार करण्यासाठी गेले की, नांदेड जिल्ह्याला एस.पी.कार्यालय तिथे जावा असे सांगण्यात येते.अशी बारड परिसरातील नागरिकांमध्ये चर्चा आहे.मग बारड पोलीस ठाण्याचे कार्य फक्त अवैध धंद्यांचे हप्ते गोळा करण्यासाठी आहेत का?असा सवाल नागरिक करत आहेत. परिसरात अवैधधंदे कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत? ठाण्याचे पोलिस अधिकारी मात्र मूग गिळून गप्प का बसले? असे अनेक सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

बारड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यांच्या विरोधात नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी विशेष मोहीम हाती घेऊन परिसरातील सर्व अवैधधंदे चालकांवर कठोर कार्यवाही करून कायमचा बंदोबस्त करावा.तसेच बारड पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कार्यक्षम,सक्षम आणि ईमानदार सिंघम पोलीस अधिकाऱ्याची नेमणूक करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पेसा कायद्याची जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. २४ डिसेंबर**

किनवट व माहूर तालुक्यातील पेसा अंतर्गत असलेल्या १२८ ग्रामपंचायती अंतर्गत १७८ गावात शासनाच्या आदेशानुसार नांदेड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल,सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दि २४ /१२ / २०२४ रोजी नांदेड जिल्ह्यासह माहूर पंचायत समिती कार्यक्षेत्रातील सर्व गावात पेसा कायद्याच्या जनजागृतीसाठी कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी पी. डी.मुरादे विस्तार अधिकारी माहूर, बी. एम. कोठेवाड विस्तार अधिकारी माहूर,राहुल मार्शेट्टीवार तालुका व्यवस्थापक, आर जी एस ए तालुका प्रशिक्षण समन्वयक आकाश आडे, माहूर तालुका प्रशिक्षण समन्वयक ऐनोद्दीन शेख,नांदेड जिल्हा व्यवस्थापक पेसा आरिफ शेख, तसेच तालुका व्यवस्थापक पेसा इम्रान शेख आणि मिलिंद ससाणे यांनी प्रत्येक गावात कार्यक्रमाचे आयोजन केले.

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात इ.कि. फौ.अर्ज.क्र. १७५/२०२४**
**अर्जदार साहेबराव गोपिनाथ चव्हाण रा. शिरूर**
**विरुध्द**
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शिरूर ता. उमरी**
**प्रकरण- जन्म नोंद घेणे बाबत.**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे अर्जदार साहेबराव गोपिनाथ चव्हाण रा. शिरूर ता. उमरी जि. नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म / मृत्यू नोंदणी कायदा २०२३ अन्वये दिनांक ०३/१०/२०२४ रोजी नोंद घेण्यासाठी इ. कि. फौ. अर्ज १७५/२०२४ दाखल केला आहे.

अर्जदार यांची मुलगी नामे तन्मय साहेबराव चव्हाण यांचा जन्म दिनांक ०९/१२/२०१७ रोजी झाल्याची नोंद मौ. शिरूर ता.उमरी जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणा-या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**दिनांक १६/१२/२०२४** **आदेशावरुन**
**स्थळ - उमरी** **तहसिलदार उमरी**

पूर्व प्रधानमंत्री भारत रत्न
अटल बिहारी वाजपेयी जी
की 100वीं जन्म जयंती के
अवसर पर


डॉ. मोहन यादव, मुख्यमंत्री


नरेन्द्र मोदी, प्रधानमंत्री

## ₹ 44,600 करोड़ लागत की देश की पहली
# केन-बेतवा नदी जोड़ो राष्ट्रीय परियोजना का
# शिलान्यास
तथा
## ओंकारेश्वर फ्लोटिंग सौर परियोजना का लोकार्पण
## 1153 अटल ग्राम सुशासन भवनों का भूमिपूजन
## माननीय अटल बिहारी वाजपेयी जी की स्मृति में स्टाम्प और सिक्का जारी

# प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी
के कर-कमलों
द्वारा

### परियोजनाओं के लाभ

**केन-बेतवा नदी जोड़ो राष्ट्रीय परियोजना**
- मध्यप्रदेश के 10 जिले छतरपुर, पन्ना, टीकमगढ़, निवाड़ी, दमोह, शिवपुरी, दतिया, रायसेन, विदिशा और सागर के 8.11 लाख हेक्टेयर क्षेत्र एवं उत्तरप्रदेश के 2.51 लाख हेक्टेयर क्षेत्र को मिलेगी सिंचाई सुविधा।परियोजना से कुल 65 लाख परिवारों को मिलेगी पेयजल की सुविधा।
- जल विद्युत परियोजनाओं से हरित ऊर्जा में 130 मेगावॉट का योगदान एवं औद्योगिक इकाइयों को पर्याप्त जल आपूर्ति से औद्योगिक विकास और रोज़गार को मिलेगा बढ़ावा।
- चंदेल कालीन लगभग 42 पुरातन तालाबों का होगा विकास एवं पुनर्निर्माण।
- दौधन बांध के निर्माण से बाढ़ का बेहतर प्रबंधन होगा संभव।

**ओंकारेश्वर फ्लोटिंग सौर परियोजना**
- 518 मेगावॉट क्षमता की यह परियोजना विश्व की सबसे बड़ी फ्लोटिंग परियोजनाओं में से एक है।
- परियोजना से कृषि एवं उद्योग हेतु उपयोगी भूमि की बचत होगी।
- जल संरक्षण एवं हरित ऊर्जा उत्पादन से पृथ्वी के तापमान में वृद्धि को रोकने में सहयोग मिलेगा।

**अटल ग्राम सुशासन भवन**
- अटल ग्राम सुशासन भवनों का निर्माण ग्राम पंचायतों को स्थायी भवन की सुविधा प्रदान करेगा।
- ग्राम पंचायतों को प्रशासनिक कार्य करने, बैठकों के आयोजन एवं रिकॉर्ड प्रबंधन में सहायता मिलेगी।

### गरिमामयी उपस्थिति

**मंगुभाई पटेल**
राज्यपाल, मध्यप्रदेश

**डॉ. मोहन यादव**
मुख्यमंत्री, मध्यप्रदेश

**सी.आर. पाटिल**
केंद्रीय मंत्री, जल शक्ति मंत्रालय

25 दिसम्बर, 2024 | पूर्वाह्न 11:00 बजे | खजुराहो, जिला छतरपुर

सीधा प्रसारण http://pmindiawebcast.nic.in DD News @Cmmadhyapradesh @jansampark.madhyapradesh @Cmmadhyapradesh @JansamparkMP JansamparkMP

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर






सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# शंकर सकनुरे यांना पि.एच.डी. पदवी प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ डिसेंबर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील भौतिकशास्त्र संकुलातील विद्यार्थी संशोधक शंकर हाणमंतराव सकनुरे यांना भौतिकशास्त्र विषयात नुकतीच पि.एचडी(विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी 'हाय फ्रिक्वेन्सीज कॉम्प्लेक्स परमिटिव्हिटी अँड थर्मो डायनामिक स्टडीज ऑफ सेलीलोज' या विषयावर प्रा.डॉ. अशोक कुंभारखाने भौतीकशास्त्र संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पुर्ण केले.त्याबद्दल विद्यापिठाने त्यांना भौतिकशास्त्रातील सर्वोच्च पदवी प पी.एचडी (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान केली.

यावेळी प्रा.डॉ.एम.के.पाटील (अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड) प्रा.डॉ.आर.एस. माने,प्रा.डॉ.ये.व्ही.सरोदे, प्रा.डॉ. के.ए.बोगले व संकुलातील सर्व प्राध्यापक वृंद, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राष्ट्रीय सेपकटाकरॉ स्पर्धेसाठी रक्षीता बकवाडची निवड



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ डिसेंबर**

दि.२२ ते २६ डिसेंबर २०२४ या कालावधीत त्रिक्रपुर जिल्हा कासागोडा (केरळ) येथे सेपकटाकरॉ फेडरेशन ऑफ इंडिया च्या मान्यतेने व सेपकटाकरॉ असोसिएशन केरळ यांच्या वतीने २७ वी सब ज्युनियर राष्ट्रीय सेपकटाकरॉ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या स्पर्धे साठी नांदेड येथील सांदीपणी पब्लिक स्कूल ची विद्यार्थीनी कु. रक्षीता रविकुमार बकवाड हिची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. ही निवड नांदेड जिल्हा सेपकटाकरॉ असोसिएशन च्या माध्यमातून नांदेड जिल्हा मुलींच्या संघाने वर्धा येथे झालेल्या २४ व्या सब ज्युनियर राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला होता.

या स्पर्धेतून रक्षीता ची महारष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे.या निवडी बद्दल राज्य संघटनेचे अध्यक्ष विपीन भाई कामदार,सचिव डॉ. योगेंद्र पांडे,नांदेड जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, जिल्हा संघटनेचे सचिव प्रवीणकुमार कुपटीकर, शाळेचे संस्थाचालक सुनील राठोड, प्राचार्य क्रांती कुलकर्णी, क्रीडा शिक्षक भाऊराव राठोड,आई, वडील सौ.प्रा.सारिका रविकुमार बकवाड व आजी,आजोबा सौ.सविता हरिदास बकवाड यांनी अभिनंदन करीत,

पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. कु.रक्षीता बकवाड ही मेजर ध्यानचंद क्रीडा मंडळ,नांदेड येथे सेपकटाकरॉ खेळाचे प्रशिक्षण घेते.वडील प्रशिक्षक रविकुमार बकवाड यांचे मार्गदर्शन तिला लाभले आहे.या निवडीबद्दल नांदेड शैक्षणिक तथा क्रीडा विश्वातून रक्षीताचे अभिनंदन होत आहे.

# शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख यांचे वडील अत्यावस्थ; उपचारार्थ नांदेडला दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २४ डिसेंबर**

हदगाव तालुक्यातील तळणी येथील प्रसिध्द व्यापारी माधवराव देशमुख उंचेगावकर यांची प्रकृती अत्यावस्थ असून नांदेड शहरातील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

माधवराव देशमुख उंचेगावकर हे मागील पाच ते सहा वर्षापासून किडणीच्या आजाराने त्रस्त असून त्यांचे आठवड्यातून दोनवेळा डायलेसिस करण्यात येत होते. परंतु अलिकडे त्यांची प्रकृती अधिकच खालावल्याने त्यांना नांदेड शहरातील भगवती हॉस्पीटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीत त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असले तरी त्यांची प्रकृती अत्यावस्थ असल्याची माहिती डॉ. अंकुश देवसरकर यांनी दिली आहे. माधवराव देशमुख उंचेगावकर हे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विवेक देशमुख यांचे वडील आहेत.

# नागरिकांनी असावे जागरूक ग्राहक : शिल्पा डोलारकर



छत्रपती संभाजीनगर,दि.२४ (जिमाका):- ग्राहक म्हणून नागरिकांनी नेहमी जागरूक असणे आवश्यक आहे. कोणत्याही वस्तूंची खरेदी अथवा सेवा घेतांना ग्राहकांचे हक्क अबाधित ठेवणे बंधनकारक असल्याचे प्रतिपादन जिल्हा ग्राहक संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष शिल्पा डोलारकर यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन समिती सभागृहामध्ये राष्ट्रीय ग्राहक दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपायुक्त पुरवठा डॉ.अनंत गव्हाणे, अप्पर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, उपजिल्हाधिकरी सामान्य प्रशासन संगिता राठोड, तहसीलदार रमेश मुंडलोड, वैधमापन अधिकारी शिवाजी मुंडे यांच्यासह ग्राहक संरक्षण परिषदेचे सर्व समिती सदस्य आणि शासकीय अधिकारी कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

श्रीमती डोलारकर म्हणाल्या की, प्रत्येक व्यक्ती हा जन्मापासून मृत्यूपर्यंत ग्राहक असतो. ग्राहकाला योग्य मोबदल्यामध्ये सेवा आणि वस्तूची खरेदी करता येते. आणि ह्या दर्जेदार सेवा सुविधा उपलब्ध न झाल्यास याबाबत ग्राहकाला आपल्या या जागरूक राहणं ही आवश्यक आहे. वस्तू किंवा सेवा खरेदी करताना लेखी बिल किंवा पावती घेणे. उत्पादन, कालमर्यादा, किंमत, उत्पादन करणारी कंपनी इ. घटकाबाबत माहिती वस्तूवर छापणे उत्पादन कंपनीला बंधनकारक असून खरेदी करताना ग्राहकांनी ही बाब तपासून घेणे गरजेचे आहे.आता ऑनलाइन सेवा व खरेदी मध्येही ग्राहकाची फसवणूक होऊ शकते. यासाठीही तक्रार दाखल करता येते. याबाबत जनजागृती होणे आवश्यक असल्याचे श्रीमती डोलारकर यांनी यावेळी सांगितले. शाळा महाविद्यालयाच्या माध्यमातून ग्राहक हक्क जाणीव जागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन तसेच शासकीय कार्यालय, रुग्णालय इतर खाजगी आस्थापना किंवा खाजगी उत्पादन करणाऱ्या विक्री करणाऱ्या दुकानांमध्ये ग्राहकांना उपलब्ध असणारे टोल फ्री क्रमांक, दर्शनी भागात प्रदर्शित करने आवश्यक असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

डॉ. गव्हाणे म्हणाले की, ग्राहकाच्या हक्काविषयी माहिती पुस्तिका जिल्हा पुरवठा कार्यालयामार्फत प्रकाशित करून ती प्रत्येक गावामध्ये ग्रामपंचायतच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविण्यात यावी. अप्पर जिल्हाधिकारी डॉ.अरविंद लोखंडे यांनी ग्राहक आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून ग्राहक हक्क संरक्षण आयोगाने, व ग्राहक परिषदचे समिती सदस्य काम करत आहेत. ते आणखी लोकाभिमुख करावे,असे सांगितले. प्रास्ताविकामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी ग्राहकाच्या सुरक्षितता, उत्पादनाची माहिती, वस्तू निवडीचा अधिकार, तक्रार करण्याचा अधिकार, ग्राहकांच्या शिक्षणाचा अधिकार, आणि आपले स्वतःचे म्हणणे मांडण्याचा अधिकार याविषयीचे मार्गदर्शन केले. जिल्हा पुरवठा कार्याल मार्फत उत्कृष्ट काम करणारे निलेश राठोड, राहुल खेडकर, अमोल कासार, विजय शहाणे, शेख एजाज, अनुप कुलकर्णी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवून शेतकऱ्यांना मदत करणे हीच शेतकऱ्यांप्रति शुभकामना व शुभेच्छा:ब्र.कु. स्वाती बहेन



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ डिसेंबर**

ब्रह्मकुमारीज सेवा केंद्र, वसंतनगर, नांदेड येथे राष्ट्रीय किसान दिनानिमित्त, शेतकरी बांधवांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भूमातेचे पूजन व शुद्धीकरण करून भूमातेचे महत्त्व सांगण्यात आले. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृषी अधिकारी अरुणकुमार घुमनवाड, वृक्षमित्र संतोष मुगटकर यांनी सेंद्रिय शेतीमध्ये वृक्षांचे महत्त्व सांगून बांधावर झाडे लावण्यासाठी सांगितले. स्वच्छतादूत माधवराव पाटील शेळगावकर यांनी शेतकऱ्यांसाठी मारक असणारे कायदे धोरण बदलून सेंद्रिय शेतीला जास्तीत जास्त मदत देऊन मार्केटिंगची सोय करावी, असे सांगितले. भानुदास पेंडकर यांनी शेतकऱ्यांना शाश्वत योगिक शेती विषयक मार्गदर्शन केले.

यावेळी राष्ट्रीय किसान दिनानिमित्त शेतकरी बांधवांचा सत्कार करण्यात आला. शेतकरी माधव कदम, हरिभाऊ कदम कोंढेकर, विश्वनाथ होळगे, रत्नाकर ढगे, हनुमंत इंगोले, लक्ष्मीबाई सावंत, महानंदा कल्याणकर, अंजना कदम, धोंडीराम सुपारे यांच्यासह २५ शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषि दिनानिमित्त सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उद्देश कृषीभूषण भगवान भाई इंगोले यांनी आपले अनुभव सांगून शेतकऱ्यांनी आता व्यावसायिक शेती केली पाहिजे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ब्रह्मकुमारी पूजा बहेनजी, यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ब्रह्मकुमारी मीना, वनिता, सत्या बहेनजी यांनी परिश्रम घेतले. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी सेंद्रिय शेती केली तरच भविष्यात शेती आणि शेतकरी जिवंत असेल, रासायनिक खताच्या अतिवापरामुळे जमीन नापिक, बंजर बनत आहे व मानवी आरोग्य धोक्यात येत आहे, त्यासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक शेती बरोबर त्याला जैविक सेंद्रिय शेतीची साथ द्यावी लागेल, तर जमिनीची सुपिकता वाढेल, खाणाऱ्यांचे आरोग्य, प्रकृती पर्यावरणाचे रक्षण होईल, शेतकऱ्यांचा खर्च कमी होईल, देशी गायीबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या पाठशाळेत शेतकऱ्यांना धनवान व चरित्रवान बनवले जाते, असे सांगितले.

# हाळणी येथील सीमेवरील मरीआई मंदिरात मुर्ती स्थापना संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. २४ डिसेंबर**

मुखेड तालुक्यातील महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेवरील हाळणी, दापका गुंडोपंत, कलंबर देवाचे व कर्नाटक राज्यातील चोंडी मुखेड या चार गावाच्या सीमेवर असलेल्या मरीआई मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापना मंगळवार दि.२४ रोजी मोठ्या उत्सहात व भक्तिमय वातावरणात करण्यात आली. येथील मंदिरातील मूर्ती जीर्ण झाल्याने चार गावातील प्रमुखांनी मिळून लोकसहभागातून या मंदिरात मरीआईची मूर्ती प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव डॉ. भिमसेनराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मागील तीन दिवसापासून या ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आराधी व गोंधळी मंडळींनी मागील तीन दिवसात त्यांच्या कार्यक्रमातून मंदिर सह परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले होते. हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा मूर्ती प्राण प्रतिस्थापनेचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मुक्रमाबाद येथील बालाजी मंदिराचे मुख्य पुजारी अर्जुन पंडित शास्त्री यांच्यासह चंद्रपूर येथील पुरोहित यांना पाचारण करण्यात आले होते. आयोजित कार्यक्रम व महाप्रसाद यशस्वी करण्यासाठी हाळणी, चोंडी मुखेड (कर्नाटक राज्य) कलंबर देवाचे व दापका गुंडोपंत येथील नागरिकांनी मोलाचे सहभाग नोंदवले. यावेळी चारही गावातील हजारो भाविकांनी मरी आईचे मनोभावे दर्शन घेऊन महाप्रसाद ग्रहण केले. यावेळी भक्तांचा मोठा जनसमुदाय जमा झाल्याने यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.



# मोटारसायकल चोरतांना रंगेहात पकडला चोरटा



तभा वृत्तसेवा

पैठण दि २४ : पैठण नाथ मंदिर लगतच्या अन्नछत्र समोर उभी असलेली दुचाकी चोरट्याला पैठण पोलिसांनी मोटारसायकल चोरतांना रंगेहाथ पकडले असून या चोरट्याकडून पोलिसांनी चोरीला गेलेली दुचाकी होरो एच एफ डिलेक्स हस्तगत केली आहे. चोरट्याकडून आणखीन चोरीला गेलेल्या दुचाक्या चोरीच्या घटना उघडकीस येणार असल्याचे पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख म्हणाले. सोमवारी पैठण तालुक्यातील आखादवाडा येथील वैभव म्हस्के हे अन्नछत्र येथे जेवण करत असतांना त्यांना त्यांच्या गाडीजवळ अनोळखी माणूस संशयास्पद रीत्या आढळून आले असता त्यांनी तात्काळ पैठण पोलिसांशी संपर्क केला.यावर पोलिसांनी घटनास्थळी तातडीने साध्या वेशात येऊन पाहणी करत असतांना यावेळी संशयास्पद रित्या वावरणारा आरोपी राहुल आहेर वय २९ रा. थेरगाव तालुका पैठण हा दुचाकी एच एफ डिलेक्स क्रमांक MH-20 FA 8165 हिचा लॉक तोडून गाडी स्टार्ट करून घेऊन जात असतांना गाडी मालक व पोलिसांनी त्याला रंगेहाथ पकडले. याप्रकरणी आरोपीवर पैठण पोलिसात गुन्हा दाखल झाला असून चोरट्याकडून आणखी चोरीच्या घटना उघडकीस येणाच्या शक्यता आहे. घटनेचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल चेडे करीत आहेत.

# राष्ट्रीय कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रम; ५५ रुग्ण आढळले

छत्रपती संभाजीनगर,दि.२४ :- जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध मोहिम 'कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र'(कुसुम) अंतर्गत राबविण्यात आले. या अंतर्गत दि.१६ ते २० या कालावधीत जिल्ह्यात ५५ रुग्ण शोधण्यात आले आहेत. हे सर्व रुग्णांवर उपचार सुरु करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी दिली आहे.

जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध मोहीमे अंतर्गत तयार करण्यात आलेल्या सुक्ष्म कृती आरखड्यानुसार एकुण ३७ हजार जोखीम क्षेत्रातील व्यक्तिंची तपासणी करण्यात आली. त्यात संशयित ९५२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यामधुन ५५व्यक्ती कुष्ठरुग्ण असल्याचे चाचणीअंती निष्पन्न झाले.त्यातील २१ जण संसर्गिक व ३४ जण असंसर्गिक असल्याचे आढळून आले आहे. या रुग्णांवर नियमित उपचार सुरु करण्यात आले असून नियमित व विहित कालावधीतील उपचार पूर्ण केल्यावर हे रुग्ण पूर्ण बरे होतील असे डॉ. धानोरकर यांनी सांगितले.

तालुकानिहाय आढळलेले रुग्ण या प्रमाणे- छ.संभाजीनगर-२, गंगापुर-३, कन्नड-८,खुलताबाद-१,पैठण-७,सिल्लोड-१०, सोयगांव-८,फुलंब्री-१, वैजापुर-२, म.न.पा कार्यक्षेत्र -८. एकुण ९५२ संशयित रुग्णांची तपासणी केल्यानंतर ५५ जण रुग्णसल्याचे आढळून आले. ही मोहिम यशस्वी करण्यासाठी सहायक संचालक कुष्ठरोग डॉ.शिवकुमार हलकुडे यांच्या मार्गदर्शनात सर्व तालुका आरोग्य अधिकारी, प्रा.आ.केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका यांनी परिश्रम घेतले.

# जी.डी.सी.ए.व सी.एच.एम. परीक्षा २०२४ चे निकाल घोषित

छत्रपती संभाजीनगर,दि.२४ (जिमाका):- सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे मार्फत जी.डी.सी.ए. व सी.एच.एम परीक्षा २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. यापरीक्षेचा निकाल घोषित करण्यात आला आहे. गुणपत्रके या कार्यालयास प्राप्त झाल्यावर प्रसिद्ध करण्यात येईल. निकाल संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना स्वत:च्या लॉगिन वर उपलब्ध आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे सन २०२२ व २०२३ च्या परिक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र अद्याप कार्यालयातून हस्तगत केले नाही. अशा विद्यार्थ्यांनी कार्यालयात समक्ष येऊन हस्तगत करावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था डॉ.मुकेश एस.बाराहाते यांनी केले आहे.

## स्वंयसेवी संस्थांची माहिती मागविली

छत्रपती संभाजीनगर,दि.२४ (जिमाका):- महाराष्ट्र राज्यातील विविध भागात भटक्या विमुक्त जातीसाठी काम करणाऱ्या स्वंयसेवी संस्थाची माहिती संकलित करण्यात येत आहे. जिल्ह्यातील संस्थांनी आपल्या संस्थेमार्फत राबविण्यात येणारे उपक्रम, कार्य व संस्थेची माहिती दि.२७ पर्यंत सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण, सामाजिक न्याय भवन तिसरा मजला खोकडपुरा येथे सादर करावे, असे आवाहन सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण अनंत कामद यांनी केले आहे.

# 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम, दि.१ जानेवारीपासून

छत्रपती संभाजीनगर,दि.२४(जिमाका):- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी, 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम दरवर्षी दि.१ ते १५ जानेवारी दरम्यान राबविण्यात येतो. त्यानुसार शासकीय विभागीय ग्रंथालय, समर्थ नगर, छत्रपती संभाजीनगर येथे दि. १ ते १५ जानेवारी दरम्यान सामुहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा, ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच यानिमित्त विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी मोहिम सुद्धा राबविण्यात येणार आहे. शहर व जिल्हयातील नागरीकांनी सहभागी व्हावे असे आवाहन सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी केले आहे.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचे लाभार्थी वाढवणार : नरेंद्र पाटील

## कन्नड येथे स्वराज ट्रॅक्टर व टाटा मोटर्स च्या शोरूमचे उद्घाटन



तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.२४ डिसेंबर - देशात व्याजाचा परतावा देणारे एकमेव अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतुन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आर्थिक मागास असलेल्या तरुण उद्योजक व्हावे यासाठी या महामंडळास बळ दिले असून या अंतर्गत आगामी काळातजनजागृती करून लाभार्थी वाढवणार असल्याचे प्रतिपादन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील (मंत्री दर्जा) यांनी केले आहे.

कन्नड साखर कारखाना समोर असलेल्या सद्गुरू साई मोटर्स स्वराज ट्रॅक्टर व टाटा मोटर्स च्या शोरूम नवीन वास्तूत प्रदार्पण सोहळा संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांची उपास्थिती होती. यावेळी महंत स्वामी बलदेवनंद गिरी महाराज, भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, कृष्णा महाराज चव्हाण, देवनाथ पा. खंडागळे, सद्गुरू साई मोटर्स चे संचालक बाळासाहेब खंडागळे, वर्षा खंडागळे, गिरीश जाधव, प्रवीण पाटील, प्रमोद पाटील, चेतन काळे, कैलास गिरी, राहुल मगर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

एका शेतकरी कुटुंबातुन शून्यातून व्यवसाय उभा करून बेरोजगारांच्या हाताला काम देण्याच्या बाळासाहेब खंडागळे यांचा आदर्श इतरांनी सुद्धा घेतला पाहिजे असे मार्गदर्शन भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी केले.

# सुशासन सप्ताहात ई-शिधापत्रिका, प्रमाणपत्र, दाखल्यांचे वाटप



छत्रपती संभाजीनगर,दि.२४ (जिमाका):- जिल्ह्यात दि.१९ ये २४ या कालावधीत 'सुशासन सप्ताह' साजरा करण्यात आला. ई- शिधापत्रिका, प्रमाणपत्रे व दाखल्यांचे वाटप या कालावधीत नागरिकांना करण्यात आले. सार्वजनिक सेवा वितरणामध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवणे हे या सप्ताहाचे प्राथमिक उद्दिष्ट होते. या निमित्ताने प्रत्येक नागरिकाला आवश्यक प्रमाणपत्रे कोणत्याही अडचणीशिवाय मिळतील याची खात्री करणे साठी तसेच जागीच दाखले देण्याच्या सोयीसाठी जिल्हाभर विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली. त्याचा अनेकांना लाभ झाला. जिल्हाधिकारी कार्यालयात यानिमित्त (दि.२३ रोजी) आयोजित कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन श्रीमती संगीता राठोड, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन (जा.प्र.) एकनाथ बंगाळे, उपजिल्हाधिकारी(भूसंपादन) डॉ. सुचिता शिंदे, तहसिलदार सा.प्र श्रीमती रूपा चित्रक. तहसीलदार (महसूल)श्रीमती पल्लवी लिगदे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी अनिल थोरात, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी व जिल्ह्यातील इतर शासकीय कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.याप्रसंगी उपस्थित कर्मचाऱ्यांना ई-ऑफिस प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. लाभार्थ्यांना ई- शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले तसेच संजय गांधी योजनेअंतर्गत गरजूंना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

# पालक व विद्यार्थ्यांच्या कबड्डी, खो-खो, क्रिकेट, दोरीवरच्या उड्या, संगीत खुर्ची, लंगडी, गोळा फेक,स्पर्धा उत्साहात संपन्न

### सोयगाव बिट स्तरीय पालक-विद्यार्थी क्रीडा स्पर्धा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ डिसेंबर : जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव प्रांगणात मंगळवारी (दि.२४) डिसेंबर मोठ्या उत्साहात पालक व विद्यार्थ्यांच्या कबड्डी,खो-खो,१०० मिटर धावणेसह क्रिकेट,दोरीवरच्या उड्या,संगीत खुर्ची लंगडी,गोळा फेक आदी स्पर्धा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या प्रेक्षक व पालक आणि विद्यार्थीनी उत्साहात आनंद लुटला.

विकास मिना मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्या संकल्पनेतुन व जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर प्रेरणेतून,रंगनाथ आढाव गटशिक्षणाधिकारी सोयगाव यांचे मार्गदर्शनाखाली सोमवार व मंगळवारी दोन दिवशीय क्रीडा स्पर्धा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे भव्य मैदानावर मोठ्या उत्साहात पालक व विद्यार्थी दरम्यान घेण्यात आल्यात.

मंगळवारी सोयगाव बिटस्तरीय पालक- विद्यार्थी क्रीडा स्पर्धेचे उद्धाटन तात्यासाहेब माळी सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत समिती सोयगाव यांच्या हस्ते करण्यात आले.तर प्रमुख उपस्थितीत गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव पं.स.सोयगाव हे होते.केंद्रप्रमुख फिरोज तडवी, अण्णा पोळ,बाळू सुळ,मुख्याध्यापक मोतीराम जोहरे, प्रशांत पाटील,सुशील बडक,सुनील बावचे संगीता पाटील,प्रतिज्ञा बावचे,शेख हासीफ विशेष शिक्षक म्हणून ग. सा.केंद्र सोयगाव,नितेश गवांदे,रामचद्र महाकाल,रवींद्र राजपूत, यांची उपस्थिती होती.

स्पर्धेत अंतर्गत शाळेचे मुख्याध्यापक किरण पाटील,पार्सिंग चव्हाण,सह शिक्षक बिलाल बागवान,विकार युसूफ,अनिल देसले,रामचद्र महाकाळ रवींद्र राजपूत, यशोदीप चौधरी,भूषण देशमुख उपस्थित होते.पालक विद्यार्थ्यांच्या कबड्डी,खो खो आदी स्पर्धा मोठ्या उत्साहात घेण्यात आल्या.तर पंचाची जबादारी शेख शफिक,पंकज रगडे,रवींद्र बसय्ये,बाळू सूळ,भूषण चौधरी,मंगला बोरसे, तर गुण लेखक म्हणून नितेश गव्हांदे,युसूफ बागवान,संतोष भारद्वाज,भूषण चौधरी यांनी पाडली.

सोयगाव,सावळदबारा फर्दापुर,जरंडी आजच्या विदयार्थी क्रीडा स्पर्धेत केंद्रप्रमुख,केंद्र व अंतर्गत शाळेचे मुख्याध्यापक सह.शिक्षक,पालक,विद्यार्थी व बिट स्तरीय क्रीडा नियोजन समिती सदस्य उपस्थित होते अश्या पद्धतीने सर्वांच्या सहकार्याने विद्यार्थी क्रीडा स्पर्धा पार पडल्या. फिरोज तडवी केंद्रप्रमुख यांनी सर्व शिक्षक,पालक, विद्यार्थी क्रीडा स्पर्धक,मुख्याध्यापक, स.शि.ग.सा.केंद्र तसेच केंद्र व बिट स्तरीय क्रीडा समिती सदस्य यांचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले आहेत.

क्राईम वृत्त...



## वाढदिवसानिमित्त गरजवंतांना उबदार ब्लँकेटचे वाटप

**अहमदपूर, दि.२४ डिसेंबर -**

राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सदभक्त मंडळाच्या वतीने गरजवंतांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. सध्या थंडीचा कडाका वाढला असून शहरानजीक पाल ठोकून असलेले अनेक गरजवंत यांनी उबदार ब्लँकेट नसल्याचे बोलून दाखवले होते. त्याचा धागा पकडून भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी वीरमठ संस्थान व भक्ती सोळाच्या वतीने यांनी सदर गरजवंतांना उबदार ब्लँकेट वाटप करण्याचा उपक्रम घेतला. पालावरच्या मुलांना आधार कार्ड नाही. पालावर असणाऱ्या पंचवीस ते तीस मुलांना आधार कार्ड नसल्यामुळे शाळेत दाखला होत नसल्यास हे लक्षात येतात तहसीलदार उज्वला पांगरकर यांनी सदर मुलांना आधार कार्ड देण्यासंबंधी कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमासाठी तहसीलदार उज्वला पांगरकर, गटविकास अधिकारी अमोल आंदेलवाड, अभय मिरकले, संदीप चौधरी, रवी महाजन, अनिल कासनाले, प्रा. स्वामी विश्वंभर, शिवाजीराव गायकवाड, बालाजी तोरणे, बालाजी पारेकर, दिनकर मदेवाड, मासूम भाई शेख, धम्मानंद कांबळे, तलाठी महेश गुपिले, प्रशांत बिराजदार उपस्थित होते.



## जवळगा येथे बंदला प्रतिसाद

**वलांडी, दि.२४ डिसेंबर -**

मस्साजोग (जि. बीड), परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ जवळगा येथे कडकडीत बंद पुकारण्यात आला. मस्साजोग घटनेतील सर्व आरोपींना अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी व मयत संतोष देशमुख यांच्या कुटुंबातील व्यक्तींला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात यावे व परभणी आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घ्यावेत, मारहाण करणाऱ्या पोलिसांवर गुन्हा दाखल करावा, या मागण्यासाठी देवणी तालुक्यातील जवळगा येथील सर्वपक्षीय नेते, सामाजिक संघटनांनी बंदचे आवाहन केले होते. व्यापारी संघटनेनी आपली दुकाने बंद ठेवून पाठिंबा दिला होता. यामध्ये कार्यकर्ते, ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवून घटनेचा निषेध नोंदवला.



## संत गाडगेबाबा महाराज यांना अभिवादन

**उदगीर, दि.२४ डिसेंबर -**

संत गाडगेबाबा महाराज यांची ग्रामपंचायत कार्यालय चिंचोली, अतनूर, गव्हाण, मेवापूर, गुत्ती येथे पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी गावातील सरपंच रेखा बिरादार, उपसरपंच राजेंद्र भंडारे, संतोष बट्टेवाड, सदस्या प्रतिमा गायकवाड, गणपती हुंणजे, दत्ता बिरादार, संगीता गिरी, पुष्पा बट्टेवाड, तंटामुक्तीचे उपाध्यक्ष शुभान गायकवाड, गोपाळ गव्हाणे, उत्तम गव्हाणे, संग्राम बिरादार, संजय गायकवाड, दत्तात्रय गिरी, स्नेहा गायकवाड, शाम हुंणजे, सुनीता बिरादार, सरपंच चंद्रशेखर पाटील, उपसरपंच बाबुराव कापसे, ग्रामसेवक फिरोज शेख, गव्हाण येथे सरपंच बालाजी गुडसुरे, ग्रामसेवक विजय भोसले, मेवापूर येथे सरपंच कोमल तुळशीदास पाटील, तुळशीदास पाटील, अमोल गायकवाड, राजकुमार कापडे, बी.जी. शिंदे, एस.बी. शिंदे, संध्या शिंदे, रुक्मिणी सोमवंशी यांनी संत गाडगेबाबा महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. गुत्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सरपंच मीना यादव केंद्रे, यादवराव केंद्रे, ग्रामसेवक विजय भोसले यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नागरिक उपस्थित होते. चिंचोलीला सन २०१२ मध्ये संत गाडगेबाबा ग्राम पंचायतला ग्रामस्वच्छता अभियान मध्ये प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

## साने गुरुजींना अभिवादन

**औसा, दि.२४ डिसेंबर -**

खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे या गीताचे जनक, थोर लेखक, स्वतंत्र सैनिक साने गुरुजी यांच्या जयंती निमित्त सांस्कृतिक, ग्रंथालय व एनएसएस विभागाच्या वतीने लातूर कॉलेज ऑफ फार्मसी लातूर महाविद्यालयात जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्य संतोष मेदगे, प्राचार्या योगिता बावगे, प्राचार्या रूपाली गिरी यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्प माला अर्पण करण्यात आली. तसेच उपस्थित प्रा. अतुल कदम, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. माधुरी पोलकर, एनएसएस विभाग प्रमुख मुंजाजी मुळे, डी.एल. कांबळे, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे आदी शिक्षक, शिक्षकेतर व विद्यार्थी उपस्थित राहून अभिवादन करण्यात आले.

## २६ डिसेंबर रोजी पेन्शन अदालत

**लातूर, दि.२४ डिसेंबर -**

जिल्ह्यातील सर्व राज्यशासकीय निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी लातूर येथील शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन येथे गुरुवार, २४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे. निवृत्तवेतन धारकांनी या अदालतीमध्ये उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील यांनी केले आहे. नागपूर महालेखापाल कार्यालय व लातूर जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

# तिहार जेलमधील अंतर्गत व्यवस्थेची काळी कहाणी म्हणजे ब्लॅक वॉरंट होय : डॉ. शशिकला राय

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२४ डिसेंबर -**

आशिया खंडातील सर्वात मोठे जेल म्हणजे तिहार जेल होय. येथे अनेक महत्त्वपूर्ण अपराधी, गुन्हेगार व कुख्यात दोषी लोकांना ठेवले जाते. परंतु येथील अंतर्गत व्यवस्था आणि बोकाळलेला भ्रष्टाचार यामुळे येथे घडणारे रहस्य, आश्चर्य यामुळे जेलमधील जनजीवन, अनेक वर्षे सडणारे हजारो कैदी यांच्या बाबतच्या न्यायव्यवस्थेची काळी कहाणी म्हणजे ब्लॅक वॉरंट ही कादंबरी होय, असे मत डॉ. शशिकला राय यांनी व्यक्त केले.

डॉ. रजनी रणपिसे, पुणे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या ३२७ व्या वाचक संवादमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे हिंदी विभागात कार्यरत असणाऱ्या प्रसिद्ध साहित्यिका तथा परखड वक्त्या डॉ. शशिकला राय यांनी सुनील गुप्ता व सुनेत्रा चौधरी लिखित 'ब्लॅक वॉरंट' या तिहार जेलमधील अंतर्गत व्यवस्थेच्या अभ्यासपूर्ण हिंदी साहित्य कृतीवर संवाद साधताना पुढे म्हणाल्या, की वाढत्या अपेक्षांमधून होणारा भ्रष्टाचार हा आठव्या आश्चर्यासारखा असून एखाद्याचे सुख म्हणजे दुसऱ्यांचे दुःख बनत आहे आणि न्यायाला लंगडे बनवत आहे.

तिहार जेल बद्दल सर्वत्र चर्चा होते परंतु आतील विश्वही आश्चर्यकारक आहे.

आत मध्ये होणाऱ्या मानवाधिकार्यांच्या अंदाधुंद उल्लंघणामुळे जेलमधील भोजन, विकृत जेलकर्मी, न्यायालयाचे आदेश त्यांची होणारी पायमल्ली या सर्व विवादित बाबीवर या पुस्तकात प्रकाश टाकण्यात आला आहे.

यावेळी तुळसीदास बिरादार, मोहन निडवंचे, मुरलीधर जाधव, वीरभद्र स्वामी व मैनाताई साबणे यांचेसह अनेकांनी चर्चेत सहभाग नोंदवला. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. रजनी रणपिसे म्हणाल्या की विश्वातील मोठ्या जेलमध्ये डांबले जाणारे कैदी त्यांच्याबरोबरचे भेदभाव पूर्ण व्यवहार आणि अधिकाऱ्यांची जिंदगी याबद्दल खूप सुंदर भाष्य संवादकार्नी केले असून हा वाचक संवाद म्हणजे सर्वार्थाने बौद्धिक खुराक देणारा आणि संपूर्ण महाराष्ट्रभर राबवला जावा असा स्तुत्य उपक्रम आहे.

शासकीय दुध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्या चला कवितेच्या बनात अंतर्गतच्या या वाचक संवादचे सूत्रसंचालन संयोजक अनंत कदम यांनी केले.

संवादकांचा परिचय प्रा. बालाजी सूर्यवंशी यांनी करून दिला तर आभार प्रा. गोपाळ पाटील यांनी मानले.




# पानगावच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदीराचा होम हवन व महापुजेने जिर्णोद्धारास सुरुवात




**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.२४ डिसेंबर -**

रेणापुर तालुक्यातील पानगाव येथील ऐतिहासिक व पुरातन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जतन व दुरुस्ती कामासाठी ९ कोटी ३४ लाख ४९ हजार रुपयांचा निधी शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य मंत्रालयातून मंजूर झाला असून रविवारी दि.२२ डिसेंबर रोजी पानगाव येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा जिर्णोद्धारास सुरुवात झाली असून सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत पानगाव येथील दिलीपदेव पाठक, यांच्या मार्गदर्शनाखाली अनिरुद्ध देव इनामदार यांच्यासह ८ ब्रम्हव्रंदांच्या वेद मंत्रोउतच्चारात होम हवन व महापूजा करून मंदिरावरातील मुर्तीची विधीवत पुजा करुन विठ्ठल-रुक्मिणी यांच्या दोन्ही मुर्ती टाळम्रंदंगाच्या व ढोल ताशाच्या विठ्ठल नामाच्या जयघोषात मंदिराबाहेर सुरक्षीत स्थळी ठेवण्यात आल्या आहेत.

रेणापुर तालुक्यातील पानगाव येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर हे उत्तर चालुक्यकालीन १२-१३ व्या शतकातील असावे या मंदिरावर होईसळ चालूक्य आणि काकतीये यांचा कालखंडातील स्थापत्य कलेचा प्रभाव दिसून येतो. मंदिरातील सभामंडप गर्भ ग्रह हेमाडपंती स्थापत्य शैलीचे दिसून येते. सभामंडपात कलाकृती स्तंभाची रचना असून मंदिराचा बाह्यभागात भौमितिक नक्षीकाम तसेच देवदेवतांचे शिल्पे कोरलेले दिसून येतात. घराच्या गर्दीत झाकलेले मंदिराचा फक्त मंडप बाहेरून दिसतो.ज्याला आज लोकांनी पंढरपूरच्या धर्तीवर नामदेव पायरी असे संबोधले गेले आहे. या मंदिरातील अनेक दगडांची व मुर्त्यांची तोडफोड झाली आहे. या मंदिराच्या जीर्णोद्धारास सुरुवात होत असून दि.२२ डिसेंबर रोजी रविवारी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत होम हवन व महापुजाकरुन या मंदिरावरील विठ्ठल-रुक्मिणी यांच्या दोन्हीही मुर्ती सुरक्षित स्थळी ठेवण्यात आल्या आहेत.

यावेळी मंदीर समितीचे सर्व पदाधिकारी व पानगाव व परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त प्रश्नमंजूषा स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२४ डिसेंबर -**

येथील केशवराज विद्यालयातील पाचवी ते सातवी विभागात थोर भारतीय गणितज्ञ श्रीरामानुजन यांच्या जयंतीनिमित्त शाळेमध्ये गणित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यावेळी व्यासपीठावर शाळेचे पर्यवेक्षक संदीप देशमुख अंजली निर्मळे उपस्थित होते.

श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणित प्रमुख बाळासाहेब करपुडे यांनी केले. यानिमित्त पाचवी ते सातवी वर्गासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. प्रत्येक तुकडीतील दोन विद्यार्थ्यांचा एक गट याप्रमाणे नियोजन करण्यात आले होते. गणित शिक्षक महादेव गोंदरकर, सुबेध सूर्यवंशी, रोहित कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांच्या विविध गटांना प्रश्न विचारले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी मुंडे यांनी केले. कांचन तोडकर यांनी आभार मानले. कार्यक्रम प्रमूख म्हणून सुवेध सूर्यवंशी यांनी काम केले.

## शाळा परिसरात रोडरोमियोचा सूळसुळाट

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२४ डिसेंबर -**

तालुक्यातील वलांडी येथे गेल्या काही दिवसांपासून मूलींची छेड छाडच्या घटना मधे वाढ झाली आहे. मूलीची छेड काढणे मूलांचा फॅशन झाला आहे.

वलांडी येथे ट्यूशन एरिया व शाळा महाविद्यालय बस स्टॉप, हॉटेल, पान टपरी वरती रोमियोंनी ठिय्या मांडुन बसल्याचे आढळून येत आहे. सकाळी व दूपारी शाळा सूटल्यानंतर टूकार पोरांनी शाळेच्या आवारात दूचाकी मिरवणे व गाड्यांचा कर्कश आवाज करून फिरताना दिसत आहेत.

लातूर जिल्ह्याचा आकडा पाहता जिल्ह्यात महीला अत्याचाराच्या घटना घडत आहेत. आठवडी बाजारा दिवशी तर महीला मोठ्या संख्येने भाजीपाला खरेदीसाठी येतात गर्दीचा फायदा घेत तेथे पण महीला छेड छाडीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. परंतू त्यांच्या सूरक्षेसाठी कोणत्याही प्रकारची काळजी घेण्यात येताना दिसत नाही. टवाळखोर मूले शाळा सूटल्यानंतर रस्त्याच्या कडेला उभे राहुन शाळकरी मूलींना पाहून इशारे करतात आपली दूचाकी मिरवतात. हे पाहता मुलींना व त्यांच्या पालकांनाही शाळा व ट्यूशनला पाठवण्यासाठी भीती वाटत आहे.

बस स्टॉप व शाळा, ट्यूशन परीसरात महीला व मूलीच्या सूरक्षेसाठी मूलभूत उपाययोजना पोलीस प्रशासनाच्या वतिने करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत औशातील क्रांतीसुर्य अकडमीचा संघ प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२४ डिसेंबर -**

लातूर येथील टी.जी फंक्शन हॉल येथे झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत औशातील क्रांतीसूर्य कराटे अॅकॅडमीतील ३९ विद्यार्थ्यांनी सर्वाधिक ६४ पदकासह २१ सुवर्ण पदके जिंकुन आपले नाव राज्यस्तरीय चॅम्पीयन स्पर्धेत सोनेरी अक्षरात कोरले असून गेल्या अकरा वर्षापासून आपला दबदबा कायम ठेवला आहे.

औसा शहरात भेटा येथील अजित ढोले यांनी कांतीसुर्य अकडमीतून कराटेचे वर्ग सुरु केले आहेत. २०१३ पासून आजपर्यंत विविध स्पर्धेतून अनेक पदकं जिंकुन या अकादमीच्या माध्यमातून कांत्रीसुर्यचे वर्चस्व कायम ठेवले आहे. या अकदमीतून कराटेच शिकवले जातात असे नाही तर कराटे बरोबरच विद्यार्थ्यांना आवड असलेले खेळ सुध्दा शिकवले जातात. यामुळे या अकडमीत अधिक विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत.नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेतील काता व कुमीते या फाईट प्रकारात३९ विद्यार्थ्यांनी एकुण ६४ पदक जिंकुन स्पर्धेत सर्वाधिक पदकं जिंकण्याचा मान मिळवला.

यामध्ये २१ सुवर्ण पदक जिंकली आहेत. ४३ कास्य व रोप्य पदक आहेत. अक्षीता सुर्यवंशी सुवर्ण, सुवर्ण, श्रेया गणेश चव्हाण सुवर्ण, सुवर्ण, सुजल राजेभाऊ चव्हाण सुवर्ण, सुवर्ण, सर्वेश श्रीराम बेंबडे सुवर्ण, सुवर्ण प्रतीक बाबासाहेब कांबळे सुवर्ण, सुवर्ण, ऋतुजा सिद्धेश्वर सुरवसे सुवर्ण, सुवर्ण, अभय सुर्यवंशी सुवर्ण, शिवम शिवशंकर मुळे सुवर्ण, कास्य, रुद्र सचिन दूधभाते सुवर्ण, कास्य, विराज श्रीराम बेंबडे सुवर्ण, कास्य, कार्तिकी सचिन दूधभाते सुवर्ण, कास्य, प्रणिता प्रकाश राठोड सुवर्ण, श्रमिका श्रीराम सुर्यवंशी सुवर्ण, रौप्य, स्वरा सचिन मंदाडे सुवर्ण, कास्य, शुभ्रा महादेव घोडके सुवर्ण, कास्य, श्लोक गोपाळ जंगाले रौप्य, कास्य, प्रणव पद्माकर फुटाणे रौप्यपदक, विवेक रविकांत आडे रौप्य, कास्य, शहाजी राजगुरू रौप्य, कास्य, प्रसाद राम शिंदे रौप्य, कांस्य, वैभवी दत्तात्रेय पांचाळ रोप्य,कांस्य, गौरी राजेशप्रसाद तिवारी रौप्य, कांस्य पदक, वैष्णवी गणेश जाधव रोप्य पदक, प्रगती राम शिंदे रौप्य,कांस्य, शिवम मोहन जवादे कांस्य, देवेंद्र संतोष वगरे कांस्य पृथ्वीराज दयानंद निसाळे कांस्य, प्रयाण शिवशंकर राचट्टे कांस्य, रुद्र भगवान मेनगुले कांस्य, ऋषिका नितीन सुरवसे कांस्य, तनिष्का राजेशप्रसाद तिवारी कास्य, अनुष्का मुक्तेश्वर बिराजदार, कांस्य, स्वाती शिवशंकर कांबळे कांस्य, आरोही मनोज चव्हाण कांस्य, प्रगती श्रावण रोंगे कांस्य, समृद्धी सुरेश सुरवसे कांस्य, गायत्री प्रफुल्ल टिके कांस्य, हिरल निलेश उटगे कांस्य, सानवी अमर बिराजदार कांस्य.

या सर्व यशस्वी विद्यार्थांचे सर्वच स्तरातून कौतुक होत असून क्रांती सूर्य कराटे अॅकॅडमी औसाच्या वतीने अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# डॉ. आंबेडकर यांच्या केलेल्या एकेरी वक्तव्याविरोधात औराद येथे रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२४ डिसेंबर -**

लोकसभेच्या हिवाळी अधिवेशना दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा एकेरी भाषेत उल्लेख करुन त्यांच्याबद्दल चुकीचे वक्तव्य करुन अपमान केला आहे.

त्यामुळे संपूर्ण देशातील जनतेच्या भावना दुखावल्या असल्यामुळे देशभरात निषेधार्थ निदर्शने आणि आंदोलने करत आहेत.

शनिवार दि.२१ डिसेंबर रोजी तालुक्यातील औराद शहाजानी येथे ही छत्रपती शिवाजी महाराज चौकात आज रास्ता रोको आंदोलन करत ठिय्या आंदोलन करत निषेध करण्यात आला.

सत्तेत असलेले भाजपचे केंद्रीय गृहमंत्री यांनी भर संसदेत संविधानाचे शिल्पकार असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात गरळ ओकत एकेरी भाषेत उल्लेख करत संपूर्ण संविधान प्रेमी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवतील लोकांच्या भावना दुखावल्या असल्यामुळे संपूर्ण हिंदुस्थानात तिव्र विरोध उटलेला आहे.

त्यामुळे संपूर्ण हिंदुस्थानासह महाराष्ट्र राज्यात विविध आंदोलने करत निषेध करण्यात येत आहे.

औराद येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडीच्या वतीने रास्ता रोको व ठिय्या आंदोलन करण्यात आले व अनेक समाजबांधवांनी आपल्या भावना व्यक्त करत निषेध नोंदविला.

या आंदोलनात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने शहरप्रमुख लखन बोंडगे तर राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने लक्ष्मण कांबळे तर कॉंग्रेस पक्षाच्या वतीने राहुल मोरे, विलास कांबळे, अभय साळुंके यांनी भावना व्यक्त केल्या.

यावेळी अभय साळुंके, विलास कांबळे, बालाजी भंडारे, हाजी सराफ, रविंद्र गायकवाड, जीवन कांबळे, अमर मदाळे शिवसेनेच्या वतीने शहरप्रमुख लखन बोंडगे, गोविंद मोरे, पवन स्वामी, सुनिल भोई तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे लक्ष्मण कांबळे, अमर गायकवाड, सिद्दीक मुल्ला व शेकडो दलीत बांधव व संविधान प्रेमी उपस्थित होते.

# उजनीतील विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्फुर्त प्रतिसाद

**महात्मा गांधी इंग्लिश स्कूलचा उपक्रम...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२४ डिसेंबर -**

तालुक्यातील उजनी येथील सीबीएसई मान्यताप्राप्त महात्मा गांधी इंग्लिश स्कूलने उड्डाण २०२४ विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले.या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विज्ञानासोबत कृत्रिम बुद्धिमत्ता (रोबोटिक्स), गणित, सामाजिक शास्त्र आणि भाषा विषयावर आधारित प्रयोगाचे उत्कृष्ट सादरीकरण करुन उत्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी नर्सरी ते इ.१० वीतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

शाळेतील विद्यार्थ्यांनी अत्यंत मेहनतीने वैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधनात्मक अभ्यास करत सर्व प्रयोगाची निर्मिती केली होती. यामध्ये वॉटर सायकल, रेन वॉटर हार्वेस्टिंग, इथेनॉल प्रोडक्शन, टेस्ला कॉईल, हायड्रो इलेक्ट्रिसिटी, सोलार स्मार्ट सिटी तसेच वीज निर्मिती, ब्लाइंड स्टिक, प्रिंटिंग, गियर बॉक्स सिस्टीम, लाईन फॉलॉवर, स्मार्ट फार्मिंग, रडार सिस्टीम, रेन ड्रॉप सेन्सर, होम सिक्युरिटी, सोलार सिस्टीम, वॉटर डिस्पेन्सर यासारख्या रोबोटिक्स वर आधारित प्रयोगांचे उपस्थित पालक व नागरिकांनी भरभरून कौतुक केले. जाणता राजा, कम्युनिकेशन स्किल्स आदी नावीन्यपूर्ण प्रयोग देखील यावेळी पाहायला मिळाले. या प्रदर्शनात एकूण १८४ प्रयोगाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यामध्ये जाणता राजा उपक्रमा अंतर्गत इ.६ वीच्या विद्यार्थ्यांकडून छत्रपती शिवरायांच्या संपूर्ण इतिहासाचे सादरीकरण करण्यात आले. या अनोख्या सादरीकरणाने सर्वांचे लक्ष वेधले होते. येथील श्री गणेश विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावित्रीबाई फुले कन्या शाळा, तसेच तावशी ताड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदी शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रदर्शन पाहण्यासाठी भेट दिली. केंद्रप्रमुख नीलिमा डोके यांनी प्रदर्शन पाहण्यासाठी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले.



या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे संचालक डॉ. मैत्रेय पाटील आणि कोमल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी सनदी अधिकारी डॉ. जगदीश पाटील, संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. माया पाटील यांच्यासह उपाध्यक्ष रामदास वळके, सचिव किशोर जाजू, सहसचिव वैजनाथ रोडगे, कोषाध्यक्ष पद्मकुमार जंगमे, संचालक शशिकांत धडडू, प्रवीण कोपरकर, डॉ. बाळासाहेब गंगणे, रघुनाथ वळके, वसुदेव ओझा, द्वारकादास सोनी, रामेश्वर ओझा, रवी जोशी यांच्यासह विश्वस्त नारायण बरदापुरे आणि मुख्याध्यापिका आशारानी ओझा तसेच पालक मोठ्या संस्थेने उपस्थित होते.

प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला होता.

**जाहिरनामा**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

**जा.क्र. २०२४/एमएजी/कावि** **दिनांक २३/१२/२०२४**

**अर्जदार :- श्री. शेख इरफान इमामसाब चाकुर**
**विरूध्द**
**गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर**
**अर्ज :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात **श्री/श्रीमती शेख इरफान इमामसाब रा. चाकुर ता. चाकुर जि. लातुर** यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा **जन्म दि.१९/०२/१९९७** रोजी झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

**दि. २३/१२/२०२४** **पुढील तारीख २९/०१/२०२५**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित /-**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

## संक्षिप्त वृत्त...

### झरीतून मोटारसायकल लंपास

**परभणी,/प्रतिनिधी :** झरी येथील नारायण बबनराव इंगळे (रा. हिवरा रोहिला जि. वाशिम) यांची पॅशन एक्स्प्लो एम.एच.३७ वाय. ९४६२ ही लाल-काळ्या रंगाची मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी पळविली. कृषि सेवा केंद्राचे संचालक नारायण इंगळे यांनी ग्रामीण पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीतून २२ डिसेंबर रोजी मध्यरात्री किंवा २३ डिसेंबर रोजी पहाटेच्या दरम्यान चोरट्यांनी मौजे झरी येथील कृष्णा मुंजाजी सावंत यांच्या घरासमोरील रस्त्याावरुन ही मोटारसायकल लंपास केल्याचे नमूद केले. चुलत भाऊ संतोष केशवराव देशमुख यांच्या नावे असलेली ही मोटारसायकल आपण वापरत होतो, असेही म्हटले.

### रविवारी अश्विनी कुमार उपाध्याय यांचे एकदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील जनकल्याण सेवा संस्था व जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार २९ डिसेंबर रोजी एकदिवशीय 'कै. ह.बा. दळवी स्मृती व्याख्यानमालेचे' आयोजन करण्यात आले आहे. येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात रविवारी सायंकाळी ६ वाजता आयोजित केलेल्या या व्याख्यानमालेत सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ वकील अशविनीकुमार उपाध्याय हे 'एक देश एक विधान' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.या व्याख्यानास नागरीकांनी सहकुटूंब उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे सचिव अमोल जोशी, अध्यक्ष डॉ. देवानंद ओमणवार यांनी केले आहे.

### डॉ.चांडक यांना डॉ.दौलतराव लहाने स्मृती पुरस्कार जाहिर- आज होणार सन्मान

**परभणी,/प्रतिनिधी :** अरुणोदय प्रतिष्ठाण, पुणे व डॉ. दौलतराव लहाने मित्र परिवार यांच्या वतीने या वर्षीचा 'डॉ. दौलतराव लहाने स्मृती पुरस्कार २०२४' परभणी येथील होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च ॲन्ड चॅरिटीज या संस्थेचे अध्यक्ष डॉ. पवन सत्यानारायण चांडक यांना जाहीर झाला आहे. बुधवार २५ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगरातील समर्थनगर येथील आयएमए हॉल मध्ये आयोजित कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. तसेच या प्रसंगी कला, क्रिडा, साहित्या, संस्कृती, आरोग्य व सामाजिक कार्य या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा देखील गौरव होणार आहे. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अजय दंडे, डॉ. देवेंद्र पाटील, डॉ. जतीन शहा, डॉ. अनुपमा पाथ्रीकर, विकास महाजन, डॉ. राजीव नाईक, डॉ. आशिष भगत, डॉ. उज्ज्वला दहिफळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा आयोजित केला आहे. डॉ. चांडक यांनी आजवरच्या एचएआरसी संस्थेच्या कार्याचा या पुरस्काराद्वारे गौरव करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल डॉ. किरण गोरे, डॉ. अमित बोरगावकर, प्रा. डॉ. शिवा आयथळ, डॉ. राजगोपाल कालानी, डॉ. जयंत देशपांडे, डॉ. विजय दाभाडे, माधव गव्हाणे, संतोष इंगळे, बालसाहित्यिक मारोती डोईफोडे आदींनी चांडक यांचे अभिनंदन केले.

### महाकुंभ मेळ्याला जाणार विशेष रेल्वे

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रयागराज, उत्तर प्रदेश येथील कुंभ मेळ्याला जाण्याकरीता नांदेड-पटणा-नांदेड विशेष रेल्वे प्रयागराज चौकी आणि काचीगुड-पटणा-काचीगुडा नांदेड आणि प्रयागराज चौकी मार्गे चालविण्यात येणार आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.

गाडी क्रमांक ०७७२१ नांदेड ते पटणा ही विशेष गाडी नांदेड येथून २२ जानेवारी २०२५ रोजी रात्री ११ वाजता सुटेल आणि पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, जबलपूर, इटारसी, पिपरिया, जबलपूर, काटणी, संटणा, माणिकपूर, प्रयागराज चौकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बकसर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०७७२२ पटणा ते नांदेड विशेष गाडी पटणा येथून २४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच नांदेड येथे दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी ०४.३० वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.

गाडी क्रमांक ०७७२५ काचीगुडा ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी काचीगुडा येथून २५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४:४५ वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, जबलपूर, इटारसी, पिपरिया, जबलपूर, काटणी, संटणा, माणिकपूर, प्रयागराज चौकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बकसर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०७७२६ पटणा ते काचीगुडा मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच काचीगुडा येथे सकाळी ०७:०० वाजता पोहोचेल. या गाडीत २० डब्बे असतील, असेही रेल्वे विभागाने कळविले आहे.

### आ.सुरेश धस यांच्याव्दारे सांत्वन

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आमदार सुरेश धस यांनी शनिवारी (दि.२१) रात्री स्व. सोमनाथ सुर्यवंशी या युवकासह आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य ज्येष्ठ नेते स्व. विजय वाकोडे यांच्या कुटूंबियांची भेट घेवून त्याांचे सांत्वन केले. नागपूर येथून आमदार धस यांनी शनिवारी रात्री परभणीत दाखल झाल्याबरोबर नवा मोंढा येथील सूर्यवंशी यांच्या निवासस्थानी भेट देवून कुटूंबियांचे सांत्वन केले. तसेच आपण व सरकार या कुटूंबियांच्या पाठीशी संपूर्ण न्याय मिळेपर्यंत भक्कमपणे उभे राहु, असा विश्वास व्यक्त केला. तेथून धस यांनी ज्येष्ठ नेते स्व. वाकोडे यांच्या राहुल नगरातील निवासस्थानी भेट देवून वाकोडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत भावपूर्ण अभिवादन केले. कुटूंबियांच्या सदस्यांबरोबर चर्चा केली. यावेळी कुटूंबियांनी १० डिसेंबर रोजीच्या विटंबनेच्या घटनेसह एकूण घटनाक्रम विशद केला. जातीय सलोखा व शांतता राखण्याकरीता वाकोडे हे प्रयतशील असतांनासुध्दा प्रशासनाद्वारे त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल व्हावा या बद्दल तीव्र खंत व्यक्त केली. पोलिसी प्रशासनाच्या या दबावतंत्राच्या ताण तणावाखालीच वाकोडे यांचा मृत्यू झाल्याचा आरोप केला.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# अनेक वर्षानंतर जिंतूरला मिळाले मंत्रीपद

## जिल्हा परिषदेपासून सुरू झालेला प्रवास मंत्रीपदावर, जिंतूर विधानसभेच्या विकासाचा मार्ग मोकळा

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर विधानसभा मतदार संघाच्या विद्यमान आमदार सौ.मेघना साकोरे बोर्डीकर यांची आज राज्य मंत्रीमंडळात राज्यमंत्री म्हणून वर्णी लागली; त्याामुळे त्याामुळे ज्येष्ठ नेते माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांची मंत्रिपदाची अपुरी इच्छा सौ.साकोरे यांनी म्हणजे बोर्डीकर कन्येने पूर्ण केली.





जिंतूर विधानसभा मतदारसंघात ज्येष्ठ नेते बोर्डीकर यांचा मोठा प्रभाव राहिला आहे. विशेषता: या मतदारसंघातून बोर्डीकर यांनी तीन वेळा प्रतिनिधित्व केले आहे. एक वेळेस ते विधान परिषद सदस्य म्हणून सुद्धा कार्यरत होते. बोर्डीकर यांना आपल्या आमदारकीच्या या कारकिर्दीत मंत्रीपदाची मोठी इच्छा होती. त्यासाठी त्यावेळी त्यांनी मुंबई दिल्लीत पक्षश्रेष्ठींपर्यंत मोठी लॉबिंग केली. परंतु श्रेष्ठींनी बोर्डीकर यांना कधीही मंत्री पदाची संधी दिली नाही,त्यामुळे बोर्डीकर हे यांचे मंत्री पदाचे स्वप्न राहिले होते अखेर कन्या सौ.साकोरे यांना बोर्डीकर यांनी आपले राजकीय वारसदार म्हणून या मतदारसंघातून पुढे आणले, २०११ यावर्षी साकोरे यांनी जिल्हा परिषद निवडणुकीच्या माध्यमातून परभणी जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात पदार्पण केले,पुढे जिंतूर विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीची कास धरून २०१९ च्या निवडणुकीत अल्प का होईना मताधिक्याने विजय मिळवला होता. २०२४ च्या निवडणुकीत सुद्धा त्या अटीतटीच्या लढतीतून विजयी झाल्या, वास्तविकता ही निवडणूक सोपी नव्हती,सौ.साकोरे व बोर्डीकर कुटुंबियांनी निवडणूक अत्यांत प्रतिष्ठेची केली. विशेषता या निवडणुकीत या कुटुंबीयांनी वाडी,
तांड्यांपासून तालुका स्थानापर्यंत कानाकोपरे अक्षरशः पिंजून काढले. प्रचार केला व सर्वसामान्य मतदारांपर्यंत पोहोचण्याचा मोठा आटापिटा केला. वास्तविकता बोर्डीकर यांच्या विरोधात आणि फॅक्टर कार्यरत होते, परंतु या कुटुंबीयांनी या सर्व वातावरणावर मात केली आणि विजय प्राप्त केला. त्यामुळे या निवडणुकीत साकोरे यांचा विजय लक्षवेधी ठरला अन राज्य मंत्रिमंडळात सौ.साकोरे यांना मंत्रीमंडळात सम ावेशाचा मार्ग मोकळा झाला. राजाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या गुड बुक मध्ये बोर्डीकर कुटुंबीयांचा समावेश आहे.त्यामुळे सौ.साकोरे यांची राज्य मंत्रिमंडळात निश्चित वर्णी लागेल हे अपेक्षित होते. अपेक्षेप्रमाणे आज बोर्डीकर यांचे राज्य मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून निवड झाली नागपुरातील भव्य कार्यक्रमात शपथविधी झाला.सहाजिकच जिंतूर सेलू या भागात जल्लोष साजरा झाला. बोर्डीकर यांचे समर्थक व भाजपाच्या कार्यकत्यांनी ठिकाणी आनंदोत्सव साजरा केला. ज्येष्ठ नेते बोर्डीकर यांचे मंत्रिपदाचे अधुरे स्वप्न साकोरे यांच्याद्वारे पूर्ण झाले हे खरे त्याा वडिलांची पूण्याई व सौ.साकोरे यांची मेहनत कारणीभूत आहे.



### वाढदिवसावर खर्च होणारे पैसे शाळेस भेट देऊन आदर्श घडविला

**मानवत / प्रतिनिधी-** तालूक्यातील मौजे कोल्हा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ करणारे आदर्श व्यक्तिमत्व असलेले आ.माधव भानूदासराव काकडे यांनी आपल्या शालेय जिवनातील आठवणीला उजाळा देत शाळेला गावाचा आधार , माझे गावच नाही का ? तिर्थ व संताच्या आदर्श मार्गदर्शनावर आपले जिवन कार्याचा प्रारंभ करणारे आदर्श संत वचन अंगी बाळगणारे संताच्या विचारातून जिवनाचे कल्याण साधणारे, दानाचे महत्व साधून ।। दान ऐसे द्यावे जे निरपेक्ष असावे । दान ऐसे घ्यावे जे सत्कारणी लागावे ।।

या म्हणी प्रमाणे शाळेचे माजी विद्यार्थी श्री. माधवराव काकडे पाटील यांनी शाळेला वाढदिवसानिमित्त रु.५००० रक्कम भेट दिली. जिल्हा परिषद प्रशाला कोल्हा शाळेचे माजी विद्यार्थी शांत , सुस्वभावी व मितभाषी व्यक्तिमत्व असणारे श्री. माधवराव भानुदासराव काकडे पाटील यांनी त्यांच्या वाढ दिवसा निमित्त शाळेला रु.५००० ची रक्कम भेट देऊन आपला वाढ दिवस शाळेत जाऊन साजरा केला . त्यानिमित्त शाळेतील शिक्षक , विद्यार्थी , पालक व ग्रामस्थांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी जून्या आठवणींना उजाळा देत सर्वांचे ऋण काकडे यांनी व्यक्त केले.

### मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यास अखेर न्याय मिळालाच...

**परभणी-** जिल्ह्यातील खंबीर व लढाऊ नेतृत्व म्हणून आदरणीय रामप्रसादजी बोर्डीकर साहेबांकडे पाहीले जाते, आपल्या आक्रमक व झुंजार कार्यपद्धतीवर प्रचंड विश्वास असलेले व लोकशाहीवर दृढ विश्वास असलेले हे लोकप्रिय व झुंजार व्यक्तीमत्व मराठवाड्यासह संपुर्ण राज्यभरात सुपरिचित आहे. राज्याच्या राजधानीसह मराठवाड्याच्या राजकीय पटलावर आपला आदरयुक्त दबदबा निर्माण करण्यात यशस्वी झालेल्या व बुद्धीवंतास राजाश्रय देणाऱ्या या लोकाभिमुख नेतृत्वाचे स्वप्न आज सत्याात उतरले असेच म्हणावेसे वाटतेय.



आदरणीय साहेबांच्या कन्या माननीय आमदार सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकरांची राज्याच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री पदावर वर्णी लागली, परभणी जिल्ह्याला अखेर न्याय मिळालाच व तो न्याय मिळवून देण्यात आदरणीय श्री रामप्रसादजी बोर्डीकर साहेब हे यशस्वी ठरले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मराठवाड्याच्याग्रामीणभागातील एक लढाऊ, झुंजार, कणखर व विकासाभिमुख व्यक्तीमत्व अशी ओळख असलेल्या आदरणीय साहेबांचे ग्रामीण विकास चळवळीस बळकटी प्राप्त करून देण्याचे स्वप्न साकार झाले आहे आणि म्हणून शेवटी परभणी जिल्ह्यास न्याय मिळालाच असे म्हणावे लागेल. मराठवाडा ग्रामीण विकास चळवळीत तुलनात्मक-दृष्ट्या मागास असलेल्या मराठवाड्याच्या परभणी जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागाच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्याची एक नामी संधी परभणी जिल्ह्यास मिळालेली आहे असेच म्हणावे लागेल. आपल्या मतदारसंघातील मुलभूत व पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी व ग्रामीण विकास चळवळ सशक्त करण्यासाठी अटोकाट प्रयत करणाऱ्या या विकासाभिमुख नेतृत्वास आता परभणी जिल्ह्यासह मराठवाड्याच्या व राज्याच्या विकास चळवळीत सक्रिय व प्रत्याक्ष कामकाजांस चालणा देण्याची संधी उपलब्ध झालेली आहे असेच म्हणावे लागेल. परभणी जिल्ह्याचे व मराठवाड्याचे लोकनेते आदरणीय श्री रामप्रसादजी बोर्डीकर साहेबांचे व राज्याच्या नवनिर्वाचित मंत्री महोदया माननीय नामदार सौ मेघनाताई साकोरेजी बोर्डीकर यांचे मनापासून अभिनंदन व पुढील वाटचालीस मनःपूर्वक

**हार्दिक शुभेच्छा...**

**-विश्वनाथ प्रभाकरराव राऊत**
मु. पो. आडगांव (बाजार)
ता. जिंतूर जि. परभणी
मो. ९४२१३८२८००

### अध्यक्ष आणि सदस्य नियुक्तीसाठी नामांकन सादर करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** महिला व बाल विकास विभाग शासन निर्णयान्वये कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत स्थानिक तक्रार समिती गठण करण्याबाबतची तरतूद आहे. या समितीचे पुनर्गठण करण्यासाठी नामनिर्देशनाने अध्यक्ष व दोन सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी नामांकने मागविण्यात येत आहे.

अध्यक्ष पदासाठी सामाजिक कार्याचा ५ वर्षांचा अनुभव असलेल्या आणि महिलांच्या सोयीसाठी बांधील असलेल्या महिलांमधून नामनिर्देशनाने अध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी तरतूद आहे. सदस्य (दोन) या पदासाठी महिलांच्या सोयीसाठी बांधील असलेल्या अशा अशासकीय संघटना/ संघ किंवा लैंगिक छळाच्या प्रश्नांशी परिचित असलेली व्यक्तींमधून दोन सदस्य नामनिर्देशित करण्यात यावेत व त्यांच्यापैकी किमान एक सदस्य महिला असावी. परंतु, त्यापैकी किमान एका नामनिर्देशित सदस्याची पार्श्वभूमी प्राधान्याने कायद्याची असावी. तसेच त्यापैकी किमान एक नामनिर्देशित सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा अल्पसंख्यांक समाजातील महिला असावी.या स्थानिक तक्रार समितीमधील अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीचा कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल. वृत्त प्रसिध्दीच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे नामांकन सादर करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी के.व्ही.तिडके यांनी केले आहे.

### परभणीत वाहतुकीची कोंडी कायमच

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरात वाढत्या वाहतुकीच्या समस्येने नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत. त्यातच वाढत जाणारी ही गर्दी पाहून पायी चालणारे नागरिक चांगलेच त्रस्त झाले आहेत. त्यामुळे या वाहतुकीच्या समस्येवर आता आपण काय निर्णय घ्यावा अशी चर्चा नागरिकंतून होत आहे.


## परभणी जिल्ह्यात वरिष्ठ अधिकारी भ्रष्ट व निर्ढावलेले कडक आयपीएस अधिकाऱ्यांची गरज

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** संपूर्ण राज्यात दरडोई उत्पन्नासह सर्वार्थाने मागास व सामाजिक व धार्मिकदृष्ट्या संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परभणी जिल्ह्यात जिल्हाधिकारी या पदाकरीता आयएएस व जिल्हा पोलिस अधिक्षक या पदाकरीता आयपीएस अधिकाऱ्यांच्या नियुक्त्याा गरजेच्या ठरू लागल्या आहेत.

काळी आणि कसदार जमीन असणाऱ्या या जिल्ह्याचा मराठवाड्याचा कॅलिफोर्निया म्हणून सर्वदूर परिचय आहे. परंतु, दुर्देव असे वास्तव वेगळे आहे. मूळात दरडोई उत्पन्नातच जिल्हा राज्यात पिछाडीवर आहे. कृषि असो, कृषिपुरक उद्योग, व्यापार असो, औद्योगिक , शिक्षण असो, आरोग्य व अनन्य क्षेत्रात परभणी इतर जिल्ह्यांच्या तूलनेत सर्वार्थाने पिछाडीवर आहे. त्याची कारणेही अगदी स्पष्ट आहेत. अपरिपक्व, उदासिन, दृष्टीहीन, स्वार्थी, क्षमताहीन व अकार्यक्षम असे नेतृत्व,बहुतांशी लोकप्रतिनिधी या जिल्ह्यास सातत्याने लाभले आहेत. त्याचा परिणाम सर्वांगिण विकासापासून जिल्हा कोसोदूर राहिला आहे. महत्वाकांक्षी योजनां असो विकास कामांना या जिल्ह्यास कधीच भरघोस निधी मिळाला नाही. मूलभूत सोयी सुविधांचे प्रश्नसुध्दा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही सुटले नाहीत, हे विदारक सत्या आहे.

या पार्श्वभूमीवर या जिल्ह्यात सर्वांगिण विकासाच्या कामांकरिता निधी खेचून आणण्याच्या स्पर्धेऐवजी शासकीय, निमशासकीय योजनांच्या आहे त्याा निधीतून जास्तीत जास्त टक्केवारी उकळण्यावर, स्थानिक विकास निधी पूर्णतः गडप करण्यावर बहुतांशी लोकप्रतिनिधी दंग आहेत. त्याचा परिणाम स्थानिक स्वराज्य संस्था असो, सरकारी यंत्रणांमधुनसुध्दा निर्ढावलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची मोठी साखळीच भक्कमपणे उभी राहिली आहे.अलिकडे भ्रष्ट या साखळीने जिल्हावासीयांचा संयम ओळखून सर्वच क्षेत्रात, सर्वच बाबतीत अक्षरशः ओरबडून लुटमारीचे सत्राच सुरु केले आहे.त्याा विरोधात कोणीही ठामपणे उभे राहत नाही.जे कोणी या अनागोंदी विरूद्ध आवाज उठवण्याचा प्रयत करतात,त्याचे या लॉबीद्वारे पध्दतशिरपणे आवाज दाबले जातात. त्याचा परिणाम प्रत्योक क्षेत्रात गल्लीबोळापासून जिल्हास्थानापर्यंत हि साखळी निर्ढावली आहे. वरचढ आणि प्रभावी झाली आहे. त्यामुळे या साखळीद्वारे अलिकडे पूरक ठरतील,




असेच भ्रष्ट, वादग्रस्त, प्रमोटी असेच अधिकारी यावेत,टिकावेत या दृष्टीनेच पध्दतशीरपणे, सोयीस्करपणे असे यशस्वी प्रयत केले आहेत.

या गोष्टीचा कहर म्हणजे तृतीय श्रेणीच्या संवर्गातील, मर्जीतील भ्रष्ट कर्मचाऱ्यांना, कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही खातेप्रमुख, विभागप्रमुखाचा प्रभारी म्हणून कारभार सोपविण्याचे प्रकार घडले आहेत.

गेल्या काही वर्षांपासून या जिल्ह्यात उच्चपदस्त अधिकारी म्हणून सुध्दा आयएएस, आयपीएस वगैरे दर्जाचे अधिकारी येवूच नयेत, असे पध्दतशीरपणे प्रयत झाले आहेत. चुकून एखादा आयएएस किंवा आयपीएस अधिकारी लाभला, त्याास ऐनकेन प्रकारे त्रास देवून पिटाळून लावण्याचे अघोरी प्रकारसुध्दा घडले आहेत. त्याामुळे या जिल्ह्यात आयएएस, आयपीएस अधिकारी रुजू व्हावयाससुध्दा नकार देवू लागले आहेत.खरेतर गेल्या काही वर्षात या जिल्ह्याची राजकीय,सामाजिक व धार्मिकदृष्ट्या अत्यांत संवेदनशील जिल्ह्या म्हणून सरकार दफ्तरी नोंद आहे. या संवेदनशील जिल्ह्यात अगदी किरकोळ घटनांमधूनसुध्दा स्फोटक परिस्थिती उद्भवू शकते, असे रिपोर्ट सरकारी दफ्तरी आहेत. तरीसुध्दा या संवेदनशील जिल्ह्यात पोलिस अधिक्षक म्हणून आयपीएस व जिल्हाधिकारी म्हणूनसुध्दा आयएएस अधिकाऱ्यांच्या नियुक्त्याा होत नाहीत.कारण केवळ राजकीय दबाव किंवा राज्य सरकारच्या या दुर्लक्षित जिल्ह्याकडील दुर्लक्षपणामुळेच हे प्रकार घडू लागले आहेत.

''जगात जर्मनी, भारतात परभणी असा गंमतीने उल्लेख असणारा परभणी जिल्हा १० डिसेंबरपासून दुर्दैवी घटना, घडामोडींमुळे राजधानी दिल्लीपर्यंत प्रकाशझोतात आला आहे. या जिल्ह्यातील महसूल असो, पोलिस अधिकाऱ्यांचा अपरिपक्वपणा, उदासिनता, निष्क्रियताच त्याा घटना घडामोडींना कारणीभूत ठरल्या आहेत. परंतु जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना, नेतृत्वास या घटना घटनांमोडीचे भान नाही.

राज्य सरकारनेसुध्दा या घटनांचे, चर्चेचे,गांभीर्य ओळखून गेल्या पंधरा दिवसात पावूले उचलली नाहीत. या जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासह विकासाभिमुख कामांकरिता उच्चपदस्त अधिकारीपदी म्हणजे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षकपदी आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांची नियुक्ती गरजेची आहे. या घटना घडामोडीतून लोकप्रतिनिधींबरोबर सरकारसुध्दा बोध घेईल अशी अपेक्षा आहे. अन्यथा भविष्यातही असेच सत्र सुरू राहील..